श्री नेत्रालय हॉस्पिटल
नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला,
दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
* कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
* फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
* तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

मूल्य २.००

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१९० ■ रविवार २० एप्रिल २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

Post Regd.No./DHL/53/24-26

आकर्षक
लग्न पत्रिका
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

## महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा हेलकावे सुरु
## ठाकरे बंधूंच्या एकत्रिकरणामागे मुंबई मनपा निवडणूक



**मुंबई, दि.१९- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर राजकारणाने पुन्हा हेलकावे घेण्यास सुरुवात केली आहे. अशक्य ते शक्य करतील, राजकारणी या गोष्टीचा प्रत्यय महाराष्ट्रातील जनतेला या पुर्वीच आला आहे. त्यामुळे राजकीय बदलाच्या वारे काय आणि कोण काय करणार, याबाबतच्या चर्चेत आता सहज कुणीही प्रकट व्हायला लागले आहे. महाराष्ट्रात मनसेचे सर्वे सर्वा राज ठाकरे आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष उध्दव ठाकरे म्हणे आता एकत्र येणार आहेत. या एकत्रीकरणाबाबत काही कार्यक्रमातील या नेत्यांच्या प्रतिक्रियांचा आधार घेतला जात आहे. खरे तर, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेषतः मुंबई महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा होत आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे.**

मराठी माणसाच्या अस्तित्त्वासाठी आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत, एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण नाही, असं म्हणत राज ठाकरे यांनी एक प्रकारे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाबरोबर युतीचे संकेत दिल्याचे सांगितले जाते. यावर प्रतिक्रिया देताना उध्दव ठाकरे यांनी देखील प्रतिसाद देतांना, मी देखील किरकोळ भांडण बाजूला ठेवण्यास तयार आहे, असे म्हटलय. श्री, राज ठाकरे आणि श्री. उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या या प्रतिक्रियांमुळेच चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर सहाजिकच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया नोंदवीत, चर्चा पुढे नेण्यास हातभार लावला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात, माझं एवढंच मत आहे की, प्रत्येकाने सदविवेक बुद्धीला स्मरून योग्य वाटत असेल, तो निर्णय घ्यावा. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचे अध्यक्ष या नात्यांने राज ठाकरे स्वत:च निर्णय घेतात. तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष या नात्याने उद्धव ठाकरे निर्णय घेतात. (पान ८ वर)

## मंदिर पाडल्याने जैन समाजाचे आंदोलन

मुंबई, दि.१९- मुंबईतील विलेपार्ले भागात असलेले जुने पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर मुंबई महानगरपालिकेने दोन दिवसांपूर्वी पाडले. मुंबई पालिकेच्या या कारवाईनंतर देशभरातील जैन समुदाय संतप्त झाला आहे. मुंबई मनपाच्या कारवाईविरोधात जैन समाजाकडून शनिवारी अहिंसक रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने जैन समाजबांधव सहभागी झाले होते. त्यांच्या हातात मंदिर टूटा, हौसला नही, असे फलक होते. मंदिर पुन्हा बांधून देण्याची मागणी या लोकांनी केली. रॅलीत स्थानिक सर्वपक्षीय नेतेसुद्धा सहभागी झाले होते. दरम्यान, शनिवारी सकाळी जैन समाजाकडून आंदोलन सुरू झाले. आंदोलनापूर्वी जैन बांधवांनी तोडलेल्या मंदिरामध्ये आरती केली. (पान ८ वर)

## सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सदैव कटिबद्ध : पालकमंत्री रावल

**धुळे, दि.१९- सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहण्याकरिता आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन नेहमीच कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



धुळे शहरात मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष, ए.बी. फाऊंडेशन व प्रतीक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास आमदार अनुपभैय्या अग्रवाल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, माजी महापौर प्रदीप कर्पे, चंद्रकांत सोनार, प्रतिभाताई चौधरी, अंपळकर आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी राज्य शासन विविध उपायोजना करीत आहेत. नागरिकांना आरोग्याच्या सुविधा आपल्या जिल्ह्यातच उपलब्ध होण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे. याकरिता स्थानिक पातळीवर ठिकठिकाणी आरोग्य शिबिरे घेण्यात येत असून या शिबिरांमध्ये आरोग्य पिडीत नागरिकांच्या विविध तपासण्या करण्यात येत आहेत. याठिकाणी आयोजित आरोग्य शिबिरात विविध आजारांच्या १५६० पेक्षा अधिक तपासण्या (पान ८ वर)

## आदिवासी विकास विभागाचा इतरत्र वळवलेला निधी परत करा; मुख्यमंत्र्यांना आदिवासी संघटनेचे साकडे

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- आदिवासी विकास विभागाच्या वित्तीय वर्षातील मंजूर निधीमधून इतर योजना करता वळविण्यात आलेला निधी पुन्हा आदिवासी विकास विभागाला वर्ग करणेबाबतचे निवेदन विश्व आदिवासी सेवा संघटनेने मुख्यमंत्री याना पाठविले आहे.**

निवेदनाचा आशय असा महाराष्ट्र राज्याचा मागील व चालू अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आल्याचे दिसून आले, याबद्दल आभार. यामुळे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भरपूर मदत होणार आहे.समाजातील दुर्बल घटकांचा विकास करणे हे यातून दिसून येते. परंतु सदर मंजूर निधीमधून आपल्या प्रतिष्ठित व आपल्या सरकारच्या सर्वात महत्वाच्या माझी लाडकी बहीण योजना राबविणेकामी सात हजार कोटी रुपयांचा निधी सदर योजनेकरिता वर्ग करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. सदर योजना ही तात्कालिक असून देखील सदर योजनेकरिता आपण पूर्वनियोजित आदिवासी समाजाच्या विकासासाठी उपलब्ध निधीतील तरतुदींबाबत विचार न करता या योजनेकरिता निधी वळविणे म्हणजे एक प्रकारे गरीब दुर्बल असलेल्या आदिवासी समाजावर अन्याय केल्यासारखे होईल. आदिवासी समाज हां दुर्गम व रानावनात राहून आपली संस्कृती जपणारा समाज आहे .त्याला अन्याय राजकारण यातले काही कळत नाही. परंतु असे त्यांच्या निधीवर दुसऱ्या योजनेचे भवितव्य किती दिवस अवलंबून राहणार आपली माझी लाडकी बहीण योजना ही आदिवासी समाजापेक्षा आणि त्यांच्या विकासापेक्षा नक्कीच मोठी असून शकत नाही. तथापि आपण या योजनेकरिता वर्ग केलेला निधी तात्काळ पुनःश्च आदिवासी विकास विभागास वर्ग करावा. (पान ८ वर)

## धुळ्यात अठ्ठावीस एप्रिलला गुंतवणूक परिषद उद्योजकांनी सहभागी व्हावे : पालकमंत्री रावल

**धुळे, दि.१९- धुळे जिल्ह्यात उद्योग व्यवसायास पूरक वातावरण असून पायाभूत सोयी सुविधा, कुशल मनुष्यबळाची मोठी उपलब्धता असल्यामुळे आगामी काळात धुळे जिल्हा उद्योग हब होणार आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २८ एप्रिल रोजी धुळ्यात गुंतवणूकदाराची परिषद होणार आहे. या गुंतवणूक परिषदेस राज्यातील अधिकाधिक उद्योजकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेच्या आयोजनाबाबत पूर्वतयारी आढावा बैठक पालकमंत्री श्री.रावल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. बैठकीस आमदार अनुपभैय्या अग्रवाल, दूरदृष्यप्रणालीद्वारे आमदार अमरिशभाई पटेल, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.सुभाष भामरे, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थाक संतोष गवळी, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी डिंगबर पारधी, खान्देश औद्योगिक विकास परिषदेचे मुख्य प्रवर्तक नितीन बंग, खान्देश इंडस्ट्रीज डेव्हलपमेन्ट असोसिएशनचे सचिव भरत अग्रवाल, धुळे अवधान मॅन्यु. असोसिएशनचे नितीन देवरे, लघु उद्योग भारतीचे अध्यक्ष वर्धमान सिंगवी, मुकेश राठोड, प्रशांत देवरे, उद्योजक मोदी अग्रवाल, यांच्यासह विविध उद्योजक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, राज्यात १ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी बनविण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देंवेद्र फडणवीस मोठे प्रयत्न सुरु केले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा सहभाग असला पाहिजे. या १ ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी मध्ये सामान्य माणसाची आर्थिक ताकदसुद्धा वाढली पाहिजे. त्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र सरकार प्रत्येक जिल्ह्यामध्ये गुंतवणूक परिषदेचा (इन्व्हेस्टमेंट) चा कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात सूचना दिल्या आहे. देशातील सर्वात जास्त राष्ट्रीय महामार्ग धुळे जिल्ह्यातून जातात, देशाच्या चारही दिशांना जोडणारे रेल्वेचं जाळं येथे तयार होत आहे. शैक्षणिक हब असलेला आपला धुळे जिल्हा असल्याने कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. धुळे जिल्ह्यात सोयाबीन, इलेक्ट्रॉनिक हब आहे. शिरपूर टेक्सटाइल, शिंदखेडा तालुक्यात फुड ण्ड फॉर्मर केंद्र विकसीत झाले आहे. साक्रीमध्ये १ हजार मेगाव्हॅटचे सोलर (पान ८ वर)



## धुळे कृउबात भुईमुग आवक सुरु साडेसहा हजार प्रतिक्किंटल भाव

**धुळे, दि.१९ (प्रतिनिधी)- धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उन्हाळी भुईमुग विक्रीस येण्यास सुरूवात झाली आहे. अनेक शेतकरी भुईमुग विकायला आणत असल्याने व्यापारी जास्तीत जास्त साडेसहा हजार रूपये प्रतिक्वंटल दर देत आहेत. परंतु भुईमुग उत्पादनावर घेतलेले कष्ट आणि झालेला खर्च पाहता भुईमुगासाठी प्रति क्विंटल किमान ८ हजार रूपये दर मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांची आहे.**

धुळे जिल्ह्यात पेरणी योग्य साडेचार लाख हेक्टरावर क्षेत्र आहे. गेल्या काही वर्षात जलसंधारणाची कामे झाल्याने भुर्गाभातील पाण्याची पातळी वाढली. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळी पिक घेण्याचा प्रयतक केला आहे. नेहमी उन्हाळी कांदे घेणाऱ्या काही शेतकऱ्यांनी वाढलेला (पान ८ वर)

## गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.१९-चितोड रोड परिसरातील लिलाबाई चाळमधील पस्तीस वर्षीय इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, लिलाबाई चाळ येथील निलेश रघुनाथ माळी (वय ३५) हे राहत्या घराच्या छताला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. परिसरतील नागरिकांच्या मदतीने खाली उतरवून रूग्णवाहिकेतून हिरे मेडिकल कॉलेज येथे दाखल केले असता डॉ.अरूण नागे यांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, आत्महत्येचे कारण मात्र समजू शकले नाही.

## दाम दुप्पट करून देण्याचे अमिष दाखवून एक लाखाची फसवणूक

**धुळे, दि.१९- धुळे तालुक्यातील अजनाळे शिवारातील शेतात पैसे दुप्पट करून देण्याचे अमिष दाखवून एका इसमाला बोलावले. त्याठिकाणी अन्य सात जणांनी संगनमताने शिवीगाळ करत मारहाण केली व मोबाईल, बँक अकाऊंटमधील एक लाख रूपयांची रक्कम ट्रान्सफर करून केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गजानन चंद्रकांत भोडे यांनी दि.,१८ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, अजनाळे गावातील शिवारात गौरव अधिकार भोसले याने दि.१८ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास गजानन भोडे यांना बोलावले. एक लाखाच्या रकमेची दुप्पट रक्कम करून देण्याचे अमिष दाखवले. याचवेळी शेतात बिल्लु भोसले, निखिल, स्वराज भोसले, कवि धर्मा चव्हाण, बादल चव्हाण, सिकेश शामलाल भोसले व शहाजी भोसले व इतर एकत्र येवून शिवीगाळ करत मारहाण केली. एक लाखाची रोख रक्कम बळजबरीने हिसकावून घेतले. त्याचवेळी (पान ८ वर)

## शहाद्यात घरफोडी हजारोंचा ऐवज लंपास

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- शहादा येथे नजमा अब्दूल रहमान खाटीक यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून अज्ञात चोरटयाने रोख रक्कमसह सोन्याची बांगडी चोरुन नेल्याने अज्ञात चोरटया विरुध्द. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुंभार टेक मधील मच्छीबाजारातील राहत्या घरी ही चोरीची घटना घडली. १५ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजेपासून तर १७ एप्रिल दरम्यान ही चोरीची घटना घडली.या प्रकरणी भाजी पाला व्रिकेता नजमा खाटीक यांनी शहादा शहर पोलिसांत फिर्याद दिली असून सुमारे ८० हजार किमतीचा ऐवज चोरीस गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पोऊनि छगन चव्हाण यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.



## पारोळा चौफुलीवर दुकानांना आग लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक

**धुळे, दि.१९- शहरातील पारोळा रोड चौफुलीजवळ चार दुकानांना पहाटे पाच वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याने दुकानांमधील साहित्य जळून भस्मसात झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. पहाटेच्या सुमारास आग लागल्याने मोठे नुकसान झाले असून घटनास्थळी कोणीही नसल्याने जीवीतहानी टळली.**

पारोळा रोड चौफुलीच्या ठिकाणी मोटर काच फिटींग, गॅरेज, स्टार ऑटो इलेक्ट्रिशियन व न्यु महाराष्ट्र टायर सर्व्हीस अशी चार दुकाने आहेत. या दुकानांमध्ये सुरूवातील तीन दुकानांना आग लागली. आगीने रौद्र रूप धारण करत चौथ्या दुकानानेही पेट घेतला. आग लागल्याची खबर कळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. दोन ते तीन बंबांच्या माध्यमातून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. आग लागल्याने दुकानांमध्ये ठेवलेले इलेक्ट्रीक मोटर, बॅटरी तसेच नवीन व जुने टायर आगीत जळून भस्मसात झाले.

## सुधारित आयकर कायद्यावर धुळे सीए शाखेत एक दिवसीय कार्यशाळा




**धुळे दि.१९- इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ची प्रत्यक्ष कर समिति व धुळे सीए शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयकरात होवू घातलेले बदल या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.**

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात, प्रस्तावित नवीन आयकर विधेयकातील मुख्य बदल व त्याचा परिणाम या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सीए पियुष एस. छाजेड (अध्यक्ष, प्रत्यक्ष कर समिती, तथा केंद्रीय समिति सदस्य) यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक सरस्वती पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून आयकर विभागाचे उप आयुक्त जयपाल स्वामी आयआरएस , धुळे व्यापारी महासंघ अध्यक्ष नितीन बंग आणि लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष वर्धमान सिंघवी याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचा शुभारंभ सीए यश एस.आंचलिया (धुळे शाखा अध्यक्ष) यांच्या स्वागतपर भाषणाने झाला. उपायुक्त जयपाल स्वामी यांनी आयकर प्रशासनातील पारदर्शकता व आधुनिकतेबाबत आपले विचार मांडले. सीए पीयूष छाजेड यांनी नवीन आयकर विधेयक, मधील महत्त्वपूर्ण बदल व त्यांचा प्रभाव या विषयावर सखोल प्रकाश टाकला. सीए प्रणव अष्टीकर यांनी विश्वस्त संस्थांच्या कर प्रावधाना संबधी नवीन (पान ८ वर)

## अज्ञात व्यक्तीने शेतातून वायर, बॅटरी लांबविली

धुळे, दि.१९- धुळे तालुक्यातील बिलाडी नगाव रोड येथील शेतातील पत्र्याच्या शेडमधील वायर, ट्रॅक्टरला लावलेली बॅटरी व नागर जोडणीची टापलींग चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.नवल गंभीर पाटील यांनी दि.१८ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, बिलाडी येथील शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये पस्तीस हजार रूपये किंमतीची साडेसात एचपीची ईले.मोटर, पंचवीस हजार रूपये किंमतीची वायर, दोन हजार रूपये किंमतीची बॅटरी, पाचशे रूपये किंमतीची टापलींग असा एकुण ६२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.याप्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी नो कार झोन दुचाकी पार्किंगचे नियोजन करा: ललित माळी

**धुळे, दि.१९- आग्रा रोड व गल्ली क्रमांक ६ येथे वाढती वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नो कार झोन व नियोजित दुचाकी पार्किंगचे नियोजन करण्यात यावे. अशा आशयाच्या मागणीचे निवेदन शिवसेनेचे विभाग संघटक ललित माळी यांनी मनपा आयुक्त, शहर वाहतुक विभागाचे पोलीस निरिक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.**



शहरातील आग्रा रोड व गल्ली क्रमांक ६ या भागात वाहतूक समस्या वाढली आहे. वाहनांची संख्या झपाट्याने वाढली असून अरुंद रस्त्यांमुळे कार पार्किंगमुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होते. रहदारीची समस्येवर तोडगा काढण्यासाठी नो कार झोन घोषित करणे, गल्ली क्रमांक ६ आणि आग्रा रोडच्या विशिष्ट विभागात चारचाकी वाहनांना प्रवेश बंदी घालून केवळ दुचाकींसाठी मार्ग मोकळा ठेवणे. दुचाकी पार्किंगसाठी स्वतंत्र व्यवस्था करून देणे. संचालन व देखरेखीची व्यवस्था स्थानिक पोलीस आणि नगरपालिकेच्या मदतीने पार्किंग व वाहतुकीचे नियमन सुनिश्चित करणे. व्यापाऱ्यांचा सहकार्याने अंमलबजावणी स्थानिक व्यापारी संघटना या उपायांना पूर्ण सहकार्य देण्यास तयार आहेत.

पार्कींगची सुविधा उपलब्ध करून दिल्यास शहरातील वाहतूक सुरळीत होईल, व्यापाऱ्यांचा व्यवसाय सुरळीत चालेल, नागरिकांच्या सुरक्षिततेस मदत होईल.नो कार झोन पार्किंग व दुचाकी पार्कींगच्या नियोजनासाठी लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी. अशी मागणीही शिवसेनचे ललित माळी यांनी केली आहे.

## ना. रावलांच्या हस्ते चित्रपटाचे प्रदर्शन

धुळे, दि.१९-शहरातील ज्योती टॉकीज येथे जय भिम पँथर एक संघर्ष हा निशांत नाथाराम धापसे लिखीत, दिग्दर्शित चित्रपटाचे प्रदर्शन राज्याचे पणन व राजशिष्ठाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आला. दिलीप साळवे यांच्यावतीने समाजबांधवांसाठी चित्रपट मोफत दाखविण्याची संकल्पना आमलात आणली. प्रसंगी आ.अनुप अग्रवाल, माजी खा.डॉ.सुभाष भामरे, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, सामाजिक कार्यकर्ता महादेव परदेशी, माजी नगरसेवक सुनिल बैसाणे, भैय्या पारेराव, रावसाहेब गिरासे, कल्याण गरूड, शोभा चव्हाण, राज चव्हाण, हरिचंद्र लोंढे, संजय जवराज, योगेश जगताप, किरण जोंधळे, पत्रकार रवि नगराळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जिल्ह्यात वाढत्या तापमानामुळे पपईला कापडी अच्छादन

**धुळे, दि.१९ (प्रतिनिधी)- धुळे शहरासह जिल्ह्याचे तापमान सातत्याने ४३ अंशावर राहत आहे. तापमानामुळे उष्णतेची लाट अनुभवली जात आहे. त्याचा परिणाम मनुष्य, पशु-पक्षी आणि प्राण्यांवरच नाही तर वनस्पतींवर देखील मोठया प्रमाणात होत आहे. धुळे जिल्हयातील पपईच्या बागांना तापमानाचा फटका बसला आहे. अचानक पपईची पाने पिवळी पडू लागली आहेत. तर पपईवर असलेली फळे डागळली जात आहेत. पपईच्या फळांना वाचविण्यासाठी आता शेतकरी फळांवर कापडी अच्छादन लावत आहेत. यातुन नुकसान कमी होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.**



धुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये जलस्तर उंचावला आहे. त्यामुळे प्रयोगशील शेतक-यांनी भाजीपाल्याचे उत्पन्न घेतांनाच फळबागा देखील साकारल्या आहेत. यंदा अनेक शेतक-यांनी पपईची बाग साकारली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या फळबागेतील पपई काढणीच्या टप्यात आली आहे. पण त्याचवेळी तापमानाचा पारा वाढला आहे. गेल्या आठ ते दहा दिवसांपासुन तापमान सतत ४३ अंशापर्यंत राहिले आहे. त्यामुळे वातावरण कोरडे झाले असुन उष्ण लहरी सर्वांनाच जाणवत आहेत. उष्ण लहरींमुळे मानवासह सजिव प्राणीच नव्हे तर सरपटणारे प्राणी देखील त्रासले आहेत. वाढत्या तापमानाचा केवळ मनुष्य आणि पशुपक्षांवरच नाही तर फळांवर देखील परिणाम होवु लागला आहे. अनेक शेतक-यांनी मोठया अपेक्षेने पपईची बाग साकारली. सध्या अनेक शेतकरी पपईची काढणी करून ती विक्री करण्याचे स्पप्न पाहत आहेत. परंतु वातावरणात अचानक बदल झाला. (पान ८ वर)

## भरधाव वेगातील वाहन उलटून एक ठार

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- सिंधी दिगर गावातील पातलसिंग मुश्या नाईक यांच्या घराजवळ १७ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास चारचाकी वाहन भरधाव वेगात नेल्याने गाडी पलटी होवून झालेल्या अपघातात एक जण ठार तर १५ पेक्षा जास्त.प्रवासी जखमी झाले. याप्रकरणी मध्यप्रदेशातील पाटील ता बडवाणी येथील चालक हुकमाऱ्या सोलंकी याच्या विरोधात म्हसावद पोलिसांत गुन्हा दाखलइ करण्यात आला आहे.**

चालक सोलंकी याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात नेवून रस्त्याच्या खाली गाडी घसरुन पलटी झाली यात मयाराम कुटवाल सोलंकी हा ठार झाला तर छांतीलाल रेमच्या बंडळ,शांतीलाल सोलंकी, सिंवू बादले, प्रेमा सोलंकी सर्व रा ठेनच्या ता पाटी जि बडवाणी यांच्यासह आजूबाजूच्या गावातील १५ जण जखमी झाले. चालक अपघाताची खबर न देता पळून गेला. या प्रकरणी कुकवाल सोलंकी यांनी फिर्याद दिल्याने म्हसावद पोलिसांत पसार झालेला आरापी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोह चंदू साबळे यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.सपोनि गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अपघाताची माहिती घेण्यात येत आहे.लवकरच आरोपी असलेल्या आरोपीला अटक करण्यात येईलअशी ग्वाही देण्यात आली आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -87,900 रु.+3% GST
सोने- 24 K -95,950 रु.+3% GST
चांदी- 01,0000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



# चिंचखेडेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे उत्साहात अनावरण

**धुळे, दि.१९- तालुक्यातील चिंचखेडा येथे मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमित्त धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावर करण्यात आले.**

चिंचखेडे गावात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीला धुळे ग्रामिणचे आमदार भदाणे यांच्या मदतीने उत्सव समितीला पंचधातुयुक्त बाबासाहेबांचा पुतळा भेट म्हणून देण्यात आला होता. सोमवारी जयंतीच्या दिवशी आमदार भदाणे यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून पारोळ्याचे माजी उपनगराध्यक्ष प्रा.डी.बी.पाटील, जि.प सदस्य आशुतोष पाटील हरी वना मोरे (मा.सरपंच), संतोष चिंतामण वाघ, भुषण अनिल देसले, रोहीदास खंडू भालेराव, निंबा रघूनाथ देसले, रविंद्र रंगराव देसले, संदेष विलास चव्हाण, शालीग्राम मोरे, ॲड.एकनाथ भदाणे, दिपक सोनवणे, विजय मोरे,अमोल हेमराज देसले, गौतम भालेराव, मनोहर मोरे, राजरत्न भालेराव, अरुण भालेराव उपस्थित होते. दरम्यान ग्रामस्थांनी आमदार भदाणे यांच्या सोबत विविध समस्यांवर चर्चा केली. ग्रामस्थांच्या समस्या या सर्व मार्गी लावण्यात येतील असे असे आश्वाशन यावेळी आ.भदाणे यांनी दिले.

# एस.व्ही.के.एम.अभियांत्रिकीतील विद्यार्थिनींना इंटर्नशिपची संधी

**धुळे, दि.१९- येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थिनींना स्टायपेंड (छात्रवृत्ती) सह इंटर्नशिपची संधी मिळाली.**

औद्योगिक क्षेत्रातील मनुष्यबळाकडे काही विशेष कौशल्य असल्याशिवाय त्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होत नाही. त्यामुळे महाविद्यालयीन कार्यकाळातच विद्यार्थ्यांनी अधिकाधिक कौशल्य आत्मसात केली पाहिजेत. शिक्षकांनी सुद्धा विद्यार्थ्यांना भिंतीबाहेरील कृतियुक्त शिक्षण देणे ही आजच्या काळाची गरज आहे.

एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालय ह्याच पद्धतीने काम करत असल्यामुळे महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील आकांशा पाटील हिला पुणे येथील कारगिल इंडिया प्रा. लि., पुणे येथे १८ हजार रुपये प्रति महिना स्टायपेंड (छात्रवृत्ती), साक्षी अहिरे व तृप्ती वाघ ह्यांना रिइन्व्हेन्ट डिझाईन टेकनॉलॉजी, पुणे येथे १५ हजार रुपये प्रति महिना छात्रवृत्ती,



दर्शना पाटील हिला प्रोडफिटसोल इन्फोटेक प्रा. लि., पुणे येथे ५ हजार रुपये प्रति महिना या छात्रवृत्ती वर इंटर्नशिप ची संधी मिळाली आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. निलेश साळुंके यांनी दिली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्षचिंतनभाईपटेल,एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट व चान्सलर सौ. सक्हो अंकित पारीख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक अजय पसारी, प्राचार्य डॉ.निलेश साळुंके, विभाग प्रमुख डॉ. हितेश ठाकरे, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी करण शर्मा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**धुळे-सेंट अँड चर्च व सेंट अँथनी स्कूल यांच्या वतीने गेल्या दहा वर्षापासून गुड फ्रायडेच्या दिवशी पाणपोईचा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाही गुड फ्रायडे निमित्त सेंट अँथनी स्कूलच्या बाहेर पाणपोईचे उद्घाटन करताना बिशप लॉर्ड्स डॅनियल, फादर विल्सन रॉड्रिक्स पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे मायकल मलबारी, मॅन्युअल मकासरे, सेंट्रा रॉड्रिक्स, जॉर्ज मलबारी जोसेफ सिंगारे आदी मान्यवर उपस्थित होते.**



# आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत उन्हाळी क्रीडा शिबिराला सुरुवात

**शिरपूर, दि.१९- शहरातील आर.सी.पटेल प्राथमिक शाळेत उन्हाळी क्रीडा शिबिराला सुरुवात झाली असून क्रीडा शिबिरात तिनशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.**

उन्हाळी क्रीडा शिबिरात सकाळी योगासनाने सुरुवात होते. नंतर विविध फनी गेम्स तसेच क्टिव्हिटी घेण्यात येतात. या सोबतच क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, हॉलीबॉल, बॅडमिंटन, कराटे, हॅंडबॉल, खो-खो, कॅरम असे वेगवेगळे खेळ खेळवले जातात. सांस्कृतिक प्रकारात नृत्य, पेंटिंग, गायन, वादन अशा विविध प्रकारात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. या खेळासाठी व सांस्कृतिक प्रकारासाठी स्वतंत्र प्रशिक्षक नेमण्यात आले आहेत. प्रशिक्षकांमार्फत सदर खेळ व सांस्कृतिक क्टिव्हिटीज शिकवल्या जातात. सदर उन्हाळी क्रीडा शिबिर एप्रिल ते मे पर्यंत सुरू असणार आहे. या दरम्यान उन्हाळी क्रीडा शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. उन्हाळी क्रीडा शिबिरात विद्यार्थ्यांनी ज्या क्रीडा प्रकारात भाग घेतला आहे ते वर्षभर प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. सदर उन्हाळी क्रीडा शिबिर मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. क्रीडा प्रमुख वसंत भामरे, गणेश चौधरी, संजय पटेल, अशोक पाटील, किशोर राजपूत, प्रशांत चौधरी, विनोद माळी, अरुण हातेडकर, सुशिला मराठे, सुवर्णा सुर्वे, रोशनी पावरा आदि प्रयत्नशील आहेत.

# धुळ्यातील आंबेडकरप्रेमी ग्रुपने साकारलेल्या सजीव देखाव्याने अनुयायी झाले मंत्रमुग्ध!

**धुळे, दि.१९- शहरातील देवपूर परिसरातील अंडाकृती बगीचा जवळील नागसेन नगर आंबेडकरवादी ग्रुपतर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्रातील रमाई आंबेडकर आजारी असतांना सामाजिक हित समोर ठेवून बाबासाहेबांनी येवल्याच्या सभेला प्रस्थान केल्याचा प्रसंग हुबेहुब साकरण्यात आला. कलावंतांनी साकारलेली सजीव कलाकृती पाहुन आंबेडकरी अनुयायी मंत्रमुग्ध झाले. माजी उपमहापौर नागसेन बोरसेंच्या मार्गदर्शनाखाली सजीव देखावा साकारण्यात आला.**



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त एक दिवस आधीपासून सजीव देखावा सादरीकरणासाठी जय्यत तयारी नागसेन नगर आंबेडकरवादी ग्रुपने तयारी केली. सजीव देखाव्यासाठी ट्रॉलीवर झोपडी, बाहेर पाण्याचा माठ, पलंग, कंदील, लाकडी जुन्या पध्दतीची खुर्ची आणि प्रकाश योजना असा रंगमंच उभारण्यात आला होता. या रंगमंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका कलावंत संतोष ताडे व माता रमाई आंबेडकरांची भूमिका साक्षी अहिरे यांनी तंतोतंत साकारल्या. देखावा पाहण्यासाठी अनेकांनी गर्दी केली. रात्री साडे सात वाजेला सुरू झालेल्या सजिव देखाव्याच्या मिरवणुकीची रात्री दीड वाजेला बस स्थानकाजवळ मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या डॉ.बाबासाहेबांच्या मध्यवर्ती पुतळ्याजवळ सांगता झाली. डि.जे.च्या तालावरील बाबासाहेबांच्या प्रेरणादायी गीतांवर महिला भगिनींसह तरूण, अबाल वृध्द थिरकले.

जयंती उत्सव मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष गौतम मोरे, उपाध्यक्ष अतिश अहिरे, राकेश चौधरी, कार्यकर्ते अजिंक्य सुर्यवंशी, ॲड.मयुर बैसाणे, कुणाल बोरसे, ललित बोरसे, कबीर बोरसे, विशाल बैसाणे, सतिष बोरसे, संदीप शिंदे, महेंद्र पानपाटील, रवींद्र पानपाटील, दादू नगराळे, आदित्य नगराळे, रविंद्र कांबळे, शिवपाल गोलाईत, संतोष बैसाणे, ज्येष्ठ मार्गदर्शक अशोक पिंपळे, बाला चत्रे, सुरेश चत्रे, धनराज बैसाणे, प्रमोद चव्हाण, भास्कर खरात, सुनिल चत्रे, अनिल चत्रे, संजय चत्रे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# पंचशील वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी मी धुळेकर संघटनेतर्फे दूरदर्शन संच भेट

**धुळे, दि.१९ (प्रतिनिधी)- धुळयातील पंचशील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोरंजन व्हावे, त्यांना ज्ञान मिळावे या भावनेतुन मी धुळेकर संघटनेतर्फे वसतिगृहाला दुरदर्शन संचाची भेट देण्यात आली. वसतिगृहात दुरदर्शनवर मनोरंजन करून घेता येईल आणि माहिती देखील मिळेल, असे समजल्यामुळे विदयार्थ्यांनी समाधान व्यनत केले. मी धुळेकर संघटनेने केलेले काम अविस्मरणीय आणि प्रेरणा देणारे आहे, अशी भावना यावेळी व्यनत करण्यात आली.**

धुळयातील साक्री रोडवर पंचशील वसतिगृह आहे. या वसतिगृहात साक्री, शिरपुर तालुक्यातील दुर्गम क्षेत्रात राहणारे विद्यार्थी आहेत. या वसतिगृहात दुरदर्शन संच नसल्याची माहिती मिळाल्यानंतर मी धुळेकर संघटनेने दुरदर्शन संच भेट दिला. वसतिगृहात राहणा-या विदयार्थ्यांचे मनोरंजन व्हावे, दैनंदिन घडामोडी त्यांना माहिती व्हाव्यात. त्यांच्या ज्ञानात भर पडावी या उध्देशाने दुरदर्शन संच देण्यात आला, अशी माहिती संघटनेतर्फे देण्यात आली. वसतिगृहाला दुरदर्शन संच मिळाला म्हणुन वसतिगृह चालकांनी देखील मी धुळेकर संघटनेचे आभार व्यन केले. यावेळी मी धुळेकर संघटनेचे अध्यक्ष निरंजन भतवाल, छोटू पोतदार, दिनेश वाघ, विशाल गायकवाड, आफ्रिदी शेख, वसतिगृहाचे अधीक्षक संजय सरदार उपस्थित होते.

# नंदुरबारला गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार प्रचार रथाचा जिल्हाधिकारी डॉ.सेठींच्या हस्ते शुभारंभ

**शहादा, दि.१९ (प्रतिनिधी) - भारतीय जैन संघटनेतर्फे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या योजनेचा जिल्ह्यात प्रचार करण्यासाठी प्रचार रथाला जिल्हाधिकारी मिताली शेठी यांनी काल जिल्हाधिकारी कार्यालय आवारात झेंडा दाखवून शुभारंभ केला.**



सदरील प्रचार रथ जिल्ह्यातील १२० गावांना प्रत्यक्ष जाऊन तेथील सरपंचाना भेटून योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक फॉर्म उपलब्ध करुन देतील. १२ दिवसांच्या या प्रचार कार्यक्रमात नंदुरबार-३०, शहादा-३१, घडगांव-१२, अक्कलकुवा-१२, तळोदा-१७, नवापूर-१८ गावांना रथ थांबून गाव प्रमुखांच्या भेटी घेतील. या शिवाय रस्त्यात येणाऱ्या इतर ३० गावातून प्रचाररथ प्रचार करत जाणार आहे. धरणातून गाळ काढून त्याची पाणी साठवण क्षमता वाढवणे, सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शेतीची प्रत सुधारण्यासाठी उपलब्ध करुन देणे या प्रमुख मुद्यांचा प्रचार करण्यात येईल. यावेळी जि.प.मुख्यकार्यकारी आधिकारी सावनकुमार, डॉ. कांतीलाल टाटीया, ॲड. अल्पेश जैन, नरेश कांकरीया, प्रकाश कोचर, राजनभाई शाह, सतीषकुमार जैन, जेठमल अब्बानी, जवाहर लाल जैन, मनोज डागा, अमित डागा, निलेश हिरे, चेतन खैरनार उपस्थित होते. भारतीय जैन संघटनेस या योजनेच्या प्रचारसाठी सुहाना स्पाईसेस यांनी सहकार्य केले.

# सामोडे येथील टरबूज गुजरातच्या बाजारपेठेत दाखल



**पिंपळनेर, दि.१९ (प्रतिनिधी)- शेती करत असताना तिला नियोजन आणि आधुनिकतेची जोड दिल्यास चमत्कार घडू शकतो, अशी उदाहरणे आजवर अनेकवेळा दिसून आली आहेत. असे एक उदाहरण सध्या साक्री तालुक्यातील सामोडे येथे देखील दिसून येते. येथील प्रयोगशील शेतकरी संजय आनंदा घरटे यांनी अडीच एकर क्षेत्रात ६५ दिवसांत तब्बल ३ लाख ४० हजारांचे टरबुजाचे उत्पन्न मिळवण्याची किमया साधली आहे. त्यांच्या शेतातील टरबूज थेट गुजरातच्या व्यापाऱ्यांनी खरेदी केल्याने ते गुजरातला निघाल्याचे दिसून येते.**

संजय घरटे यांनी अडीच एकर क्षेत्रावर टरबूज पीक घेत यंदा चांगला नफा कमवला आहे. वेगळे पीक घेण्याचा त्यांचा प्रयत्न चांगलाच यशस्वी झाला आहे. दरवर्षी कापूस, मका पिकांसह इतर लागवड घरटे करतात. परंतु, कपाशी पिकात त्यांना अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने टरबूज शेती करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वीही त्यांनी शेतात टरबूज, पपईची लागवड केली होती.

टरबूज पीक ६५ दिवसांचे झाल्याने वेलांना चार ते सहा किलो वजनाची फळे लागली आहेत.व्यापाऱ्यांमार्फत सध्या नऊ रुपये किलो दराने तोडणी करण्यात आली आहे. गुजरात, राजस्थान यासह इतर राज्यांत उन्हाळ्यामध्ये प्रचंड तापमान असते. त्यामुळे त्या परिसरामध्ये टरबुजाची मागणी मोठ्या प्रमाणात असते. त्यात पहिल्या तोडणीला ३५ टन टरबूज निघाले.चारशे रुपये टनप्रमाणे तोडणी गाडी भरण्यासाठी खर्च आला. शिवाय आणखी १० ते १५ टन टरबूज निघण्याची शक्यता आहे.

# व्यापाऱ्यास मारुन टाकण्याची धमकी

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- दारु पिण्याकरीता पैशांची मागणी करीत पैसे न दिल्यास मारुन टाकण्याची धमकी दिल्याच्या कारणावरुन विकास उदय ठाकरे याच्या विरोधात नंदुरबार शहर पोलिसांत फिर्याद देण्यात आल्याने एका विरुध्द. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंदुरबार शहरातील बसस्थानकातील शॉपींग कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या खुशी मोबाईल मध्ये १७ एप्रिल रोजी राहूल प्रकाश डिंगवाणी यांना धमकी देण्यात आली. १०० रुपये दारु पिण्यासाठी दिले नाही तर डोक्यात दगड मारुन हत्या करीन,अशी धमकी देण्यात आली.त्यानंतर त्याने दगड आणून अश्लील शिव्या देण्यास प्रारंभ केला.

# शिंदखेडा तहसिल कार्यालयात ऑनलाईन कामांचा होतोय खोळंबा

**बेटावद, दि.१९ (प्रतिनिधी) - शिंदखेडा येथील तहसील कार्यालयात ऑनलाईन शिधापत्रिकांसाठी गावागावातील नागरिकांना फेरफटका मारावा लागतो आहे.**

शिंदखेडा तालुक्यातील लोकांची पुरवठा विभागात ऑनलाईन साठी तोबा गर्दी दिसून येत आहे. मात्र नागरिक सुविधांपासून वंचित असून संताप व्यक्त करत आहे. सर्वत्र आधार कार्ड लिंक करण्याससह शिधापत्रिका ऑनलाईन करण्यावर सरकारने बंधनकारक केले आहे. जेष्ठ नागरिकांबाबत अनेक योजना केंद्रासह राज्य सरकार जाहीर करतात. मात्र एकही योजना पदरात पडत नसल्याच्या असंख्य तक्रारी येत आहेत.तसेच रेशन कार्ड ऑनलाइन करण्यासाठी शिंदखेडा पुरवठा शाखेत नागरिक मोठ्या प्रमाणात गर्दी करीत असून तासंतास रांगेत उभे राहून त्रास सहन करावा लागत आहे. ऑनलाइनच्या जमान्यात तडकाफडकी काम करणे गरजेचे असताना काम होत नाही. आयुष्यमान भारत योजनेपासून हजारो नागरिक वंचित आहेत. याबाबत तहसीलदारांनी विशेष दखल घेऊन नागरिकांची विविध योजना पासून होणारी हेराफेरी थांबवावी यासाठी व्हाईस ऑफ मीडिया शिंदखेडा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रदीप दीक्षित, उपाध्यक्ष भूषण पवार, मनोज गुरव, जितेंद्र सूर्यवंशी आदी पत्रकारांनी मागणी केली आहे.
















## शब्दकोडे क्रमांक : २१४२



**आडवे शब्द :** १.मंथन ३.नवीन ४.कोना ६.एक हिंदी सिनेमा 'काय - छे' ७.सावली ९.मोजदाद करण्याचे प्रमाण १०.रान १२.गुरांचा जमाव १३.कामाच्या व्यस्ततेतून जपलेली आवड १४.तोफगाडी १५.मुंडके १६.नवीन १८.अलमारी २०. रश्शी २१.गरीब २३.माराचे वण २४.आणि २५.कर २७.हवन २९.अबोला ३१.दादर ३२.प्रवाह ३३.एखाद्या ठिकाणी राहणारा, मूळचा ३६.एकसारखेपणा ३७.बारीक अंगकाठीचा ४०.वेगाने ४१.बनारस ४२.प्रजात ४४.पटल ४५.मिश्रण ४६.व्दार ४८.हिंदीत-□ोध ४९.इंग्रजी वर्ण मालेतील दुसरा वर्ण ५०.अंड न जिरवलेला घोडा ५१.तो-विरुदध

**उभे शब्द :** १.चपला २.रसरशीत ३.दुर्ग ४. निसर्गाची अवकृपा ५.दशानन ८.हजामत ९.कैफ आणणारे ११.चौघडा १२.कमरेला बांधण्यात □णारा दोरा १४. भात शिजताना □णारा आवाज १७.चामड्याची बारीक पट्टी १९.एक चतुर्थांश भाग २२.नेत्रसुखद दृश्य २५.दक्ष २६.जन्म २८.नारळ फोडण्याचे साधन ३०.शिवरा□ांसाठी त्यांचे सोंग घेऊन पन्हाळ गडाच्या पा□थ्याशी गनिमांस भेटण्यास गेलेला मावळा ३४.एक मराठी सिनेमा 'डबल --' ३५.घटना ३६.हळू हळू ३८.द□ाळू ३९.तलवारीचा जोडीदार ४०.वाढ ४३.शिक्षा ४४.पा□ ४७.स्वर

### शब्दकोडे क्रमांक : २१४१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | वा | ज | | खो | त | | के | स | र | | दा |
| म | | ल | बा | ड | | पो | क | | वा | य | दा |
| दा | न | | बा | | पं | त | | मा | | म | |
| र | | को | | जा | गा | | रा | ज | मा | | पा |
| | ह | त | ब | ल | | त | वा | | ग | व | त |
| वा | | वा | ट | | थो | डा | | पा | | त | ळ |
| चा | व | ल | | चि | | खा | रे | पा | ट | न | |
| | ट | | क | व | ट | | घ | | का | | मा |
| नी | | मै | | ट | | मि | | प | ट | क | न |
| ता | व | दा | न | | का | त | र | | क | म | |
| | र | न | | शं | | वा | ह | न | | त | र |
| त | ण | | मा | ख | न | | ना | | ची | र | |

रविवार दि.२० एप्रिल२०२५

आपला महाराष्ट्र

www.aplamaharashtra.in

# बहर

## पेडोंगी

योगेश शुक्ल
मो. ९६५७७०१७९२

भारतीय सैन्यासाठी अविरत कष्ट उपसणाऱ्या, आपल्या जीवाची पर्वा न करता स्वामिनिष्ठेने शत्रूराष्ट्राच्या गोळ्यांच्या वर्षावातही आपल्या पोस्टवर रिपोर्टिंग करणाऱ्या एका स्त्रीलिंगी खेचराची ही गोष्ट. तिच्या पराक्रमाची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे अशा पेडोंगी या भारतीय सैन्यातील खेचराने आज दि. २५ मार्च रोजी अखेरचा श्वास घेतला. बऱ्याच लोकांना माहित नाही की, सरहद्दीवर भारतीय सेनेचा एक मजबुत कणा खेचर असतात, ते सैन्यासाठी माल वाहतुक करतात.

पेडोंगी नाव वाचून आपण बुचकळ्यात पडू. पेडोंगी हे नाव एका स्त्रीलिंगी खेचराच आहे. सीमेवर, जिथे वाहतुकीची साधने म्हणजे रोड नसतात, रेल्वे लाईन नसते, तिथे सैन्याला दारुगोळा, उपजिवेकेची सर्व साधने, इंधन इत्यादी, वाहतुकीचे कामे खेचर करतात. पेडोंगी नावाचे खेचर कोणी साधंसुधे खेचर नाही, तर भारताच्या संरक्षणात आपलं आयुष्य तिने वेचलं आहे. जेव्हा दळणवळणाची साधने सुकर नव्हती तेव्हा भारतीय सेनेत ६००० पेक्षा जास्ती खेचर काम करत होते.


भारताची सरहद्द उत्तरेत हिमालयाच्या उंच शिखरांनी वेढलेली आहे. समुद्रसपाटीपासून उंच १७,००० फुटापर्यंत उंच शिखरांवर भारतीय सैनिक डोळ्यात तेल घालून भारताच्या सरहद्दीची रक्षा करत असतात. भारतीय सेनेच्या अनेक पोस्ट अश्या ठिकाणी आहेत ज्या ठिकाणी कोणतच वाहन आजही जाऊ शकत नाही. तिकडे स्वतः चा जीव वाचवणं हीच मोठी कसरत असते, अशा भागात दारुगोळा, रसद आणि इंधन अश्या गोष्टी वाहून नेणं किती कठीण असेल ह्याची आपण कल्पना करू शकत नाही.

'पेडोंगी' चं खरं सैनिकी तिचं नाव होतं. तिचं खरं नाव होतं क्रेम्र तिचा स्टाफ नंबर १५३२८ होता. १९६२ साली पेडोंगी भारतीय सैन्यात दाखल झाली. त्या काळात आधुनिक संपर्क प्रणाली आणि प्रगत अशी वाहन नसताना भारतीय सैन्याची सगळी दारोमदार खेचरांवर अवलंबून होती. बॉम्बच्या स्फोटात, गोळ्यांच्या वर्षावात, निसर्गाच्या प्रतिकुल परिस्थितीला न जुमानता पेडोंगी आणि तिच्या सहकाऱ्यांनी भारतीय सैन्याला रसद पुरवण्याचं आपलं काम इमानइतबारे पार पाडलं.

१९७१ साल उजाडलं. भारत– पाकिस्तान युद्ध सुरु झालं. भारतीय सेनेला रसद पुरवताना पेडोंगीला पाकिस्तानी सैन्यांनी पकडलं आणि आपल्या पोस्टवर तिला बंदी बनवून तिच्यावर पाकिस्तानी सैन्याला मदत करण्यासाठी जुंपलं. कोण सांगते प्राण्यांना भावना नसतात? भारताच्या सरहद्दीच्या रक्षणासाठी आपला जीव धोक्यात टाकणारी पेडोंगी संधी मिळताच पाकिस्तानी सैन्याला गुंगारा देऊन आपल्या पाठीवर असणाऱ्या मिडीयम




मशीनगन आणि दोन बॉक्स गोळ्यांसकट निसटली. आपल्या जिवाची पर्वा न करता गोळ्यांच्या वर्षावात जवळपास २५ किलोमीटरचे अंतर कापून (२५ किलोमीटर अंतर १७,००० फुटावर पाठीवर एक मशिनगन आणि दोन बॉक्स गोळ्यांचं वजन घेऊन धावणं ते ही शत्रूच्या प्रदेशात काय असेल ह्याचा आपण विचारही करू शकत नाही.) भारतीय हद्दीत प्रवेश करून भारतीय पोस्ट वर आपली हजेरी नोंदवली.



तिच्या प्रामाणिक आणि आपल्या देशासाठी असलेल्या प्रेमाला बघून भारताच्या त्या पोस्टवरील बटालयीन कमांडरने आपल्यावर असणाऱ्या ऑफिसरना पेडोंगीच्या पराक्रमाची दखल घेण्याची शिफारस केली. १९८७ ला पेडोंगी भारतीय सेनेच्या ८५३ AT Company ASC मध्ये काम करत होती. त्याकाळात २९ वर्षाची असणारी पेडोंगी सर्वात वयोवृद्ध खेचर होती पण त्या वयातही आपल्या पाठीवर सामान जवळपास १७,००० फूट उंचीवर वाहून नेत होती. युनिटचे कमांडिंग ऑफिसर मेजर चु–नीलाल शर्मा ह्यांना पेडोंगीच्या पराक्रमाची नोंद घेताना तिला सामान वाहण्यापासून मुक्त केलं. तिची ऑफिशियल नियुक्ती ५३ AT Company ASC कंपनीची (देवदूत) ताईत म्हणून केली. ह्या युनिटच्या १९८९–९० च्या ग्रिटींग कार्डवरही पेडोंगीला तिच्या सेवेसाठी स्थान दिलं गेलं. ह्याच युनिटसोबत तिची नियुक्ती बरेली, उत्तरप्रदेशमध्ये झाली. इथल्या खूप मोठ्या परीसरात पेडोंगीने आपला उर्वरित काळ आरामात व्यतीत केला.

१९९२ ला पेडोंगीला एका खास कार्यक्रमासाठी दिल्लीला नेण्यात आलं. तिथे २२३ व्या कॉर्प्स दिवसाच्या कार्यक्रमात पेडोंगीला तिच्या पराक्रमासाठी, देशसेवेसाठी कर्नल गिरधारी सिंग ह्यांच्या हस्ते मखमली निळ्या घोंगडीने सन्मानित करण्यात आलं. त्याच वेळेस तिला 'पेडोंगी' हे नाव देण्यात आलं. उत्तर सिक्कीममध्ये असलेल्या पेडोंग ह्या युद्धभूमीच्या नावावरून तिचं नामकरण करण्यात आलं होतं. भारतीय सेनेत अतुलनीय शौर्य, सेवा देणाऱ्या घोडयांना आजवर नाव देण्याचा सन्मान मिळालेला होता पण पेडोंगी ही पहिली खेचर होती जिला हा सन्मान देण्यात आला. ह्या नंतरचा काळ पेडोंगीने बरेलीलाच व्यतीत केला.

१९९७ ला पेडोंगीच्या सेवेची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली. जगातील कोणत्याही सेनेसाठी सर्वात जास्त कालावधीसाठी सेवा देणारी खेचर असं तिचं नाव सुवर्ण अक्षरांनी कायमच नोंदवलं गेलं. २५ मार्च १९९८ ला पेडोंगीने अतिशय समाधानाने अखेरचा श्वास घेतला आणि भारतीय सेनेतील खेचरांच्या सेवेतील एका युगाचा अंत झाला.

असं म्हणतात की खेचराला एकदा रस्ता दाखवला की पुढल्या संपूर्ण आयुष्यात तो तुम्हांला रस्ता दाखवेल. पेडोंगीचा पराक्रम अभूतपूर्व असा होता. आपला शत्रू कोण, मित्र कोण हे ओळखत संपूर्ण आयुष्य तिने १७,००० फुटावर भारतीय सरहद्दीची रक्षा करणाऱ्या सैनिकांसाठी वेचलं. ही पण एक प्रकारची देशभक्तीच आहे. कोणी म्हणेल की पेडोंगीला रस्ता माहीत होता म्हणून परत आली. पण मग एकटी तीच का परत आली? तिच्यासोबत इतर पकडलेली खेचर आली नाहीत, पण ती जिवावर उदार होऊन परत आली.

पेडोंगीला आज जाऊन अनेक वर्षाचा कालावधी झाला पण आपलं जिवन भारतासाठी समर्पित करणारी पेडोंगी भारतीयांच्या मनात आजही उपेक्षित आहे ही एक खंत आहे. तिचा भीमपराक्रम, देशभक्ती आणि कार्य हे शब्दांपलीकडचं आहे. देशासाठी आपलं आयुष्य वेचणाऱ्या पेडोंगीला आमचा कडक सॅल्यूट.

## माझ्या आठवणीतील धुळं

विश्राम बिरारी
धुळे, मो. ९५५२०७४३४३

आमचं धुळं म्हणजे धुळंच आहे राव ! कुठ्ठेही जा किंवा कित्तीही लांब जा धुळ्याची सर येणारच नाही . असं मी नाही म्हणत हं ! ' पण धुळेकरच म्हणतात . कारण धुळेकरांच्या हृदयात ओलावा आहे हो .. पुर्वी आग्रारोड ची रहदारी शहरातूनच होती . आज ज्या शहरा बाहेरून गाड्या जातात तेव्हा बायपास वगैरे काही ही नव्हते . तेव्हा मूळात फारशी रहदारी नव्हती हेवी ट्रक्स गावातून जायचे . मुंबईच्या आलिशान कार गावातून जायच्या . धुळे शहरात तांगे होते . फोर व्हिलर्स फार मोजक्या लोकां कडे होत्या . तेव्हा मोटर सायकली पण धुळ्यातच काय पण कुठेच दिसत नव्हत्या. तेव्हा लोकां कडे सायकली होत्या . तेव्हा जुने धुळे ' नवे धुळे ग नं . ४ ' ५ ' ६ व खोल गल्ली नगर पट्टी ' चर्नी रोड ' मच्छी बाजार मौलवी गंज ' मोगलाई ऑण्टी च्या बंगल्या पर्यंत देवपुरात चर्च पर्यंत व आग्रारोड देवपुरात गेल्यास विटा भट्टी पर्यंतच धुळ्याची सीमा होती. धुळ्यात एकमेव कापडाची प्रताप मिल होती. सक्काळी सातचा भोंगा होताच मिल कामगारांची सायकलवर जाण्याची लगबग असायची . पण आता ती कापडाची मिल देखिल बंद पडली . धुळेकरांचे दुर्दैवंच म्हणावं लागेल ! धुळे रेल्वे स्टेशन वरून धुळ्याहून चाळिसगावला जाण्यासाठी आमची एकमेव रेल्वे धावत होती. तिला धुळ्यातील लोक गमतीने बाबा गाडी म्हणत. धुळे नगर पालिकेचा रात्रीचा साडे आठ वाजता एक भोंगा वाजायचा . दुकानदारांना तो ईशारा होता साडे आठ झालेत चला दुकाने बंद करा आणि सर्व दुकाने रात्री च्या साडे आठ वाजता शॉप्स ऍक्ट प्रमाणे बंद होत असत . ती दुकाने आणि दुकानदार सुद्धा अजुन ही आठवतात . गांधी पुतळ्याच्या पाटा जवळील प्रमोद वस्त्र भांडार ' दाळ्या वाल्या ' जुन्या जमान्याचे लोकमान्य रेस्टॉरंट ' बंग रेडिमेड ' प्यारेलाल यांचे किराणा दुकान ' न्यु क्लॉथ स्टोअर्स ' सुनील वॉच ' गोविंद कं . समोर चे मलबार हॉटेल ' आदर्श पुस्तकालय ' फिदाअली ण्ड सन्स ' रुपला चिंधु यांचे सायकल दुकान सुजाउद्दिन फटाके ' घेला भाई नानजी ' दीक्षित कं . फुलांची दुकाने दत्तात्रय कंपनी ' भतवाल स्टोअर्स ' वर्धमान टी ' आणखी भरपुर महत्वाची दुकाने आहेत व होती सर्वच नावे घेणे शक्य नाही मोजकीच या साठी म्हणतोय हे ओळखीचे स्पॉट होते. कुठे रे? अरे ' बॉम्बे लॉज जवळ फुलांच्या दुकाना जवळ वर्धमान जवळ किवा कराची वाला खुंट ही नावे धुळे करांच्या अगदी तोंडवळणी पडली होती . तसा मथुरा भुवनचा रस्सा वडा ' आणि गोपाल टी हाऊसचा चहा धुळेकर विसरलो नाहीत . महाजनचा गोटी सोडा व शुक्ल यांचा गोटी सोड्याचा क 'र्कश्श आवाज अजुन कानात घुमतोय . आता धुळ्यातील दुकानांचा विषय निघालाच आहे तर गमतीशिर विषय मी आपल्या पुढे मांडणार आहे . जुन्या जाणत्या लोकांना तो बहुधा माहित असेलच. बघु या काय ते . अलिकडे ' मॉल ' संस्कृती वाढीस लागतानां दिसत आहे . एकाच छता खाली सर्व सर्व म्हणजे किराणा इलेक्ट्रिक साहित्य ' कपडे बेडशिटस् खेळणी ' चपला बूट ड्रेस मटेरियल्स ' या सर्व वस्तु ' माल्स मध्ये हल्ली सहज उपलब्ध होत असतात . प्रत्येक मोठ मोठ्या शहरां मध्ये मॉल्स उभे राहिलेत . त्या मॉल्स मध्ये प्रचंड गर्दी असते . पण मला सांगतांना माझ्या धुळ्याचा अभिमान वाटतो माझ्या माहिती प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रथम मॉल ही संकल्पना साठ वर्षां पुर्वी धुळे शहरात श्री . बाबु शेट अग्रवाल यांनी राबवली होती. वाटलं ना आश्चर्य ? धुळे शहरात प्रभाकर टॉकीज समोर सुमारे सत्तर वर्षा पुर्वी उंच अशी सहा मजली भव्य बिल्डिंग बांधली . धुळे शहरातील सर्वात उंच अशी ही ईमारत होती . आणि ही ईमारत बघण्यासाठी आजु बाजुच्या खेडयातील लोक बैलगाड्या जुंपून यायचेत . बैलगाड्या या साठी म्हणतोय तेव्हा शहरात येण्यासाठी इतर कुठलेही साधन नव्हते .



एस टी महामंडळ देखिल तेव्हा अस्तित्वात नव्हते.

पुढे त्या सहा मजली इमारतीत स्व.श्री. बाबुशेट यांनी एम् शेट डिपार्टमेंट सुरू केलय. तेथे प्रत्येक मजल्यावर आज जी मॉल संस्कृती बघायला मिळते ती कल्पना राज्यात सर्व प्रथम धुळे शहरात साठ वर्षां पुर्वी राबवली गेली . प्रत्येक मजल्यावर टाचणी पासुन तर रेडिमेड कपड़े ' ड्रेस मटेरियल्स ' अन्न धान्य ' गरजेच्या वस्तु ' म्युझिकल्स साहित्य 'लाकडी फर्निचर ' इलेक्ट्रिक साहित्य सर्व सर्व साहित्य या एम् . शेट डिपार्टमेंट मध्ये मिळत होती. या डिपार्टमेंट मध्ये काय मिळत नव्हते हे फक्त विचारा. आणखी दुसरी सुरेख कल्पना बाबु शेट यांच्या डोक्यात पक्की बसली होती. आणि त्या दृष्टिने त्यांनी त्यांची पावले उचलली होती. धुळे शहरापासून मुंबई कडे जातानां आर्वी या गावाच्या पुढे मित्रनगर येथे फिल्म सिटी निर्माण करण्याची त्यांची कल्पना होती. बाबु शेट यांनी तीन मराठी चित्रपटांची निर्मिती केली . पैकी एक होता कोण कुणाचं . त्यात त्या वेळची मराठीतील आघाडीची नायिका रेखा' यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. नंतर विठ्ठल पायी हा धार्मिक मराठी चित्रपट निर्माण केला होता. रेल्वेस्टेशन हा त्यांचा पहिला मराठी चित्रपट. नंतर त्यांनी त्या वेळची आघाडीची हिंदी चित्रपटातील अभिनेत्री वैजयंतीमाला यांना घेवून जलती निशानी ' . ह्या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली होती . हा चित्रपट प्रभाकर टॉकीज मध्ये मी स्वतः पाहिला होता . धुळ्यात एम . शेट नंतर चित्रपट क्षेत्रात मला पण चालून संधी आली होती . यात स्वतः ची प्रौढी न मिरवता लिहिण्याचे धाडस करतो . मराठीतील आघाडीच्या अभिनेत्री अल्का ताई कुबल यांना घेवून यांच्या प्रमुख भूमिकेतील खान्देशातील ग्रामदेवतेच्या माहितीवर आधारीत ' कानबाई माझी नवसाची ' हा भव्य दिव्य सिनेमास्कोप मराठी चित्रपट धुळे करांच्या साक्षीने ३१ जुलै २००९ साली धुळ्याच्या प्रकाश टॉकीज मध्ये धुमधडाक्यात प्रकाशन समारंभाने प्रकाशित केला होता. चित्रपटाचे निर्माते कृणाल म्युझिक कंपनीचे मालक जयेश भाई वीरा दिग्दर्शक सुभाष घोरपडे ' स्वतः अभिनेत्री अल्का ताई कुबल यांचेसह या चित्रपटातील सर्व कलावंत या प्रकाशन समारंभाच्या कार्यक्रमात प्रकाश टॉकीज मध्ये हजर होते माझ्या घरून कानबाई अल्का ताईंच्या हस्ते पूजना नंतर रथात मिरवणुकीने प्रकाश टॉकीज मध्ये या कार्यक्रमाला सर्व पक्षाचे धुळेकर हजर होते . या नंतर माझ्याच कथेवर आधारीत दुसरा मराठी चित्रपट काळुबाई पावली नवसाला ' या चित्रपटात देखिल प्रमुख भूमिकेत अल्का ताईच होत्या हा दुसरा चित्रपट साताऱ्या जिल्हयात मांढरगड येथे प्रकाशित केला होता . दोन्ही मराठी चित्रपट धुळ्या सारख्या आडवळणाच्या शहरात साकारू शकलो हा माझ्या साठी चालून आलेला मोठ्ठा सुवर्ण योग होता . धुळे करांचे व जगदिश दादा देवपुरकरांचे सहकार्य मोलाचे होते म्हणुन माझा कानबाई माझी नवसाची हा चित्रपट सलग सहा आठवडे धुमधडाक्यात चालला.

धुळे शहरासाठी भूषणावह बाब म्हणजे धुळ्यातील काही कलाकारांनी मराठी हिंदी चित्रपटात भूमिका केल्या होत्या . विश्वास कुंटे ' मारूती पेहलवान ' शारदा धुळेकर धरमपाल भाटिया ' नथनदादा पिंटो व सखाराम बोरसे . विश्वास कुंटे नगर पट्टीला रहायचे . त्यांनी क्रान्तीवीर वासुदेव बळवंत फडके या मराठी चित्रपटात मुख्य भुमिका केली होती . त्या नंतर सिता और गीता आणि सच्चा और झुटा या हिंदी चित्रपटात छोट्या भूमिका केल्या होत्या. मारुती पहेलवान सातव्या गल्लीत रहायचे. मूक चित्रपटापासून भूमिका ते करीत असत. ते गायक पण होते . त्या वेळी अभिनेत्यास गावे लागत असे .शारदा धुळेकर या भारतातील आंतरराष्ट्रिय किर्तीच्या ध्रुपद धमार गायिका होत्या. कलकत्या सारख्या शहरात शास्त्रीय गाण्याचे त्यांचे अनेक कार्यक्रम झाले होते. जुने अभिनेते मोतीलाल ' सुरेश अशोक कुमार या अभिनेत्यां बरोबर त्यांनी भूमिका केल्या होत्या . काही चित्रपटांमध्ये त्यांनी पाशर्वगायन देखिल केले होते . आमचे भाग्य माझी कन्या ऋचा ला त्यांच्या संगीताचा लाभ झाला व प्रत्यक्ष त्या एक दोन वेळा घरी पण आल्या होत्या . धरमपाल भाटिया न्यु सिटी हायस्कुल शेजारी ज्योती पंजाब नावाचे त्यांचे हॉटेल होते . तत्पुर्वी ते मुंबईला खालसा कॉलेजला शिकायचे . जितेंद्र त्यांचे खास मित्र एकाच कॉलेजला शिकायचे जितेंद्र बरोबर व्ही . शांताराम यांच्या बूंद जो बन गये मोती व गीत गाया पत्थरोने या हिंदी चित्रपटात काम केले होते . धरमपाल आमचे चांगले स्नेही होते.

नथ्थन दादा पिंटो यांचे राजकमल टॉकीज शेजारी हॉटेल होते . काही सिंधी चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या होत्या . व जलती निशानी या बाबु शेट यांच्या चित्रपटात छोटीशी भूमिका केली होती . सखाराम बोरसे ' धुळ्यातील एका गरीब घरचा मुलगा तांग्या वाल्याचा मुलगा घरातून मुंबईला सिनेमाच्या आकर्शणामुळे पळून गेला . मुंबईत ऋषीकेश मुखर्जी यांच्या ऑफिस मध्ये ऑफिस बॉय म्हणुन कामाला लागले . परंतु पुढे ऋषीदांचा विश्वास संपादन केल्या मुळे संकलन काम करू लागले . दिलीप कुमार यांनी अभिनय केलेला मधुमती या हिंदी चित्रपटाचे संकलन ( एडिटिंग) कामात सहसंकलक म्हणुन काम पाहिले . बऱ्याच चित्रपटांचे त्यांनी संकलन केले होते. सखाराम या नावाने ते प्रसिद्ध झाले होते. स्वतः स्वागत वर आमच्याशी चर्चा करतांना विठ्ठलराव राणा दादा व आम्हांला त्यांनी ही माहिती कथन केली होती. धुळ्यात अनेक थोर व संत विभूतींनी भेटी दिल्या आहेत . १९४७ / ४८ साल असावे बहुधा. मी खूप लहान होतो तेव्हा धुळ्याच्या गरुड हायस्कुल च्या मैदानावर श्री संत गाडगे महराजांच्या किर्तनाचा लाभ धुळेकरांना झाला होता . तेव्हा त्यांच्या दर्शनाचा लाभ झाल्याचे मला पक्के आठवते. दै.आपला महाराष्ट्रचा प्रकाशनाचा कार्यक्रम मला अजुनही जस्साच्या तस्सा आठवतो. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्तिक दै मराठाचे संपादक 'शामची आई' चित्रपटाचे निर्माते आचार्य प्र. के अत्रे साहेब यांच्या शुभ हस्ते व धुळ्यातील काही मान्यवरांच्या उपस्थितित लोक मित्र स्व.भाई मदाने यांनी आयोजित केला होता. वीर सावरकर मार्गावर भव्य स्टेज उभारले होते. प्रचंड जनसमुदाय या प्रकाशनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते . दुसऱ्या दिवशी प्र.के. अत्रे जुन्या धुळ्यातील त्र्यंबक वाळिंबे सरांकडे बऱ्याच लोकांनी त्या वेळी पाहिले. वाळिंबे सर त्यांचे सख्खे मेहुणे होते. वाळिंबे सर कुंभार खुंटावर **(पान ६ वर)**

## प्रांजळाचे आरसे

प्राचार्य डॉ.कृष्णा पोतदार
मो.९४२२८९५४६५



### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान म्हणजेच समतामुलक भारताचे स्वप्न



माझं एक स्वप्न आहे की, एक दिवस दऱ्याखोऱ्यात आनंद असेल, पर्वतरांगा आणि शिखरे नम्र होतील, खडतर रस्ते सोपे होतील, धोकादायक वळणं सहज होऊन जातील. सगळीकडे दैवी आनंद भरून राहिलेला असेल. सगळी मनुष्यजात एक होईल. डॉ. मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) मानवी जीवनात स्वप्नांचं खूप महत्त्व आहे. स्वप्न पाहिल्याशिवाय ध्येय गाठता येत नाही, स्वप्ने ही अनेक प्रकारची असतात. आपण कोणती स्वप्न बघायची हाही एक मोठा प्रश्न आहे. स्वप्न असे असले पाहिजे जे बघितल्यानंतर आपल्या स्वतःतच अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. स्वप्न फक्त पाहून चालत नाही. स्वतःच ते स्वप्न होऊन जावं लागतं. मग त्या स्वप्नांना चेहरा मिळतो. शेवटी जग तेवढंच असतं, जेवढं तुमचं डोकं असतं. ते जर तुम्ही भल्या मोठ्या पदावर गेल्यामुळे बदलेलंच असे नाही. त्यासाठी सामर्थ्य लागते ते तुमच्या अप्रोच मध्ये. तुमच्या स्वप्नामध्ये; स्वतःच स्वप्न होऊन जाण्यामध्ये. जगात अशी अनेक माणसं आहेत ज्यांनी अशी मोठ–मोठी स्वप्ने पाहिलीत. केवळ पाहिली नाहीत तर ते स्वतःच स्वप्न होऊन गेलीत. त्यांची स्वप्ने ही सर्वसामान्यांसाठी ऊर्जेची स्तोत्र होऊन गेलीत. अशी स्वप्न पाहणाऱ्यात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने येते. आपल्या प्रचंड ज्ञानाच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्मितीचे कार्य केले. या संविधानामुळे दोन हजार वर्षानंतर भारत देश प्रथमच एकात्म, एकजिनसी झाला. भारतीय समाजव्यवस्थेत शापित व शोषित ठरलेल्या जातीत ते जन्माला आले होते. चातुर्वर्णय व्यवस्थेत आणखी एक पाचवा वर्ण आहे आणि तो म्हणजे अस्पृश्य वर्ग. सुमारे एकपंचमाश लोकसंख्या असलेला हा वर्ग हिंदू धर्माचा एक भाग असला तरी त्यांचे जीवन निराश्रीत व गुलांमपेक्षाही भयंकर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानव्यशास्त्र अशा अनेक उच्च पदव्या जगातील श्रेष्ठ अशा विद्यापीठातून संपादन केल्या. अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामाला त्यांनी हात घातला. उच्चशिक्षित असूनही सामाजिक भेदाभेदाचे प्रत्यक्ष कटू अनुभव त्यांना स्वतः आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे स्वप्न पाहिलं होतं ते म्हणजे समतेचे स्वप्न समतायुक्त हिंदू समाज ही आपल्या सर्वांची निकड झाली पाहिजे आणि ती व्यवहारातूनही व्यक्त झाली पाहिजे. किंबहुना प्रत्येकाने आपल्या वैयक्तिक पातळीवर सामाजिक समतेचा अंगीकार केला तर सामाजिक पातळीवर त्याचे प्रतिबिंब उमटायला वेळ लागणार नाही अशी त्यांची धारणा होती. आपला हिंदू समाज समतेच्या अधिष्ठानावर उभा राहावा आणि जातीभेद, अस्पृश्यता, अनिष्ट रुढी–परंपरांच्या त्याग करून आपण सर्व समान आहोत ही धारणा सर्वांच्या मनात रुजावी यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. प्रबोधन, कृती आणि नकार या तिन्ही मार्गांनी त्यांनी समतेचा आग्रह धरला होता. आज अजूनही हे स्वप्न पूर्णत्वास आलेले नाही. ते पूर्ण करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वतः बाबासाहेबांची आपल्या स्वप्नांबाबत अशी इच्छा होती की, लोकांना संघटित करून आपल्या मूलभूत हक्काप्रती जागरूक करावे आणि त्यातून समतायुक्त हिंदू समाज, पर्यायाने हिंदू धर्म पुन्हा नव्याने साकार करावा. यासाठी ते अथक प्रयत्न करत होते. त्यांनी त्यावेळेच्या परिस्थितीचे चित्रण करताना लिहिले आहे– सद्यः स्थितीतील हिंदू धर्माची दोन अंगे आहेत– एक तत्त्वज्ञान दुसरे आचार. त्यापैकी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने जरी अस्पृश्य लोक स्पृश्य समान असले तरी आचाराच्या दृष्टीने ते असमान नव्हे अपवित्र आहेत. म्हणून त्यांच्याशी व्यवहार करणे हा अधर्म आहे. १९२४ मध्ये बाबासाहेबांनी बहिष्कृत हितकारणी संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे केवळ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातीलच कार्यकर्ते होते असे नाही तर तात्कालीन समाजव्यवस्थेतील समतेची जाण असणारे विविध समाजगटांतील लोकप्रतिनिधी सुद्धा होते. ही संस्था स्थापन करतेवेळी बाबासाहेबांचे स्वप्न होते की शतकानुशतके अस्पृश्यांचे जीवन जगणाऱ्या समाजाला त्याच्या अधिकाराची जाणीव करून द्यावी लागेल आणि स्पृश्य समाजाला अशा कामात सकारात्मक भान ठेवून सहभागी करून घ्यावे लागेल. यासाठी त्यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. महाड येथील हे चवदार तळे अस्पृश्यांसाठी कायमचे खुले करून दिले. या सत्याग्रहाच्या अनुभवानंतर त्यांनी अस्पृश्यांना त्यांच्या जन्मसिद्ध हक्कांची जाणीव करून देणारा मानव्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यातील सर्वच कलमे मुख्य आहेत. त्यातले सर्व माणसे जन्मतः समान दर्जाची आहेत व मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. हा अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्थेने सुद्धा याचे पालन केले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या जन्मसिद्ध हक्काप्रमाणे वागण्यास पूर्ण स्वातंत्र्य आहे. व्यक्तीला मर्यादा घालण्यात आली तर ती दुसऱ्या व्यक्तीला तिच्या तशाच प्रकारचा जन्मसिद्ध हक्क उपभोगण्यास अवसर मिळावा इतक्या पुरतीच घालता येईल. ती मर्यादा खुद्द लोकांनी केलेल्या कायद्यांनी ठरवली पाहिजे. जेवढ्या गोष्टी समाजास विघातक होतील, तेवढ्याच कायद्याने बंदी केल्या पाहिजेत. जी गोष्ट कायद्याने मना केली नसेल, ती करण्यास सर्वांनाच मुभा असली पाहिजे. कायदा समतेच्या आधारावर केला गेला पाहिजे आणि तो करताना कुठलीही जात आडवी येता कामा नये. सामाजिक समतेच्या दिशेने घेऊन जाणारा हा जाहीरनामा सर्व भारतीयांसाठी होता, सर्व हिंदूसाठी होता. सर्व भारतीय हिंदू समाजाचे सबलीकरण व्हावे हे त्यांचे स्वप्न होते. समताधिष्ठित हिंदू समाज उभा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राणपणाने प्रयत्न केलेत. धर्माच्या बाबतीतही त्यांना मोठी विसंगती दिसून आली. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. बाबासाहेबांनी बघितले की, हिंदू माणसे ही धर्म आणि देऊळ यांच्याशी जोडली गेली आहेत. त्यांनी जो देव तुमचा तो देव आमचाही आहे अशी भूमिका मांडली. यासाठी १९२६ ला नाशिक येथील काळाराम मंदिरासमोर मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह केला. हा सत्याग्रह जवळपास चार वर्षे सुरू होता. नाशिक प्रमाणे अन्य ठिकाणी सुद्धा असे सत्याग्रह सुरू झाले. त्यांना हे सिद्ध करायचे होते की अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही, मूर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. यासाठी त्यांनी अनेक प्रकारचे पुरावे देणारे लेखन केले पण त्यांना त्यात यश प्राप्त होत नव्हते. यातूनच हिंदूधर्म त्यागण्याची त्यांची मानसिकता तयार झाली आणि १९३५ च्या येवला येथील परिषदेत त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. सातत्याने त्यांचे चिंतन–मनन सुरू होते. जवळपास २१ वर्षानंतर म्हणजे १९५६ मध्ये बौद्ध धम्म स्वीकारला. हा बौद्ध धम्म समतायुक्त असा होता. सामाजिक विषमता, अनिष्ट रूढी–परंपरा तसेच जातीभेद, अस्पृश्यता न मानणारा होता. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समतेचे स्वप्न पूर्ण केले. भारतीय नागरिकांना समान मत, समान पत याचा अधिकार मिळाला. एवढेच नाही तर जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन माणूस हे मूल्य मिळाले. माणूस म्हणून जगण्याचे मूलभूत हक्क मिळाले; त्याला कायद्याचे अधिष्ठान दिले. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून आपले स्वप्न पूर्णत्वास नेले. आपणही त्याचा व्यक्तिगत अंगीकार, आदर करून त्यास आचरणात आणू या !

## ऐका ते खरं

नितीन अहिरराव
मो.९०९६२०४८७५

# कोन गाव परनाले जाशी रे म्हना मानिकलाल

सेल ! सेल !! सेल !!! , ऐका हो मंडई इंजिनिअर ल्या ,डाकटर ल्या , सरकारी नोकर वाला ल्या , पोलीस अधिकारी ल्या, बॅक मॅनेजर ल्या, विमा कंपनीना एजंट ल्या .एकुलता एक पोरे शे , मायबाप वृध्दाश्रममा जावाले तयार शेतस. पोरगाले बहिन नयी शे ,पुनामा टु बीएचके फ्लॅट शे , फिराले चारचाकी गाडी शे ,पो-याले पंधरा लाखनं पॅकेज शे आनी स्वता पदरमोड करीस्नी लगन करानी तयारी शे . घरमा कामले बाया शेतस , आते फक्त लगन करता एक पोरगी जोहिजे . कोनी तयार व्हयी ते फक्त एक फोन करा आम्ही लगनना तयारीमाच शेतस

काय मंडई वाचीस्नी हासु वुना का संताप वुना तुम्हले, ज्याना घर लगनना पोरगा शे त्यास्ले चांगलाच अनुभव वुना व्हयी या गोटना . मंडई पोरे आनी पोरी गनज शेतीस , आनी त्या उच्च शिक्षित पन शेतस तरीभी हाऊ मोठा प्रॉब्लेम बठ्ठास्ले ई करा नंतर भी सवु सवु महिनामा पोरेस्न्या फारकत्या व्हई राहिन्यात , कोनीच नमतं लेवाले तयार नयी शेतस.

ठीक शे ना तुम्हीन शिकेल सवरेल शेतस, चांगला पगार कमाडस पन अस व्हवानं कारन काय ? मंडई माले याना मांगे एक कारन माले वाटस ते म्हनजे आत्तेना पोरेस्मा सहनशीलता नयी शे , नकार ऐकानी मानसिकता नयी शे . एकुलता एक पोरे -हावामुये त्यास्न पालनपोषन, संगोपन लाडकोडमा मायबाप करतस आनी त्यानामुयेच त्यास्ना स्वभाव जिद्दी , हट्टी व्हई जास आनी हाईच मोठेपनमा नडस अस माले वाटस. उच्च शिक्षन मुये चांगल्या पगारनी नौकरी भेटी जास , हातमा पैसा खेयता -हास त्यामुये या तरना पोरे पोरी कोनं म्हननं ऐकाना मनस्थितीमा -हातस नयी आनी त्यानामुयेच हल्ली लगन जमाडनं हायी एक समस्या व्हई जायेल शे .लग्ने जमतत नयी हायी समस्या देखीस्नी याना फायदा लेनारी लुटारु आनी संधीसाधु लोकेस्न्या टोया समाजमा तयार व्हई जायेल शेतीस . या लोके गरजु लोकेस्ले म्हनजे ज्याले लगन करनं शे त्याले आनी त्याना मायबापले बरोबर हेरतस आनी आपला पत्ता फेकतस . आम्हना कडे सुदंर पोरगी शे , त्या पोर बरोबर तुम्हना पो-यानं लगीन लायी दिसुत पन आम्हले दिड ते दोन लाख रुपया देना पडतीन राहिना . यान कारन दोन्हीस्न्या अपेक्षा वाढी जायेल शेतस. खटलं चौकोनी व्हयी जायेल शे , मायबाप आनी एक किंवा दोन पोरे अस खटलं व्हई जायेल शे , एकुलता एक आंडोर किंवा आंडेर -हावामुये परतेक मायबाप त्यास्ले उच्च शिक्षन देतस आनी स्वताला पायवर उभा कराना प्रयत्न करतस , या बठ्ठा प्रक्रियामा पोरेस्ना वय वाढी जातस , आनी लगन कराना टाईमले अडचनी येवाले लागतस . नोकरी वाला पोरेस्न तर जेमतेम लगन जमी जास पन शेतकरी , कारागीर , रोजंदारीवर काम करनारा पोरेसकडे तय कोनी ढुकी भी देखतत नयी . वज्जी वाईट परिस्थिती शे सध्या परतेक समाजमा. पस्तीस चायीस वरीसना ( घोड नवरदेव) कुव्वारा पोरे फिरी राहिनात त्यास्ले पोरीच मियी नयी राहिनात , असा पोरे विधवा, घटस्फोटीत बाई बरोबर भी लगन कराले तयार व्हई राहिनात .काय करनीत बिचारा नाईलाज ले काही ईलाज -हास का ?

पहिले मोठा मोठा खटला -हायेत , एक घरमा पाच पाच सवु सवु पोरे -हायेत , तवय पोटमा पोर शे का पो-या हायी देखानं मशीन नव्हतं त्यामुये पाच पाच पोरी होवा नंतर एखादा पोरगा व्हये आनी आखख कुटुंब पोसायी जाये . परिस्थिती नाजूक -हाये पन समाधान भरपूर मिये , वडिलधारा मानसेस्ना शबदले मान -हाये , आनी त्या सांगेत तठे लगन ठरी जाये आनी लगन भी करनं पडे .आनी त्या लग्ने शेवट पावोत टिकेत आनी आननमा आपला संसार करेत . आते बठ्ठ देखीजोखी लगन



, तुम्हना पो-यानी लगननी गॅरंटी आम्ही लेतस पन तुम्हले तुम्हना हात मोकया सोडना पडी बिचारा उबगेल नवरदेवना बाप त्यानामा फशी जास ,कारन त्याले आत्तेपावोत बराच खडा मारेल -हातस पन त्याना काही नेम लागेल -हास नयी . तो दीड दोन लाख रुपया देवाले राजी व्हई जास . नवरदेवनं लगन जोरदार आनी धुमधडाकामा लागस, नवरीना आंगवर नवरदेवना बापनी दोन तीन तोया सोनं चढायेल -हास , बठ्ठ लगन मस्त पार पडस आनी नवरीनी बिदायी व्हई जास. नंतर खरा खेयले सुरुवात व्हस, ती नवरी पयानी संधी कव्हय मियी यानी वाट देखस , रस्तामा बाथरूम ले जावाना बहाना करीस्नी ती आपला टोयीना लोकेस बरोबर गुपचूप पयी जास . आनी समजा अशी संधी नयी मियनी ते नवरदेवना घर पावोत जास आनी बठ्ठा मौल्यवान वस्तु आनी दागिना लिस्नी पयानी संधी मियताच ती तठेतुन पयी जास . आनी समजा हाई भी नयी जमनं ते पहिलं मुय लेवाना बहानातुन नवरीना साथीदार येतस आनी तिले लयी जातस , ती नवरी जास पन परत येतच नयी . बिचारा नवरदेव तोंड वाशी वाशी तिन्ही वाट देखतस पन ती चिडी कायमनी उडी जास .

मंडई पहिले घरमातला आनी समाजमातला मोठा जेठा लोके सोयरीक कराले मध्यस्थी करेत , मध्यस्थी करनारा लोके मोठा मानकरी -हायेत आनी त्यास्ना शबद सहसा कोनी टाये नयी आनी या मध्यस्थी करनारा मानकरी लोके परस्पर सोयरीक जमाडी येत घर ईस्नी निरोप सांगेत की लगननी तयारी करा मी सोयरीक जमाडी उनु अशी, आनी लगन व्हई जाये .पन मंडई आते परिस्थिती पार बदली जायेल शे , सोयरीक लवकर जमत नयी आनी जमनी तरी ती कितला दिन टिकी यानी गॅरंटी -हास नयी . मायबाप कुढत बसतस, नवरदेवनं वय वाढी जास ,तो आसवर बसेल -हास पन लगन काही जमस नयी . आनी एखादं वयन चुकत माकत उन ते त्यास्न्या आटी ईतल्या -हातीस की विचारता सोय नयी . घर स्वतानं शे का ? वावर शे का ? लगन नंतर पोर कोठे राही ? धल्ला धल्ली पोरगा जोगे राहतीन का ? असा चित्र विचित्र प्रश्न पोरना मायबाप करतस. या बठ्ठ्या अटी मान्य करावर लगन व्हस आनी त्यास्ना संसारले सुरुवात व्हस, मात्र त्याना नंतर या मोबाईलना डबडाना खेय सुरू व्हस , मोबाईल वर बारीक बारीक गोष्टी चावयाले सुरुवात व्हयी जास , जेवनी का ? खादं का ? पिधं का ? सासु काही बोल्नी का ? सासरा काही बोलस का ? सासु काममा मदत करस का ? ननंद नीट वागस का ? नवरा फिराले लयी जास का ? खर्चाले पैसा देस का ? असा ज्याले गांडमेंड काही -हास नयी त्या प्रश्न ईचारतस आनी आपला पोरना संसारमा बिनाकामन्या काड्या कोरतस. मायबापनी फुस -हास त्यामुये ती पोर सासरना लोकेस्ले कवडीमोल समजस आनी आपला सुखी संसारनं वाटोयं करी लेस .मंडई आपला समोर असा कितलाक उदाहरने शेतस की शुल्लक कारन वरथुन त्यास्नी काडीमोड व्हई जास.

मंडई नवरा बायको या संसार रथना दोन चाके -हातस आनी त्या समजी उमजी बरोबर चालनात तरच संसार नेबंन चालस नयी ते आयुष्यनी फरफट व्हई जास. संसार म्हना की त्यानामा धाकल्यामोठ्या कुरबूरी चालुच ऱ्हातीस ; एकमेकले समजीउमजी लेवो आनी काही गोष्टीसकडे दुर्लक्ष करी देवो तवयच हाऊ संसारना रथ शेवटपावोत नेबंन चालस .

शेवट जाता जाता पोरी वालास्ले आनी पोरगा वालास्ले एकच सांगनं शे, पोरेस्नं पॅकेज देखाना बरोबर चांगला मानसेभी देखा, पैसा पेक्षा मानुसकी महत्त्वनी शे, एक दुसराले समजी लेतस त्यालेच सोयरा, सोयरीक म्हनतस. जो घर येल मानुसले पानी भी ईचारत नयी तो सोयरा काय कामना. पोरवाला आनी पोरगावाला दोन्हीस्नी आपली मानसिकता बदली तर पुढला पिढीना संसार सुखमा चालतीन, आनी कोल्डी मोल्डी टेक आनी म्हना धोतर कडे देख असं वागनं राहिन तर काही खर नयी भो. चला मंडई आते मी रजा लेस भेटुत पूढना हप्ताले तवलगुन रामराम. लेख आवडना व्हई ते नक्की फोन करा.

## हास्यगिरी

प्रा.वसंत गिरी
मो.९०११२२९२३२

# विनोदी साहित्यिकांना अग्निपरिक्षा द्यावी लागते

आपले लेखन फार श्रेष्ठ दर्जाचे आहे व आपल्या तुलनेत आपल्या आजुबाजूला लिहिणारे लेखक अगदीचं अतिसामान्य दर्जाचे आहेत असा अहंदर्प काही प्रस्थापित साहित्यिकांना झालेला असतो. त्यामुळे इतरांना अतिहिणकसं समजून हिणवण्याचा त्यांचा उद्य-ोग अविरतपणे सुरु असतो.उद्दात मानवी कार्य करणारे सारस्वत पुत्र जेंव्हा अति संस्कारशून्य पातळीवर येवून एकदुसऱ्याला नाउमेद करण्याचा प्रयत्न करतात.तेंव्हा त्यांचा हेतू प्रतिपक्षाची मान- हानी करणे हा असतो. ज्या मान्यवर व्यक्तीकडून असे गैरवर्तन जाणिवपूर्वक केले जात असेल.त्याला योग्य धडा शिकविण्यासाठी निष्प्रभ करणे खूप गरजेचे असते.नसता अहंवृतीत वाढ होऊन इतरांना नाऊमेद करण्याचा परवाना मला ईश्वरानेच दिला आहे आणि तो आपल्याला स्वर्गात पाचारण करुन अत्यंत सन्मानपूर्वक प्रदान केला आहे.हेच आबाल वृदाच्या मन:पटलावर बिंबवण्यात ते यशस्वी झाले तर त्यांचे प्रस्थ कायमचे डोक्यावर आसनस्थ होणार ही अगदी काळ्या दगडावरची रेष असते.याला विनोदी साहित्यात गालिप्रदान सादर करतांना स्त्री,पुरुष,जात,धर्म,स्वदेश व प्रदेश असा व्यक्ती,स्थल,काल यापासून बंधमुक्त असलेला विनोद व्यापक मानव्यापर्यंत जाऊन पोहचतो.मनुष्य जीवनातील चिरकाल टिकनाऱ्या मानवेतेच्या भव्यतेचे महत्व तो सदैव जाणतो.हा विनोद आपणास अत्यल्प प्रमाणात निदर्शनास येतो. जीथे तो श्रवणसौख्य देतो.तिथे अत्युत्तम प्रसन्नता देवून मानवी मन्मने सुगंधित करतो.माणसाला माणूसपण प्राप्त करुन देतो.मनुष्य जीवनातील विसंगतीना शुद्ध विनोद खूप खूबीने चिरकाल व चिरंतन रुप देवून मानवतेची उंची वाढवतो.

विनोद निर्मितीसाठी भाषा खूप महत्वपूर्ण काम करते.भाषेतीलं वेगवेगळ्या प्रकारच्या शक्तीचा कसा उपयोग करुन घ्यायचा.याचे विविधांगी तंत्र विनोदी लेखकाने अंगीकारलेले असते.वऱ्हाडीभाषेचा उपयोग याच प्रांतातील विनोदी लेखक शंकर बडे,राजाभाऊ धर्माधिकारी, मिर्झा बेग,किशोर बळी,गौतम गुडधे, जंयत चावरे या साहित्यिकांनी कींवा हास्यसम्राटांनी अतिशय खुबीने करुन घेतला.पश्चिम महाराष्ट्रातील शंकर पाटील अलिकडच्या फळीतील सोलापूरचे हास्यसम्राट दिपक देशपांडे,सांगलीचे अजित कोष्टी तर मराठवाड्यातील प्रांतिक भाषेचा विनोदनिर्मिती साठी डॉ लक्ष्मण देशपांडे,डॉ दिलिप घारे,डॉ यशवंत देशमुख,मकरंद अनासपुरे आणि याशिवाय माझ्या साठी अज्ञात असणारे विनोदी लेखक यांनी त्या त्या प्रादेशिक भाषेला महत्व प्राप्त करुन दिले. आणि आपल्या मायबोलीला विनोदविश्वात अजरामर केले.

असे म्हणतात.

एकदा ना सि फडके यांनी आपल्या 'झंकार' वृतपत्रातून य गो जोशी यांच्या लेखनावर टिका कर- तांना लिहिले.जोशी मेले तर महाराष्ट्रातील कुत्रेसुद्धा रडणार नाही.अर्थात य.गो.ना नाउमेद करण्याचा हा प्रयत्न होता.या टिकेने य.गो.अत्यंत अस्वस्थ झाले. आपली व्यथा त्यांनी आचार्य अत्रे यांच्याजवळ व्यक्त केली. अत्रेंचा मेंदू म्हणजे अतीवेगवान पवनसूतच दुसऱ्याच दिवशीच्या ' नवयुग ' मधून फडके मेले तर महाराष्ट्रातील अनेक कुत्र्या ओक्साबोक्सी होऊन रडतीलं. हे विधान करुन धमालं उडवून दिली. फडके खूप खजिलं झाले. अत्रेंनी त्यांच्या हयातीत अनेक दिग्गजांची अशी भंबेरी उडवून दिली.त्या मुळेच तर एक अजरामर विनोदवीर म्हणून त्यांच्या कडे त्यांच्या एकशेपंचविसाव्या जंयती वर्षीही पाहिले जाते.त्यांच्याच भाषेत सांगायचे म्हणजे दहाहजार पंचविस वर्षानंतरही लोक तेवढ्याच कुतुहलाने व आपुलकीने माझ्या साहित्याकडे पहातीलं.

साहित्य व कला प्रांतात अशी काही माणसे असतात. कोणाला कधी कवडीचाही आदर द्यायचा नाही अशी त्यांची बोलण्याची व वागण्याची अजब तऱ्हा असते आणि त्यात ते स्वत:ला खूप ग्रेट समजतात. मी असांच बोलत असतो आणि माझं ते बोलणं व वागणं अगदी वैश्विक सत्यअसते.अशी आग्रही भूमिका मांडणारे महाभाग एका अर्थाने नकारात्मक विचारांचे भरणपोषन करुन प्रत्येकाकडे तुच्छतेने पहाण्याचे अवतारकार्य करत असतात. इतरांचा टोकाचा अपमान करुन आपले विश- ेषत्व सिद्ध करण्याचा त्यांचा अमानवी उद्योग कुपमंडूक प्रवृतीचे भव्य प्रदर्शन करणारा असतो.या प्रदर्शनात आपले कधी आणि किती वस्त्रहरण झाले हेच त्यांना कळतं नाही. त्यांना त्यांच्या जवळची माणसे कंटाळ- लेली असतात. अशा विद्वानांची गणना बुद्धीभ्रष्ट गटात होते.त्यांच्याविषयी आदरशुन्यता निर्माण होऊन सर्व लोक त्यांना टाळण्याचा प्रयत्न करतात. सूक्ष्म निरीक्षण केल्यास असे महाभाग आपल्या आजूबाजूला बरेच असतात.त्यांच्या हट्टी व दुराग्रही वृत्तीमुळे ते विनोदाचा विषय होतात.

विनोदाचे विविध स्वरुप अभ्यासल्यावर शुद्ध विन- ोद कसा असावा ? यासंदर्भाने विचार करणे गरजे- चे ठरते.रा श्री जोग यांच्या मते,शुद्ध विनोद म्हणजे सहानुभूती,द्वेष,तिरस्कार प्रतिकूल वृती यांनी मिश्र नसलेला विनोद,दोषदर्शन किंवा परन्यूनत्व यामध्ये इतरांच्या उणिवा दाखवून दंतदर्शन करणे त्यात कुठेही हा प्रकार अती होत असेल तर तिथे चिड,संताप,राग हा प्रकार प्रवेशन्याची शक्यता असते.त्याचा होणारा अनिष्ठ परिणाम विनोदास बदनाम करणारा ठरतो त्यासाठीच जोगांनी स्पष्ट केलेली शुद्ध विनोदाची व्याख्या समजून घेतली पाहिजे.शुद्ध विनोदात साहित्याचे उच्चतम स्वरूप असावे.विनोदाच्या शुद्ध स्वरुपात आस्वादकाचे निर्मळ हास्य असावे.त्यात कुत्सितपणा,द्वेष सूड व खच्चिकरणाची भावना नस- ावी.त्या हास्यात परस्पर प्रेम,आत्मियता असावी.त्यामुळे विनोदविश्वातील आनंद शतगुणीत होईल.विनोदमहात्म्य सर्वमान्य होईल.शुद्ध विनोद हा चिरंतन टिकणारा असतो. संकुचित मर्यादेतून बाहेर पडून तो चिरंतन स्वरुप प्राप्त करतो.त्यामुळे त्याचे सादरीकरण सर्वत्र होऊ शकते.तो

गो के भट म्हणतात,विनोद ही एक दृष्टी आहे. जीवनाकडे पहाण्याची ती एक वृत्ती आहे.जीवनात लोकांच्या आचार,विचार व उच्चारात विकृती किंवा विसंगतीकडे सात्विक संतापाने जसे पहाता येते.तसे दिलखुलास हसून देखील पहाता येते. मग प्रश्न असा निर्माण होतो की या विसंगत वृत्तीकडे नेमके कसे पहावे?त्या वृत्तीवर प्रत्तीक्रिया देतांना आपली मानसिकता कशी ठेवावी?नेमका त्यावेळी आपल्या वर्तनातील उत्स्फूर्त अविष्कार कसा असेल?त्या वरुनच आपल्या मानसिक स्वास्थ्याची दिशा ठरत असते.ती दिशा सकारात्मकच असावी ही दृष्टी विनोद जाणकारास प्राप्त होते.त्यासाठी विनोद मीमांसा,चिकित्सा किंवा विनोदाचे तत्वज्ञान काही प्रमाणात तरी अभ्यासले पाहिजे.प्रमाण भाषेत विनोदाच्या संदर्भाने जो विचार केला जाईल किंवा त्या विषयाच्या अनुषंगाने जी चिकित्सा केली जाईलं ते बोलीभाषेत घडणे शक्य नाही.तिथे साहित्य अभ्यासकांचे प्रमाण फार कमी आहे.यावर श्री कृ कोल्हटकरांनी मात्र फार वेगळा विचार केला.त्यांच्या मते प्रमाण भाषा किंवा संस्कृत प्रचुर शब्द- ापेक्षाही उर्दू, हिंदीने प्रभावित असलेल्या मराठीत अधिक विनोदनिर्मिती होऊ शकते.वऱ्हाडी भाषेची हीच नजाकत आहे.उदा.दोन वऱ्हाडी माणसे जर भांडत असतील तर ते अगदी सहजपणे बोलून जातात, सिधा अंदर घालीनं ना बे, कायले होबासक्या करुन राह्यला. या भाषेवर हिंदीचा असलेला प्रभाव लक्षात घ्या.कोल्हटकर हे मूळचे बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव जामोदचे.अगदी म. प्र.ला लागून असलेला तालुका त्यामुळे या भाषेचा प्रभाव त्यांच्या विनोदावर राहणारंच.

चिं.वि.जोशी यांच्या विनोदावर भाष्य करतांना गंगाधर गाडगीळ असे म्हणतात.हा विनोद केवळ कोटीबाज किंवा चमत्कृतिजन्य नसून स्वभावचित्रण, प्रसंगाची मांडणी व वातावरणनिर्मिती या वाङमय निकषाच्या अंगाने अविष्कृत होत असल्याने तो श्रेष्ठ प्रकारच्या साहित्यात मोडतो.त्यात विविधता असून तो सूक्ष्म निरीक्षणावर व मार्मिक स्वभावचित्रणावर आधारलेलाआहे.तो कलेशी इमान राखणाराअसल्या मुळे मराठी साहित्यात त्याला मानाचे स्थान आहे. असे गाडगीळांचे मत असले तरी ते सर्वमान्य नाही. त्यावर अनेक साहित्यिकांचे वादप्रतिवाद असणारचं. आपल्या विनोदी लेखनाविषयी पु लं लिहितात. ललित लेखकाची जिंवत चित्रे काढण्याची शक्ती व त्याची निर्मिती ही फोटोग्राफीसारखी प्रतिकृती नसून स्वतंत्र अशी कृती असते आणि आपले विनोदी लेखन अशा कृतीत मोडत असल्याने ते साहित्यच होय हे पु .ल. सारख्या महान साहित्यिकास प्रारंभी पटवून द्यावे लागते याचा अर्थ त्यांचा सुरवातीचा साहित्यप्रवास हा समिक्षकांच्या व प्रस्थापित साहित्यिकांच्या कसोट्यांना कसा तोंड देत चालला असेल?याची कल्पना नवोदित विनोदी साहित्यिकास यावी.त्यावेळी विनोदी साहित्याला साहित्याचा प्रकार म्हणून मान्य करायला तत्कालिन साहित्यिक तयार नव्हते.

तात्पर्य सर्व प्रकारच्या विनोदी साहित्यिकांना समिक्षक व अन्य गंभिर क्षेत्रातील साहित्यिकांच्या अग्निपरिक्षेत उतरावे लागले.त्या परिक्षेअंती त्यांना साहित्य वर्तुळात यशोशिखर गाठता आले.


## वाचाल तर वाचाल

प्रो.डॉ.संजय ढोडरे
संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
संचलित, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र,धुळे

# प्रखर ग्रामीण वास्तव व समाज मूल्यभान असलेली अहिराणी कादंबरी : वडांग

महात्मा गांधी म्हणतात, खरा भारत खेड्यात राहतो. देशासाठी काही करायचे असेल तर खेड्याकडे चला... असे आवाहन तत्कालीन काळात गांधीजींनी तरुणांना केले होते. आजही तत्कालीन परिस्थितीपेक्षा वेगळी नाही. भारताच्या खऱ्या समस्या या खेड्यातच आहे. कारण खेड्यात राहणारा माणूस खरंखुरं व अस्सल जीवन जगत असतो. शहरी माणूस बेगडी आणि विशिष्ट प्रकारचा मुखवटा धारण करून जगत असतो. ग्रामीण वास्तव मांडण्याची हातोटी संजीव गिरासे यांनी उत्तम प्रकारे साधली आहे, हे त्यांच्या 'वडांग' या कादंबरीवरून सिद्ध झाले आहे. गेल्या एक्केचाळीस वर्षांपासून संजीव गिरासे लेखन करीत आहे. त्यात निव्वळ अहिराणीतून ते पंचवीस वर्षांपासून लिहीत आहे. पंचवीसव्या वर्षी माणूस जसा प्रौढ होतो, तसं आता संजीव गिरासे यांची लेखणीही प्रौढ झाली आहे, असे 'वडांग' वाचतांना म्हणता येईल.

संजीव गिरासे यांची 'लगीन'ही अहिराणी बोलीतली पहिली कादंबरी २००१ मध्ये प्रकाशित झाली आणि आता पंचवीस वर्षानंतर 'वडांग' चे प्रकाशन होत आहे. ग्रामीण जीवन शब्दात रेखाटन आणि तेही अहिराणी बोलीतून हे बऱ्यापैकी कठीण आहे. परंतु गेल्या एक्केचाळीस वर्षांच्या लेखन सरावात संजीव गिरासे यांना ते आता चांगल्या प्रकारे जमलं आहे. रुढार्थाने 'वडांग' ही चौथी कादंबरी आहे. लेखन सरावातली परिपक्वता 'वडांग' वाचतांना पानोपानी जाणवते. ग्रामीण भागातली वास्तव जीवनातील समस्या शब्दातून प्रकट करण्याचं शिवधनुष्य 'वडांग' च्या माध्यमातून गिरासे यशस्वीपणे पेलतात. भेदक ग्रामीण वास्तव त्यांच्या सर्वच साहित्य प्रकारातून येतो. थोडीशी विनोदाची किनार किंवा कवडसा त्यांच्या साहित्याला असतो. या विनोदाच्या मागे दुःख, वेदना, यातना आणि संघर्ष दडलेला असतो. पु. ल. देशपांडे यांच्या शब्दात सांगायचे तर विनोदाची मागची बाजू ही कारणे असते आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात खेडी ही खेडी राहिलेली नाहीत,तर त्यांचे शहरीकरण झाले आहे. हे वरवर पाहता सत्य जाणवत असलं तरी समस्यांच्या अवलोकनातून आजही खेडी ही खेडीच आहेत. त्यांचे बाह्यंग बदलले आहे. अंतरंग मात्र आहे तसेच आहे, हे 'वडांग' वाचल्यावर सिद्ध होते.माणसाची प्रथम निकड ही भूक आहे. त्याला पोटाला मिळाले की त्याला प्रजोत्पादन करण्याची गरज भासते. या दोन गोष्टीतून सृष्टी निर्माण झाल्यापासून माणूस संघर्ष करीत आला आहे, या सिद्धांतावर 'वडांग' चे कथानक उभे राहते. हजारो वर्षांपासून माणूस पोटासाठी, अन्नासाठी झगडत आला आहे. काळानुरूप त्याच्या संघर्षाच्या संकल्पना बदलल्या आहेत. पोटाला पुरेसे अन्न मिळाले की तो भौतिक सुखाकडे वळतो. ते मिळाले की त्याच्या आयुष्याची सांगता होते, हे तत्त्वज्ञान 'वडांग ' मधून संजीव गिरासे यांनी मांडले आहे. माणसाच्या जीवन संघर्षाची कथा म्हणजे 'वडांग' आहे, असे एका वाक्यात म्हणता येईल. समीर, पवन, अनिल, वायू आणि वारेश्वर या पाच व्यक्तिरेखा भिन्न असल्या तरी ती एकच व्यक्तिरेखा आहे. त्यांच्या जगण्याचा, जीवनमूल्यांचा, संघर्षाचा धागा एकच असल्याने 'वडांग' ही एकाच व्यक्तीची कथा आहे, असे म्हणता येईल. हे पाचही मित्र एकाच गावातले. समवयस्क. शिक्षण हे नोकरी मिळवण्यासाठी घ्यायचे आणि नोकरी ही विवाह




**कादंबरी प्रकाशन सोहळा**
**आयएमए हॉल, धुळे**
**दिनांक व वेळ : रविवार २० एप्रिल २०२५**
**सकाळी ९ वाजता**

करण्यासाठी करायची. आज ग्रामीणच नव्हे तर सर्वत्र मुलाला उत्तम नोकरी असल्याशिवाय त्याचा विवाह होत नाही. असा समाज नियम झाला आहे. या नियमाभोवती समाजाने 'वडांग ' घातली आहे. म्हणूनच आता वयाची चाळिशी नजीक आली तरी मुलांचे विवाह होत नाहीत. त्यातून वृद्ध माता-पित्यांचे होणाऱ्या हाल यात चित्रीत केलेले आहे. वास्तव पातळीवरचं हे चित्रण वाचताना अंगावर शहारे येतात.

नोकरीसाठी लागणारी शैक्षणिक पात्रता असूनही नोकर भरती बंद असल्याने युवकांना नोकरी मिळत नाही. यात या पाचही तरुणांचा काय दोष? पण समाजाने स्वतः भोवती घालून घेतलेल्या वडांग या अदृश्य कुंपणामुळे भीषण अवस्था प्राप्त झाली आहे. पुढे यातून या तरुणांनी कोणता मार्ग काढला, हे प्रत्यक्ष कादंबरी वाचनातूनच समजून घेणे योग्य ठरेल. संजीव गिरासे यांची प्रवाही व सहज सुंदर शब्दरचना किंवा शैलीचा साज चढविल्यामुळे 'वडांग' वाचनीय झाली आहे. प्रखर ग्रामीण वास्तव यातून प्रकट होते. वाङ्.मयीन सोपस्कार जसे म्हणी, वाक्प्रचार, उपमा, प्रतिमा योग्य प्रकारे, योग्य ठिकाणी वापरल्याने 'वडांग 'चे वाङ्.मयीन सौंदर्य खुललेले आहे. मराठी साहित्यातील महत्त्वाची कादंबरी असा लौकिक 'वडांग 'ला मिळेल यात शंका नाही. सौ. रेखा विजय भदाणे यांच्या सुंदर मुखपृष्ठाने वडांचे वाङ्.मयीन मूल्य वाढविलेले आहे. अथर्व प्रकाशनचे, युवराज माळी, यांनी उत्तम, सुबक आणि आकर्षक छपाई, बांधणी केल्यामुळे पाहता क्षणी 'वडांग ' नजरेत भरते. डॉ. माधव कदम यांनी देखील कादंबरीची उंची वाढवणारी पाठराखण केलेली आहे. सर्वच साहित्यिक अंगाने 'वडांग 'ची भट्टी उत्तम जमली आहे ती वाचकांच्या प्रसंगशेष नक्कीच उतरेल असा विश्वास वाटतो.

**वडांग अहिराणी बोलीतली कादंबरी**
**अथर्व प्रकाशन, जळगाव.**
**पृष्ठ ११३ मूल्य रु.१९५**

# वैभवशाली मोडी लिपी शिकूया!

वैभवशाली प्राचीन लिपी, दिवाळी अंक, वैभवशाली प्राचीन लिपी दिवाळी अंक - २, आणि वैभवशाली प्राचीन लिपी, अंक नं. ३ असे तीन पुस्तके नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. या तिन्हीही पुस्तकांचे संपादक सोज्वल शैलेंद्र साळी असून संकल्पना श्री. शैलेंद्र पांडुरंग साळी यांची आहे. या तिन्हीही पुस्तकांचे प्रकाशन, वैभवशाली प्राचीन लिपी ट्रस्ट आहे. त्यांना प्रमुख मार्ग दर्शन करणारे ॲड विलास भगवान कडू आहेत. तिन्ही पुस्तके हाती पडतांना खूप आनंद झाला. संस्था, ब्राम्ही, खरोष्टी, शारदा ग्रंथ, मोडी, नेवारी उर्दू, पार्शियन या प्राचीन व मध्य युगीन लिप्यांचे लिप्यंतर भाषांतर. या पुस्तकांत पहावयास मिळते.

१ ल्या क्रमांकाच्या पुस्तकांत ब्राम्ही लिपी सुलेखन, खरोष्टी लिपी सुलेखन, शारदा लिपी सुलेखन, ग्रंथ लिपी सुलेखन, मोडी लिपी सुलेखन, नेवारी लिपी सुलेखन, पर्शियन लिपी सुलेखन केलेले लिपी आणि असे सुबक वर्णन पहावयास मिळते.


२ ऱ्या क्रमांकाच्या पुस्तकात मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग व मार्गदर्शन शिबीर, ऐतिहासिक स्थळांची माहिती व पर्यटन आणि मार्गदर्शन, प्राचीन पटखेळ संवर्धन मोहिम अंतर्गत महाराष्ट्रातील पटखेळांच्या नोंदणी आणि दुर्मिळ छायाचित्राचा खजिना पहावयास मिळतो.

नाशिकमधील तोडकर वाडा एक पुरातन वस्तुंचे वारसायन असून त्यांनी ची. आणि चीं.यांनी एक वस्तुसंग्रहालयच बनविले आहे. त्याची माहिती या पुस्तकात वाचावयास मिळते.

वैभवशाली प्राचीन लिपी- मोडी लिपी आहे. ७० दशकाच्या आधी देवनागरी लिपीची जुनी लिपी होती. त्या लिपीला मोडी लिपी असे म्हणतात. इ. स. १३वे शतक ते इ. स. २० शतकापर्यंत या लिपीचा प्रवास होता. ज्याप्रमाणे आज आपण देवनागरी लिपीला प्राधान्य देतो. त्याचप्रमाणे मोडी लिपीला प्राधान्य दिले जात होते. परंतु १९५५ नंतर मोडी लिपी बंद करुन देवनागरी लिपी वापरण्यास सुरुवात झाली. मोडी लिपीचा वापर हा राजदरबारातील लेखन करण्यासाठी उपयुक्त असा होता आणि लेखनाचे या दरबारातील कारभार जोरात होण्यासाठी साहाय्यसुद्ध झाल्याचे दिसते. मोडी लिपीचे एकूण ४ कालखंड शिवपूर्वकाळ, बहामनी काळ, शिवकाळ, पेशव काळ आणि आंग्ल काळ होय.

अंक तिसरामध्ये बर्वेवाडा, शिवराई, नाशिक जिल्ह्यातील मंदिरे, पायविहिरी, बारव, दीपमाळ, समाधी, वेश व मंदिरावरील काही अप्रकाशित निवडक शिलालेख यांची माहिती मिळते. अशा प्रकारे तीनही अंकांचा अभ्यास करतांना श्री. सोज्वळ साळी यांचे प्रयत्न त्यांचा अभ्यास मोडी लिपीतील ते तज्ञ आाणि त्यांचे कार्य पाहून खुप आनंद होतो. श्री. सोज्वळ साळी हे एम. ए. आर्चिओलॉजी असून त्यांनी मोडी वर्गातील अनेक विद्यार्थ्यांना मोडी लिपी प्रशिक्षण देऊन मोडीत लिपीत तज्ञ केले आहे. ते वैभवशाली प्राचीन लिपी ट्रस्ट नाशिकचे अध्यक्ष असून त्यांच्या हातून असेच उत्तम कार्य घडो. ह्याच या विशेष लेखाद्वारे शुभेच्छा. माझी आजच्या तरुणांना एक विनंती राहील त्यांनी मोडी लिपी जरुर शिकावी.

**-श्रीपाद माधव नांदेडकर**
क्युरेटर इ.वि.का. राजवाडे संशोधन, मंडळ धुळे



# वसुंधरा संवर्धन : भारतीय संस्कृती

जगदीश सुदाम पाटील
शहादा, मो. ९४२१५३५५१६

माणसाची प्रत्येक गरज पृथ्वी पूर्ण करू शकते, पण हाव नाही अशा अर्थाचे महात्मा गांधींचे एक वचन आहे. हवा, पाणी, जंगले यांसारख्या पृथ्वीवरच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा भसाभस अविचारी वापर केल्याने आणि वाढत्या प्रदूषणाचे परिणाम दिसतच आहेत. आणि हे असेच चालू राहिले तर मानवाचेच भविष्य अंधकारमय आहे हे निश्चित. याबाबत प्रबोधन करण्यासाठी २२ एप्रिल हा वसुंधरा दिन मानला जाऊ लागला.

वसुंधरा दिनाची संकल्पना अमेरिकेतील खासदार गेलार्ड नेल्सन यांनी मांडली. त्यांनी अमेरिकेतील दोन कोटींपेक्षा जास्त लोकांमध्ये पर्यावरणाचा समस्यांबाबत जागृती केली. प्रदूषण आणि वन्यजीवांचा ऱ्हास ह्या मुद्द्यांवर येथील समाजाचा सर्व थरांतील लोकांनी आवाज उठवला. हवा, पाणी, वने आणि वन्यजीव, निसर्ग यांचा संरक्षणासाठी तेथे मोठा राजकीय दबाव निर्माण झाला. अशा प्रकारे १९७० सालापासून हा अर्थ डे (वसुंधरा दिन) जगभर साजरा केला जात आहे.

बिंग कनेक्टेड हा सध्याचा परवलीचा शब्द बनला आहे. पण भारतीय मन, माणूस आणि निसर्ग हे बिंग




कनेक्टेड होतेच. भारतीय माणूस व निसर्ग यांच्यामध्ये अखंड संवाद व संपर्क होताच. नदीकाठी वनांचा आश्रयाने वाढलेली भारतीय संस्कृती निसर्गाचे महत्त्व जाणून आहे या धरणीला भारतीय माणूस माता मानतो. सकाळी गादीवरून उठून या धरणी मातेवर आता पाय ठेवावे लागणार या कल्पनेने तो अस्वस्थ होतो. गादीवरून उठावे तर लागणारच आहे म्हणून आपण सकाळी उठल्यावर तिची प्रार्थना करतो.

समुद्र वसने देवी, पर्वतस्तनमंडले ।
विष्णुपत्नी नमोस्तुभ्यम, पादस्पर्श क्षमस्व मे ।।

मला केवळ नाईलाजाने या पृथ्वीला पाय लावावे लागणार आहे हे माते मला क्षमा कर.

वेद आणि पर्यावरण संवर्धन :-

सुमारे साडेचार ते पाच हजार वर्षांपूर्वी वेद आणि उपनिषदे लिहिली गेली असावी असा अंदाज आहे. त्यात पर्यावरण संरक्षणाची कल्पना स्पष्ट मांडलेली आहे, तुम्हाला शेकडो हजारो वर्षे जरी आनंदाने जगायचे असेल आणि फळे खायची असतील तर वृक्षांची पद्धतशीर लागवड करा असे ऋग्वेदात म्हटले आहे. (५.५४.६)

नदी तीरावरील झाडांची तोड केली तर किनाऱ्याची हानी होते आणि मग पावसाळ्यात येणाऱ्या पुराचे पाणी गावात शिरून मोठाच विध्वंस होतो, म्हणून ही झाडे तोडू नयेत किंवा मुळासकट उपटू नयेत, पोषण करणाऱ्या वृक्षांना तोडू नये त्यामुळे आपोआपच इतर झाडेही मरतात व यामुळे जैव साखळी धोक्यात येऊन संपूर्ण जगाचाच विनाश होईल (६.४८.१७) असेही यात म्हटले आहे.

हिरवी झाडे, पाणी आणि हवा यांचा महत्वाविषयी अथर्व वेदातही लिहिले गेले आहे. झाडे-झुडपे विषारी द्रव्यांचा किंवा प्रदूषकांचा नाश करतात (८.१७.१०) आणि हवा शुद्ध असेल तर विषबाधेला प्रतिबंध होतो (८.२.२५) असे यात म्हटले आहे.

झाडांमध्ये सर्व कार्यांसाठी आवश्यक असलेले गुणधर्म असतात आणि मानवतेला तारुन नेतात (८.७.४) असा उल्लेखही अथर्ववेदात आहे.

श्री चक्रधर स्वामींची शिकवण:-

स्वामी आणि त्यांच्या शिष्यांनी पृथ्वीच्या संरक्षणासाठी केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे होते. त्यांनी आपल्या शिकवणीतून लोकांना निसर्गस्नेही जीवनशैलीचा स्वीकार करण्यास प्रवृत्त केले. विशेषतः वृक्षारोपण आणि जलसंवर्धन यावर त्यांचा मोठा भर होता. त्यांच्या काळात त्यांनी लोकांना पाण्याचा योग्य वापर आणि पारंपरिक जलस्रोतांचे जतन करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांचे शिष्य अनेक गावांमध्ये जाऊन तलाव आणि विहिरींचे संवर्धन करण्यासाठी लोकांना प्रेरित करत असत.

त्यांच्या तत्वज्ञानानुसार अहिंसा आणि सह अस्तित्वाचा संदेश देण्यात आला, ज्यामुळे प्राणी आणि निसर्ग यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध निर्माण झाले. तसेच, त्यांनी अन्न वाया घालवू नये, जमिनीचा सन्मान करावा आणि निसर्गाचा समतोल बिघडू नये यासाठी जैवविविधतेचे संरक्षण करावे, असे शिकवले. त्यांच्या शिष्यांनी गावोगावी फिरून ही शिकवण लोकांपर्यंत पोहोचवली आणि समाजात पर्यावरणस्नेही विचारांचा प्रसार केला. त्यामुळेच, श्री चक्रधर स्वामींचे विचार आणि कार्य वसुंधरेच्या संरक्षणासाठी आजही आदर्श ठरतात.

अशोक स्तंभ:-

पाचव्या शतकात लिहिल्या गेलेल्या याक्षवल्क्य स्मृतीमध्ये वृक्षतोडीस प्रतिबंध करण्याविषयी आणि वृक्षतोड करणाऱ्यांना शिक्षा करण्याविषयी सुचवले गेले आहे. मौर्य काळात लिहिल्या गेलेल्या कौटिल्याचा अर्थशास्त्रात वनव्यवस्थानाबाबत भर देण्यात आली आहे. नंतरचा काळात राजा अशोकाने आणखी एक पाऊल पुढे टाकले, सम्राट अशोकाने वने निर्माण केलीच पण त्याचबरोबर इसवीसन पूर्व २२५ मध्ये त्याने वन्यजीव अभयारण्य स्थापन करण्याचे आदेश जारी केला होता. असे अभयारण्य स्थापन करणारा तो जगातील पहिला शासक होय. त्याने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा स्तंभ उभारला. त्याच्या स्तंभातून पर्यावरण आणि जैवविविधतेच्या कल्याणाचा दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आला आहे. यावर करण्यात आलेला मजकूर असा आहे, धर्माविषयी प्रेम, आत्मपरीक्षण, आदर, दृष्ट-अनिष्ट वाईट गोष्टींविषयी भीती, यांखेरीज या आणि पुढच्या जगातील




आनंद आणि समाधान प्राप्त होणे कठीण आहे.

बिश्नोई समाजाचे बलिदान :-

सन १७३० मध्ये जोधपूरच्या तत्कालीन राजाने बिश्नोई समाजाच्या भूमितील वृक्षांची तोड करण्याचा हुकूम दिल्याचे सांगितले जाते. बिश्नोई समाज हा वृक्षांचे आणि प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठीच गुरु जम्बेश्वर यांनी पाचशे वर्षांपूर्वी स्थापन केला. या लोकांनी वृक्षांना चिकटून राहून त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. राजाचा शिपयांनी त्यावेळी वृक्ष संरक्षण करणाऱ्या स्त्री, पुरुष आणि मुलांसह २६३ जणांना ठार मारून वृक्षतोड केल्याचे सांगितले जाते. आधुनिक काळातही चिपको आंदोलनाची कल्पना याच घटनेवरून घेतली गेली होती.

शिवाजी महाराजांची राजाज्ञा:-

छत्रपती शिवाजी महाराजांनी वृक्षांचे महत्त्व जाणले होते. आंबा, फणसाची झाडे तोडण्यास सक्त मनाई करणारी राजाज्ञा त्यांनी १६६० मध्ये जारी केली होती.

संत नामदेव, संत तुकाराम महाराज यांच्यासारख्या अनेक संतांनीही अभंगातून पर्यावरणाचा जतनाविषयी जागृती केली आहे.

त्यानंतर ब्रिटिशांचा काळातही पर्यावरणाशी संबंधित कित्येक कायदे करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर सण १९७६ मध्ये करण्यात आलेल्या घटना दुरुस्तीनंतर राज्ये पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करतील आणि वनांचे संरक्षण करून देशातील वन्यजीवांचेही संरक्षण करतील असे स्पष्टपणे म्हणण्यात आले.

सन १९८५ मध्ये वनखाते निर्माण करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाचे नियमन करणारी आणि हमी देणारी ही केंद्रीय प्रशासकीय यंत्रणा आहे. मात्र असे कायदे असूनही १९४७ ते १९९० या कालावधीत दिवसेंदिवस पर्यावरणाची अधिकाधिक हानी होत गेली हे एक कटू सत्य आहे.

सृष्टीच्या चक्रामध्ये प्रत्येक वस्तूला आणि जीवाला स्वतःचे विशिष्ट स्थान आहे आणि त्याला धक्का पोहोचला की घटनेची प्रतिक्रिया आज ना उद्या सर्वत्र जाणवतेच. एखाद्या यंत्राचे किंवा गाडीच्या इंधनाचे उदाहरण घ्या, त्याचा एखादा भाग नादुरुस्त झाला तर त्याची कार्यक्षमता कमी होते, आपण दुर्लक्ष करीत राहिलो तर आणखी एखादा भाग बिघडतो दरम्यान त्याचा ढासळलेल्या कार्यक्षमतांमधून आपल्याला इशारा मिळत असतो तरीदेखील आपण तिकडे दुर्लक्ष केले की एखाद्या दिवशी ते बंदच पडते.

पर्यावरणाचेही असेच आहे निसर्ग मानवाला वारंवार धोक्याचे इशारे देतो आहे, निसर्गातील सजीवांच्या अनेक अन्नसाखळ्या तुटणाऱ्या परिस्थितीला पोहोचल्या आहेत. प्रदूषण वाढते आहे हवामान बदलते आहे. आणि या सर्व परिस्थितीला आधुनिक मानवाची बेफिकिर जीवनशैली कारणीभूत आहे.

२०५० मध्ये जगाची लोकसंख्या तब्बल ९.६ अब्ज असण्याची शक्यता आहे. चंगळवाद भागविण्यासाठी मानवाने निसर्गाला ओरबडणे असेच चालू ठेवणे तर त्यावेळी पृथ्वीवर जगणे मुश्किल होईल असा सणसणीत इशारा पर्यावरण तज्ञांनी दिला आहे.

आजचा जमान्यात सगळ्यांना विकास हवा आहे आणि तोही झटपट! खरंतर विकासाची इच्छा बाळगण्यात चुकीचं काहीच नाही, फक्त 'विकास' म्हणजे नक्की काय? हे प्रत्येकाने समजून घेतलं तर बरं होईल. अनियंत्रित आणि एकांगी विकास म्हणजे पृथ्वी भकास होण्याकडे टाकले जाणार पाऊल आहे, कारण यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होते.

पर्यावरण नासाडी होऊ न देण्याचा निश्चय प्रत्येकाने केला तर परिणामी एकाच उद्दिष्टासाठी लाखो लोक एकत्र आल्याचे चित्र यातून उभे राहील म्हणून आपण सर्वांनी प्रतिज्ञा घेऊ,

माझी पृथ्वी माझी आईच आहे.
माझे पर्यावरण हा माझा श्वास आहे.
माझ्या सभोवतालचे पशु-पक्षी आणि झाडे हे माझे सगे सोयरे आहेत,
त्यांच्याकडून माझा गरजांपुरते मी जरूर घेईन.
त्यांना ओरबडण्याचा प्रयत्न मी करणार नाही.
पण त्याचबरोबर त्यांचा वाढीचे प्रयत्नही करेन.
माझा वसुंधरा मातेने मला भरभरून दिले आहे,
मी ते काटकसरीने वापरेन.
पशु-पक्षी, झाडे,जंगले, हवा, पाणी, जमीन या तिच्या दागिन्यांचे मी संरक्षण करेन.
तिला समृद्ध बनवेल,
आणि मीही आनंदाने समृद्धीकडे वाटचाल करेल.
शेवटी एकच पर्यावरणाला चांगले दिवस आले की मानवाचा आयुष्याचा दर्जा सुधारणार हे नक्की.

## सुजाण पालक



डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७

# एनडीए परीक्षेत पुण्याच्या मुलीचा यशस्वी ठसा - मेहनत, जिद्द आणि मार्गदर्शनाची प्रेरणादायक कहाणी

बऱ्याचदा आपल्या मुलीने काय बनावे याकरिता पालक तिच्यामागे लागलेले दिसून येतात! आपल्या अपेक्षा मुलांवर लादल्याने कित्येकदा त्या ओझ्याखाली मुलं बिचारी दबून जातात!पण खरं म्हणजे पालक म्हणून आपल्या मुलांच्या डोळ्यात ध्येयाची बीजं आपण शोधायची असतात! त्यांना योग्य ती मशागत केली तर मुलं अस्मान भरारी निश्चितच घेतात!

ध्येयाचा धोपट मार्ग न स्वीकारता, नाविन्याचा ध्यास आणि परिश्रमाची तयारी, चिकाटी, स्वयंप्रेरणा, आणि योग्य मार्गदर्शनाने जग जिंकणारी कित्येक प्रेरणादायी उदाहरणं अवतीभोवती दिसतात. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) ही भारताच्या संरक्षण क्षेत्रात कारकीर्द घडवण्याचे एक महत्त्वाचे प्रवेशद्वार.

या कठीण परीक्षेत यश मिळवणे म्हणजे केवळ बुद्धिमत्तेचा विजय नाही, तर कठोर परिश्रम, मानसिक ताकद आणि योग्य दिशादर्शनाचा मिलाफ आहे. याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पुण्याच्या एका मुलीने एनडीए परीक्षेत देशात प्रथम क्रमांक पटकावणे.

यशामागील पाया- लहान वयातच ठरवलेले ध्येय

ही मुलगी केवळ अभ्यासातच नव्हे तर आपल्या दृष्टिकोनातही ठाम होती. तिने आठवी-नववीपासूनच एनडीएचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी अभ्यास सुरू केला. यामध्ये तिची जिद्द आणि सातत्य महत्त्वाचे ठरले. सुरुवातीपासूनच तिने स्वतःला एका ध्येयासाठी झोकून दिले होते.

---

आई-वडिलांचे विश्वास आणि मार्गदर्शन

एका मुलीच्या यशामागे तिच्या पालकांचे योग्य मार्गदर्शन आणि विश्वास हे स्तंभासारखे उभे असतात. या विद्यार्थिनीच्या पालकांनी तिला स्वप्न पाहण्याची आणि त्यासाठी प्रयत्न करण्याची पूर्ण मुभा दिली. आई-वडिलांनी तिच्यावर नुसती अभ्यास कर अशी सक्ती न करता, तिला स्वतःची दिशा शोधायला मदत केली. वेळोवेळी योग्य सल्ला, नैतिक आधार आणि आवश्यक तेव्हा मानसिक मदत




देत राहिले. मेहनत आणि शिस्त - यशाची गुरुकिल्ली

एनडीए परीक्षेसाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसते. त्यासाठी तपश्चर्येसारखी तयारी लागते. या मुलीने नियमित अभ्यास, वैयक्तिक वेळापत्रक, शारीरिक तंदुरुस्ती, सामूहिक कार्यक्षमता आणि मुलाखतीसाठी आत्मविश्वास यावर लक्ष केंद्रित केले. ती केवळ बुद्धिमान नव्हती, तर ती शिस्तप्रिय आणि ध्येयवेडी होती.

---

मुलींसाठी एक प्रेरणा


या यशामुळे अनेक मुलींना एनडीए आणि संरक्षण क्षेत्रात येण्यासाठी आत्मविश्वास मिळेल. तिची कहाणी एक संदेश देते की, लिंग नव्हे, तर इच्छाशक्ती आणि तयारीच यश निश्चित करते. तिच्या यशामुळे समाजात सकारात्मक बदल होईल आणि पालक मुलींना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी प्रोत्साहित करतील.

निष्कर्ष- या पुणेकर विद्यार्थिनीने सिद्ध केले की ध्येय निश्चित असेल आणि मार्गदर्शन योग्य असेल, तर कोणतीही परीक्षाच अशक्य नसते. तिचे यश हे लाखो विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी प्रेरणास्थान आहे. आजच्या पिढीने तिच्याकडून शिकण्यासारखे खूप आहे - मेहनत, जिद्द आणि न थकणारी चिकाटी! स्वप्न बघा, पण झोपेत नव्हे; जागेपणी आणि ती पूर्ण करण्याच्या तयारीने!




## राशी भविष्य



सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०




**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी दिलासादायक असणार आहे. तुमच्या शिक्षकांचा, मोठ्या व्यक्तींचा आणि साथीदारांचा तुम्हाला पाठिंबा मिळेल. काहीतरी नवीन शिकाल आणि शिकवाल. कर्तव्याला न चुकता काम केले तर समाधानकारक फळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मार्गदर्शक व्यक्तींचा सल्ला अजिबात टाळू नका. त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालून तुमचे चांगले होणार आहे. नियमात बसेल असेच वागा आणि त्याप्रमाणे काम करा. जोखीम किंवा चौकटीबाहेरच्या गोष्टींना आत्ता हात घालू नका. प्रयत्नांना प्रार्थनेची शक्ती जोडा!

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी अधिकाराचा आणि वर्चस्वाचा असणार आहे. तुम्ही करत असलेले काम मोठे होईल. विस्तार होईल. तुम्हाला एक महत्त्वाचा टप्पा गाठता येईल. बऱ्याच गोष्टींची सूत्रे तुमच्या हातात असतील. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने वागण्याची गरज आहे. वडील किंवा मोठ्या आदरणीय व्यक्तींचा दबदबा राहील. या आठवड्यात तुमचा आत्मविश्वास बळावेल. पण अती विश्वास, अभिमान, गर्व हे तुम्हाला बाधक ठरु शकतात. म्हणून पाय जमिनीवर ठेवा. सामर्थ्यवान अशी एखादी सुरुवात करा.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी डगमग डोलणारा आहे. कुठल्यातरी दोन किंवा अधिक गोष्टींमुळे तुम्ही तारेवरची कसरत करणार आहात. लक्ष एकाग्र न राहता विचलित जास्त होण्याची शक्यता आहे. हवे तसे ध्येय साध्य करायला अवघड आहे पण तरीही तुम्ही सांभाळत असलेल्या सर्व गोष्टीत तुम्ही पुढे वाढणार आहात आणि हेच महत्त्वाचे आहे! या आठवड्यात तुम्ही आर्थिक निर्णय पुढे ढकला. सगळीकडे उत्तुंग यशाची अपेक्षा ठेवू नका. दडपण न घेता यालाच जीवन ऐसे नाव समजून हा सप्ताह हलकेपणाने घालवा.

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी मिश्र स्वरूपाचा असणार आहे. तुमच्या ध्येयापर्यंत पोचाल पण तरीसुद्धा समाधान वाटणार नाही. आणखी पुढे काहीतरी करायला हवं अशी भावना येईल. भौतिक सुखसोयींपासून एक प्रकारची विरक्ती येऊ शकते. कामामध्ये विलंब होऊ शकतो. एखादं अवघड ध्येय साध्य करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल! या आठवड्यात खरंच तुम्हाला नक्की काय हवं आहे, याचा नीट विचार करा आणि त्याप्रमाणे पुढे चाला. उथळ गोष्टींमध्ये अडकून राहू नका. भावनांमध्ये, भूतकाळात किंवा नैराश्यात अडकून राहू नका. उपासना किंवा मेडिटेशन करा, एकांतात वेळ घालवा.

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. आरोग्य सांभाळा!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा आहे. तुम्ही एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोचणार आहात. मागे केलेल्या नियोजनाला आणि कष्टाला चांगले यश मिळेल. पण मार्गावर पुढे जाण्यासाठी कुठल्यातरी गोष्टीची वाट बघावी लागेल. लोकांचं सहकार्य मिळेल. यात्रा किंवा प्रवास संभवतात. या आठवड्यात तुम्हाला धैर्य आणि संयम ठेवण्याची गरज आहे. आहात त्या मार्गावर पुढे जाताना, विचारमंथन करा, इतरांचे मत जाणून घ्या. कामाचा विस्तार कसा करता येईल हा विचार करा.

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा असणार




▶ टॅरो कार्डनुसार हा आठवडा मेष वृषभ तूळ वृश्चिक मकर यांना सुसाट हायवे ; मिथुन कन्या धनू मीन यांना गावातली पायवाट; कर्क सिंह कुंभ यांना मात्र सत्तीचा थांबा!

आहे. तुमच्या ध्येयाच्या दिशेने चांगली वाटचाल होणार आहे. अडकलेली कामे सुटतील. तुमच्या प्रयत्नांना आणि घेतलेल्या कष्टांना गती मिळेल. इतरांना तुमची नोंद घ्यावी लागेल. योग्य मार्ग सापडेल. एक प्रकारचा विजय झाला आहे असे वाटेल. या आठवड्यात तुम्ही तुमच्या कामावर तुमच्या ध्येयावर संपूर्ण लक्ष देण्याची गरज आहे. कोणत्याही संभ्रमात विशेष करुन भावनिक गुंतागुंतीत अजिबात न अडकता तुम्ही तुमचे काम सातत्याने करण्याची गरज आहे.

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा आहे, शक्ती आणि सामर्थ्य देणारा आहे. तुमचा आत्मविश्वास चांगला राहील, इच्छाशक्ती भक्कम राहील. कोणतीही समस्या सोडवायला तुम्हाला योग्य मार्ग सुचतील. या आठवड्यात तुमच्यासाठी सगळ्यात महत्त्वाचे आहे संसाधनांचा योग्य उपयोग. काहीही वाया घालवू नका आणि कशाचाही अतिवापर करू नका. बुद्धीने निर्णय घ्या, भावनांमध्ये अडकू नका. ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी लवचिक आणि चपळ रहा. जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला हे लक्षात ठेवून स्वावलंबी व्हा!

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. एखादा महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागेल. महत्त्वाचे कोर्टाचे काम होण्याची शक्यता आहे. कागदपत्रांचे व्यवहार घडतील. काम पटकन होणार नाही. एका गोष्टीसाठी अनेक गोष्टींची गरज लागेल. मागे केलेल्या कर्माचे फळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही सारासार विचार करुन वागण्याची आणि बोलण्याची गरज आहे. तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन काम करा. कोर्ट कचेरी कामात दुर्लक्ष नको. खोटेपणा सोडून सचोटीने वागा. मागे तुमच्या कडून काही चुका झाल्या असतील तर त्या खऱ्या मनाने मान्य करुन परिस्थिती स्वीकारा!

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जादायक आणि प्रेरणादायक आहे. अडकलेल्या गोष्टी मार्गी लागतील. निराशेकडून नव्या उमेदीकडे घेऊन जाणारा हा काळ आहे. कामामध्ये चांगलं यश मिळू शकतं. लोकांना तुमच्या कर्तृत्वाची माहिती होईल. घरामध्ये किंवा कुटुंबामध्ये आनंदाचा प्रसंग येऊ शकतो. काही लपून राहिलेल्या गोष्टी समोर येतील. या आठवड्यात तुम्हाला सचोटी, खरेपणा आणि प्रामाणिकपणा यांच्या आधारे वागण्याची गरज आहे. पारदर्शी पध्दतीने काम करा. एखादं यश मिळालं असेल तर हुरळून जाऊ नका. अभिमान सोडून नम्रता ठेवा.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी खोळंबलेला काळ घेऊन येत आहे. गोष्टी अडकल्यासारख्या वाटतील. पटापट काही घडणार नाही. त्यामुळे तुम्हाला बेचैन वाटू शकतं. कामाच्या ठिकाणी तेच तेच काम करुन कंटाळा येण्याचा संभव आहे. मनातून उत्साह कमी राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्याकडे जे चांगलं आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जे नाही त्यामुळे स्वतःला त्रास करुन घेण्यापेक्षा आहे त्यात आनंद मानायला शिका. इतरांमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर संयम ठेवा, माणसं आणि नाती पटकन तोडायला जाऊ नका.

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आहे. नवीन काम मिळू शकतं. कामात बदल घेऊ शकतात. आत्तापर्यंत ज्याची वाट पाहत होता, ती घटना घडू शकते, किंवा त्या घटनेसंदर्भात चांगली बातमी मिळू शकते. केलेली मेहनत फलित होईल. तुम्हाला आतून ऊर्जा मिळेल, जिद्द राहील, उत्साही वाटेल. या आठवड्यात तुम्ही एखादा प्रयोग, एखादं नवखं काम हाती घेऊ शकता. तुमची कला, क्रीडा, छंद लोकांसमोर सादर करा. विनम्रपणे, पाय जमिनीवर ठेवून इतरांसमोर व्यक्त व्हा.

## शौर्योद्गारांचा इतिहास



संजय धनगर
मो.९६३७३२५१६०

# मेरी झांशी नही दूंगी...!

'मेरी झाशी नही दूंगी..!' हे तेजस्वी उद्गार भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील रणरागिनी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी ब्रिटिशांनी भारतीय जनतेवरील अन्यायाविरुद्ध केलेल्या निर्धाराचे प्रतीक होते.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने झांशी संस्थानाचा 'दत्तक वारसा नामंजूर' करून संस्थान खालसा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राणी लक्ष्मीबाईने ब्रिटिशांच्या या निर्णयाला तीव्र विरोध करत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी सरकारला अनेकदा निवेदने पाठवून झाशीचा दत्तक वारसा हक्क मान्य करण्याची विनंती केली, परंतु ब्रिटिशांनी त्यांची मागणी धुडकावून लावली. राणी लक्ष्मीबाई लढाऊ बाण्याची



साम्राज्य विस्तारासाठी लॉर्ड डलहौसीने 'व्यपगत सिद्धांत – Doctrine of Lapse ' हे धोरण आखले होते. या धोरणानुसार भारतातील आपापल्या प्रदेशावर स्वतंत्रपणे राज्यकारभार करणारी अनेक संस्थाने विविध कारणे दाखवून खालसा करून ते कंपनी सरकारच्या साम्राज्याला जोडण्याचे धोरण आखले. १) संस्थानाला वारस नसणे. २) वारस नसलेल्या संस्थानिकांनी संस्थानास वारस म्हणून दत्तक पुत्र घेतला असेल तर तो दत्तक वारसा नाकारणे. ३) संस्थानात राज्यकारभारात गैरव्यवहाराच्या कारणाने संस्थान खालसा करणे. ४) संस्थानाच्या कारभारासंबंधी जनतेत असंतोष असणे इत्यादी कारणे दाखवून कंपनी सरकारने भारतातील सातारा, नागपूर, उदयपूर, संबलपूर, अवध, झांशी आणि अशी शेकडो संस्थाने लॉर्ड डलहौसीच्या नेतृत्वाखाली १८४८ ते १८५६ या कालावधीत खालसा करून ब्रिटीश साम्राज्याला जोडणे सुरू केले. कंपनी सरकारच्या या धोरणाला सर्वप्रथम झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने प्रखर विरोध केला. झांशीचे राजे गंगाधरपंत नेवाळकर यांचे २१ नोव्हें. १८५३ रोजी दुर्दैवी निधन झाले. लक्ष्मीबाई ही त्यांची पत्नी. वाराणशीच्या तांबेंची कुलवीर व लढवय्यी शूर स्त्री. पतीनिधनाचे दुःख उराशी न बाळगता संस्थानातील जनतेच्या सुख व हितासाठी राणी लक्ष्मीबाईंनी दामोदर नावाचा मुलगा दत्तक घेऊन राज्यकारभार सुरू केला, मात्र शूर स्त्री होती. तलवार चालवणे, दांडपट्टा चालवणे, भालाफेक करणे या युद्धकलेत तरबेज व राजकारणात हुशार व तज्ज्ञ होती. तिला कंपनी सरकारने वार्षिक साठ हजार रुपये वेतन देऊन झाशी प्रांत खाली करण्यास सांगितले. तेव्हा इंग्रज प्रतिनिधी मेजर एलिसला तिने ठणकावून सांगितले, मेरी झाशी नही दूंगी ! तिने ब्रिटिश ईस्ट इंडिया सरकारशी दोन हात करण्याची तयारी सुरू केली. तिने आपल्या फौजेमध्ये स्त्री पलटणही निर्माण केली होती. त्या पलटणीत झलकरीबाई, जुलेखा, बक्षी, काशीबाई, लाडोबाई, मंदरा अशा अनेक लढवय्या व जीवाला जीव देणाऱ्या स्त्रिया होत्या. तिने आपल्या सैनिकांना इंग्रजांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. नंतरच्या काळात डलहौसीऐवजी लॉर्ड कॅनिंग आला. त्याने राणीला बंडखोर नेत्यात सामील केले. राणीला अटक करण्याचा हुकूम सोडला व झाशीवर फौज पाठवून झाशीच्या किल्ल्याला वेढा दिला. परंतु लक्ष्मीबाई डगमगली नाही. किल्ल्यावरील उपलब्ध व अपुऱ्या सामग्री व शस्त्र व सैन्यानिशी दहा दिवस राणी लक्ष्मीबाईने किल्ला लढवत ठेवला. ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला त्यांनी झाशीच्या किल्ल्याचे यशस्वी संरक्षण केले. जीवास जीव देणारी माणसे तिच्यासाठी जीवाची बाजी लावण्यास तयार होतीच. मात्र एवढ्या प्रयत्नानंतरही आता किल्ला पडतो आहे, असे लक्षात येताच राणीने आपल्या सैनिकांसह किल्ल्याचा वेढा फोडून किल्ल्याबाहेर पडून इंग्रज सैनिकांशी खुल्या मैदानात लढण्याचा निर्णय घेतला. राणीने मर्दानी पुरुष सैनिकांचा वेश धारण केला. दत्तक पुत्र दामोदरला पाठीशी बांधून तिच्या बादल नावाच्या अतिशय तेज धावणाऱ्या घोड्यावर स्वार होऊन तिने ब्रिटीश सैनिकांचा किल्ल्याभोवतीचा वेढा फोडून गोऱ्या सैनिकांची कत्तल करत ती किल्ल्याबाहेर पडली. ब्रिटीश सैनिकांनी तिचा पाठलाग सुरू केला. पाटलागावर निघालेल्या एकेक ब्रिटीश स्वारास यमसदनास पाठवीत ती वायुवेगाने दौडत होती. राणी लक्ष्मीबाईचे हे शौर्य व जलद धाव पाहून ब्रिटिश सैनिकही स्तब्ध झाले. राणी लक्ष्मीबाईचा बादल घोडा तुफान वेगाने दौडत बराच पुढे गेला. मागे ब्रिटिशांनी झाशीचा किल्ला जिंकला, परंतु राणी लक्ष्मीबाईंनी हार मानले नाही. तिने प्रथम काल्पी गाठली. तेथे तात्या टोपे यांची मदत घेऊन त्यांच्या साथीने ग्वाल्हेरच्या बंडखोर सैनिकांच्या मदतीने ग्वाल्हेर किल्ला जिंकला. ब्रिटिश सैनिकांचा पाठलाग चालूच होता. तरीही लढाई राणीने लढाई चालूच ठेवली. घोडदौड चालू असताना १८ जून १८५८ रोजी ग्वाल्हेरच्या दिशेने जात असताना ब्रिटीश अधिकारी जनरल ह्यू रोजशी लढता लढता राणी लक्ष्मीबाईला वीरगती प्राप्त झाली. राणीचे हे शौर्य व पराक्रम पाहून तो ब्रिटीश अधिकारी जनरल ह्यू रोजही स्तंभीत झाला. राणीचे युद्ध कौशल्य, पराक्रम व निर्णय दृढता कमालीची होती असे म्हणून तो पुढे म्हणतो, की ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध बंड करणाऱ्या भारतीयांमध्ये सर्वात धोकादायक राणी लक्ष्मीबाई होती.'

राणी लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचे वर्णन करताना एक म्हणतो...

'मेरी झांशी नहीं दूंगी' हे बोल जिथे घुमती
तिथे लवे ही मान हिंदवी गात तिची कीर्ती
बीज मराठी, बाणा कणखर
सत्तांधांशी देई टक्कर
अजून दिसे पडक्या बुरुजावर
उभी ठाकली मर्दानी ती शुभ्रकमल मूर्ती
स्वातंत्र्याच्या या तीर्थावर
शुभ्रकमल हे फुले निरंतर
इथेच अवघ्या त्यांच्यावर बोल तिचे घुमती

राणी लक्ष्मीबाईचे 'मेरी झाशी नही दूँगी '... हे तेजस्वी उद्गार देशभक्तीचे आणि शौर्याचे प्रतीक बनले. त्याच उद्गाराने भारतीय जनतेला व संस्थानिकांना ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्यात लढण्यासाठी प्रेरणा मिळाली. राणी लक्ष्मीबाईंनीचे उद्गार केवळ एक घोषणा नव्हती, तर दृढ निश्चयाचे आणि आत्मसन्मानाचे प्रतीक होते. तिने आपल्या कृतीतून हे सिद्ध केले, की खऱ्या अर्थाने ती एक देशप्रेमी, पराक्रमी, दृढनिश्चयी स्त्री व 'झाशीची राणी' होती. राणीने आपल्या पराक्रमाने देशवासियांमध्ये त्याग, बलिदान व देशासाठी लढण्याची भावना निर्माण केली. राणीच्या त्याग भावनेचा सर्व भारतीयांनी सन्मान करून देशोन्नतीसाठी त्यागाची भावना मनात ठेवली पाहिजे. श्रश्र वंदे मातरम्..!

## हसा ना गडे



दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# मॅडमच चित्रं

त्या दिवशी चित्रकलेच्या तासाला ड्रॉईंगच्या मॅडमनी मी काढलेलं कृष्णाच चित्रं सगळ्या वर्गाला दाखवलं आणि मुद्दामून खवटचतपणे म्हणाल्या, मुलांनो तुम्ही मूडदूस झालेल्या कृष्णाला कधी पाहिलं आहे का. हा बघा. ह्या विद्वानांनी काढलेला कृष्ण.

सगळी मुलं फीफी करत हसली. अर्थात मी काढलेल्या कृष्णाचे हात पाय बासरी पेक्षा बारीक होते ही खरी गोष्ट होती. मुलं हसली त्याचं पण काय नाय पण तीन नंबर बेंच वरची सुमी पण हसली तेंव्हा मला मॅडम चा जाम राग आला. असा इन्सल्ट करायला नाही पाहिजे होता त्यांनी. मला तर रडूच येत होतं. पण बाबा म्हणतात माणसाने असं रडायचं नसतं. चांगलं वागून माणसाचं हृदय जिंकायचं असतं. आणि मला तर फुल कळून चुकलं आहे की मॅडम पार्शालिटी करतात. मागे एकदा सुमी ने एका मुलीचं चित्र काढलं होतं. त्या मुलीच्या दोन वेण्या आणि हात दोन्ही बाजूला सरळ उभ्या होत्या. आणि सगळ्यात मोठा कहर म्हणजे सुमीने त्या मुलीचे दोन्ही डोळे वेगवेगळ्या रंगात रंगवलेले होते. मॅडम तिच्या जवळ गेल्या आणि एकदम गोड आवाजात म्हणाल्या,


बाळं, तुझं चित्रं एकदम छान आहे बरं. ( आणि माझा कृष्ण मूडदूस झालेला बरं का ) पण माणसाचे डोळे असे दोन रंगाचे नसतात कधी.तू का काढले आहेस.

मॅडम, त्या मुलीने वेगवेगळ्या कलरच्या लेन्स लावलेल्या आहेत. सुमीने असं उत्तर दिल्यावर मॅडम ला तर किती आनंद झाला म्हणता, विचारूच नका. त्या तिचा गालगुच्चा धरत म्हणाल्या,

वा, वा, खरंच किती हुशार आहेस बाळं तू. काहीतरी अक्कल घ्या रे पोरांनो तिच्या कडून.

मॅडमने तिला डोक्यावरच घ्यायचं बाकी ठेवलं. नाहीतर आमचे बाकीचे हे ठोंबे.. अर्थात हे आम्हाला उद्देशून होतं.

मला बाबा नेहमी सांगतात. की मोठ्यांचा आदर करावा. त्यांना उलट उत्तर देऊ नये. शिक्षक तर देवाच्याच जागी असतात. आणि एखादी व्यक्ती रागावली तर तिच्या आवडीची गोष्ट तिला दयावी म्हणजे ती व्यक्ती खूष होते.



मी खूप विचार करत बसलो की मॅडम कशाने बरं खूष होतील. मग मला एकदम कल्पना सुचली की मॅडम चा विषय ड्रॉईंग. मग आपण मॅडमचच चित्र काढून त्यांना भेट देऊ या.

ठरलं तर मग. मॅडमच चित्रं काढायचं तर त्यांचा थोडा अभ्यास करून ठेवलेला बरा म्हणून मी त्यांच्या कडे जरा बारकाईने पाहायला लागलो. कधी वाकडी मान करून तर, कधी एक डोळा बंद करून, पेन्सिलीने दुरून माप घेत होतो. तर मॅडम एकदम ओरडल्या काय करतो आहे रे डोमकावळ्या, असा वाकडी मान करून का बघतो आहेस. काही नाही मॅडम, म्हणत मी खाली बसलो.

रात्री मी बराच वेळ मॅडम च चित्रं काढत बसलो होतो. चित्रं खूप विचार पूर्वक काढायच होतं. कारण मॅडम खूष व्हायला पाहिजे होत्या.

मॅडमने कृष्णाला मूडदूस झालेला कृष्ण म्हटलं होतं, कारण त्याचे हात पाय बारीक होते. म्हणून मी मॅडमचे हातपाय एकदम जाडजूड दाखवले.त्यांच्याही हाताला माझ्या सारखीच पाच पाच बोटं होती. मग ती बोटं काढली. ती बोटं पट्ट्या ठोकल्या सारखी झाली होती. मग एकदम आठवलं. बोटाला जर नख नसली तर काय उपयोग. मग टोकदार चाकू सारखी नख काढली. मॅडम ला वेगवगळे रंग आवडतात नखांना लावलेले म्हणून प्रत्येक नख वेगवेगळ्या रंगाने रंगवलं.

चोकोनी रंगाचं धड काढलं. त्यावर डोकं. केसांच्या दोन बाजूला उडालेल्या वेण्या. त्यांना टोकाला दोन वेगवेगळ्या रंगांच्या रिबिनींची फुलं. डोळे. प्रत्येक डोळ्याचा आवर्जून रंग वेगळा. साडी. साडीवर डिझाईन. फुलं, पक्षी वगैरे. बरीच फुल आणि पक्षी चित्रं काढण्याच्या नादात साडीच्या बरेच बाहेर काढले गेले होते. चित्र खूप मस्त दिसतं होतं.चित्र ओळखायला त्रास होऊ नये म्हणून मी छान पैकी चित्राला नाव पण देवून टाकलं. ड्रॉईंगच्या मॅडमचा फोटो.

मी तर जाम खूष झालो स्वतःवर. आता उदया हा फोटो पाहिला की किती खूष होतील. माझा तर गालगुच्चाच घेतील. म्हणतील अरे लबाडा, असं होतं काय. म्हणून काल मोजमाप घेत होतास तर. बघारे कार्ट्यांनो, सुमे तूला म्हणतेय मी. जरा अक्कल घे याची...वगैरे वगैरे.

दुसऱ्या दिवशी, ड्रॉईंगच्या तासाला मी ते चित्रं पुठयाला चिकटवून फळ्याला टांगून ठेवलं. शिक्षक देवासारखे असतात असं बाबा म्हणतात. म्हणून त्यांना जास्त आदर दाखवायसाठी एक फुलांचा हार पण घालून दिला. आणि मॅडम ची वाट पाहात बसलो.

थोड्या वेळाने मॅडम वर्गात आल्या. त्यांनी ते फळ्यावर टांगलेलं चित्र पाहिलं आणि खूष होण्याच्या ऐवजी एकदम किंचाळल्या सारख्या ओरडल्या, कोणाचा शहाणंपणा आहे हा.

माझा मॅडम. मी ताठ उभं राहून म्हणालो. थोड्या वेळाने मॅडम मला पोटात चिमटी घेऊन वर उचलता आहेत असा मला भास व्हायला लागला.

नालायका, हार घालायला मी काय मेली आहे का? मॅडम, गणपतीत आपण नाही का देवाला हार घालत. मागे हेड सरांचा सत्कार करतांना तुम्हीच तर त्यांना हार घातला होता. मी रडत रडत बोलत होतो. मॅडम, स्वतःच्या डोक्यावर बुक्क्या मारत बसल्या होत्या. थोड्या वेळाने प्युन आला. त्याने मॅडमच्या तोंडावर पाणी मारून त्यांना शुद्धीवर आणले.

मला तर कोणाशी कसे वागावे. तेच समजेनासं झालंय. खऱ्याची दुनिया नसते हेच खरं.

# गीतासार

आमच्याकडे ती व्यक्ती जेवायला बसली होती. जेवणाच्या ताटाला नमस्कार करून त्यांनी चार पाच घास घेतले व सर्व पदार्थांना दाद दिली. अगदी कोशिंबिरीत दाण्याच्या कुटाबरोबर आणखी काय घातलंय वगैरेही विचारून घेतलं. मी मुद्दाम वेगळा गोड पदार्थ म्हणून श्रीखंड-बासुंदी ऐवजी मोदक केले होते. त्याचीही छान पावती दिली.



मला फार प्रसन्न वाटत होतं कि पाहुणे आवडीने जेवताहेत. त्यांच्या बरोबर माझे सासरे व मुलीही जेवत होत्या. सासरे, मी व पाहुणे त्यांचा हातखंडा विषय गीतासार , त्यावरची व्याख्यानं, प्रवास व इतर उपक्रम याबद्दल बोलत होतो. पण मुली मात्र शांतपणे जेवत होत्या. मधेच पाहुण्यांनी मुलींशी बोलायचा प्रयत्न केला, पण त्या बोलायला बिचकताहेत हे त्यांच्या लक्षात आलं. जेवण झाल्यावर पुन्हा काही तरी विचारल्यावर, माझ्या मुलीने सांगितलं कि काका, तुम्ही गीता या विषयावर बोलत होतात. त्यात मला काय कळणार, म्हणून मी मधे बोलले नाही !! ह्यावर पाहुणे छान हसले व तिला म्हणाले, अगं, गीता कळायला खूप सोप्पी आहे. तुला न कळायला काय झालं? आत्ताचंच उदाहरण घेऊ या. तुझ्या आईने आम्हाला, सास-यांनी जेवायला बोलावलंय हे कळल्यावर, तत्परतेने आणि वेळेवर छान स्वयंपाक केला. हो ना बाळा ? हाच कर्मयोग !! आपल्या वाट्याला आलेलं काम आनंदाने व वेळच्या वेळी करणे !!

माझ्या मुलीला हे इंटरेस्टिंग वाटलं ! पाहुणे पुढे म्हणाले, तुझ्या आईला स्वयंपाक कसा करावा हे शिकावं लागलं असेल. तिच्या आईकडून, मैत्रिणींकडून, किंवा पुस्तकं वाचून तिनं हे ज्ञान मिळवलं. ते स्वतः प्रॅक्टिस करून वाढवलं व आज योग्य पद्धतीनं वापरलंय. खरं ना? मुलीला हे सगळं छान पटत होतं! नव नवीन गोष्टी योग्य गुरूंकडून शिकणं, त्याचा अभ्यास करणं, त्याचा प्रत्यक्षात उत्तम उपयोग करणं. हाच गीतेतला ज्ञानयोग आहे, बरं का बाळा !! काकांचं बोलणं पटकन कळल्या मुळे मुलीला इंटरेस्ट घेऊन ऐकावसं वाटत होतं. मी ही थक्क झाले. मग काका म्हणाले, आता आणखी एक गंम्मत सांगतो. तुझ्या आईने किती सुंदर पद्धतीनं केलेले पदार्थ ताटात वाढले होते व प्रेमाने आग्रहाने स्वतः बाजूला उभी राहून ती वाढत होती, आग्रह करीत होती. होय ना बाळा ?

हो, पण त्यात काय नवीन! .. मोकळेपणाने कन्या विचारती झाली. अगं, यालाच म्हणायचं भक्तियोग !!

समोर जर देण्या योग्य कोणी असेल, तर आपल्याकडे जे असेल ते प्रेमाने, भावपूर्वक, आनंदाने समोरच्याला द्यावे, हेच तर भक्तियोगात सांगितलंय !!गीतेतील हे कळीचे मुद्दे एवढ्या सोप्या शब्दात, साध्या पद्धतीने सांगणारे हे पाहुणे होते, विद्यावाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर !

# माझ्या आठवणीतील धुळं

(पान ३ वरुन) रहायचे. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे पोलीस ग्राउंडवर भाषण झाले होते. तेव्हा भारताच्या पंतप्रधानांचे भाषण ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती तेव्हा मी लहान होतो पण चांगले आठवते. अटल बिहारी वाजपयी यांच्या भाषणाचा लाभ धुळे करांना झाला होता. शांतपणे आपले विचार मांडण्याची त्यांची शैली अजुनही आठवते. तसे अनेक नेते अभिनेते धुळ्यात आल्याचे आठवते . धुळेकरांच्या भरपुर आठवणी आहेत . म . रफी साहेब यांचा गीतांचा कार्यक्रम उर्दू हायस्कुल च्या मदती साठी नूतन हायस्कुल च्या मैदानावर झाल्याचे आठवते . महेंद्रकपुर यांचा देखिल गीतांचा कार्यक्रम सोध्दारक च्या मैदानावर झाला होता . हिंदी अभिनेत्री नूतन यांचा एका शाळेच्या मदतीसाठी गीतांचा कार्यक्रम झाला होता . रावसाहेब गरुड व आम्ही मित्र कंपनी नूतन यांच्याशी मराठीतून संवाद साधला होता . रावसाहेबांचा त्यांच्याशी पूर्वपरिचय होता.अश्विन महिन्यात श्री . बालाजी महाराजांचा रथोत्सवा चा भव्य दिव्य कार्यक्रम असतो . धुळे शहरातील ही दिडशे वर्षा पासून चाललेली ही परंपरा आहे . नवरात्रोत्सव नंतर दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी श्री . बालाजी महाराजांचा रथ धुळे शहराच्या प्रमुख रस्त्यावरून ओढला जातो . धार्मिक व धुळेकरांची प्रचंड गर्दी श्री बालाजी रथोत्सवाच्या वेळी बघायला मिळते. धुळ्यात भरपुर आठवणी आहेत. आम्ही धुळेकर भाग्यवान आहोत. सत्तर वर्षांपूर्वी धुळे जळगाव नासिक यांची लोकसंख्या जवळ जवळ बहुधा सारखी असावी . धुळ्या पेक्षा दोन्ही शहरांचा औद्योगिक दृष्ट्या खूप प्रगती झाली विकास झाला . परंतु धुळे आमचे आहे तेथेच आहे . धुळ्यातील लोक शांत व खूप भावूक आहेत पण मर्यादेपेक्षा जास्त सोशिक आहेत. आमच्या धुळ्याच्या तरूण युवकांना नोकरी साठी मुंबई ' पुणे व नासिक कडे धाव घ्यावी लागते आणि पुढे ते तिकडेच स्थायिक होतात . परंतु धुळ्याचं नाव काढलं की ' त्यांचं मन हेलावतं .आठवणीतलं धुळं हा माझा पहिला लेख दै आपला महाराष्ट्रच्या ' बहर ' पुरवणीतून छापून आला होता. तो खूप व्हायरल झाला. मला मुंबई पुणे ' व राज्या बाहेरून फोन आले . इतकंच काय परदेशातून देखिल फोन आले. म्हणायचे राव तुम्ही आम्हाला धुळ्याच्या आमच्या आठवणी आपण जागवल्यात. केवळ धुळ्यात नोकरी नाही म्हणुन धुळं सोडावं लागलं. ही खंत त्यांनी प्रत्यक्ष फोन वरून व्यक्त केली. त्यांचं म्हणणं योग्य त्यांची व्यथा अगदी योग्य आहे . त्याला कोण जबाबदार हे सांगणे न लगे. युवकांच्या या व्यथा कधी दूर होणार कोण जाणे? असो !

# शब्दझुला

## मन्हं लाडकं सासर

रातदिन उडे फुलवर भुंगा
बापनी घर तशी खेवनु मी बाई!
एक गव्हानमा चारा खातिस गायी
भाऊबैनिसमा तशी जेवनु मी बाई!!
दिनेदिन वाढे दारशेनी तुयशी
तशी दिनेदिन मी वाढनू मी बाई!!
लेक लेक म्हने बाप मन्हा खुशीभरे
येनीफनी करी मन्ही माय लाड करे!!
फुलता फुलता फुल नजरे भरनं
भोया बापले माय मन्हं व्हजं व्हयनं!!
फुलेलं फुल झाडवरनं तोडानं
फुल मंदीरमा जसं देववर पडनं!!
व्हतं फुलनं नशीब त्याले मंदीर भेटनं
तसं लगिन महं सीतासंयवर वाटनं!!
सासरा मन्हे मन्हा व्हवूना पायगुन
सासू म्हने मन्ही व्हवू सुगरन!!
थट्टा मस्करीना दिल लछमन दिसना
जनमनी गाठले पती परभूराम भेटना!!
सासर गरीब जरी न्हावाले झोपडी
निजा आथराले नई वं फाटेल गोधडी!!
सासू पतीना कवतुकमा
याद येतीस नई वं गाद्या!!
सासरानी मुडेल झोपडी
जशी परभू यांनी अयोध्या!!
पडे घडीभर माह्यरना इसर
लाडकवतिकनं मन्हं लाडकं सासरं!!

–रमेश महाले
शहादा, ९२८४४०११६६

## नवोदय

स्वातंत्र्याधी कष्टदायी
डोकावता वर्तमानी
तरी रम्य फलदायी
दिन मंतरल्यावानी (१)
समानता अक्षौवंत
सिध्द रुजता सुडौल
सकृतदर्शनी दक्ष
दिव्य समाज सुबुध्द (२)
नाना रंग अंतर्बाह्य
खंडप्राय अखंडिता
इथं संजिवनी साध्य
खुले, फळे एकात्मता (३)
जय सार्वभौमत्वाचा
संविधान लक्षणीय
समसूत्री भारताचा
संकल्पीय नवोदय (४)

–डॉ.पापालाल पवार



## कशासाठी ?

कशासाठी ? .
टिचभर पोटासाठी '
जमविते कणकण '
मुंगी . पोटासाठी !
कशासाठी ?
जन्मलेल्या पिल्लांसाठी '
बांधिते घरटे झाडाला '
.. सुगरण बाळांसाठी !
कशासाठी ?
भुकेल्या वासरासाठी .
दाटतो पान्हा तिला .
हंबरते गाय ' तान्हुल्या लेकासाठी
. कशासाठी ?
बाळाच्या शाळेसाठी .
करते तयारी लवकर उठून .
आई मुलांच्या भविष्यासाठी ?
कशासाठी ?
बाळाच्या शिक्षणासाठी .
घाम गाळून जमवितो पैका .
बाप पोरांच्या उद्धारासाठी
म्हणून म्हणतो बाबा ..
आई वडिलांना जपा .
त्यांच्या स्वप्नांच्या जगात .
तुमची जागा कायम राखा ।

–अशोक धनु
९३७३८३ ५८३७

## चैत्र गौर...

आली गौराई गौराई
लेक आली माहेराला
चैत्र मास बहरला
जणू आज स्वागताला.
आली गौराई गौराई
मन गेले हरखून
दृष्ट तिची काढताना
लिंबू लोण उतरून.
आली गौराई गौराई
साक्षात ही अन्नपूर्णा
तिचा पती सदाशिव
शोभे कैलासीचा राणा.
आली गौराई गौराई
झाले नेत्र निरांजन
ओवाळीता प्रेमभरे
आले भरून लोचन.

–दिलीप कुळकर्णी
नाशिक



## विसरलो मी जाण

खातो आज मी रे घास ! नाही लागे तो जिवास !
कुणा नाही मिळे घास ! कशी विटंबना रे ।।
दोन घुट पाणी पिता ! तहानली गावे आता !
नाही पाहावे ते आता ! कुठे तू भागिरथा ।।
मत मागतो रे येथे ! मतलबी अशी जथे !
चाले राजकारण ते ! नको अशी पुढारी ।।
झाली रिकामी ती गावे ! आता उरली आसवे !
नाही हाल ते पाहावे ! किती घरे फुटली ।।
केला मोठा पैसा कसा ! वाढे महागाई वसा !
भ्रष्टाचार माजे असा ! मिळे ना दाम आता ।।
शेतकरी आत्महत्या ! पैसा प्रवृत्त रे हत्या !
नाही सत्याची रे रित्या ! विसरले हे आज ।।
एकेकाळी संपन्न रे ! खेडी माझी अशीच रे !
नांदी सुखात सारी रे ! उध्वस्त ती झाली ।।
बोलबाला शहराचा ! नाही विकास कामाचा !
थाट वाढे श्रीमंतांचा ! हरवला माणूस ।।
नको रे देवा हे जग ! येथे येऊन रे बघ !
लागे कशी हि रे आग ! तुझ्या घेना चरणी ।।

–उमाकांत काळे
अकोला, ९९२२८५५५३९

# साचलेल्या पाण्यामुळे साथीचे आजार बळावण्याची शक्यता पुसनद ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष; नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**शहादा, दि.१९ (का.प्र.)- पुसनद ता.शहादा या गावाच्या प्रवेशद्वारावर गुरांसाठी तयार करण्यात आलेल्या पाणवठ्याजवळ मोठ्या प्रमाणात साचलेल्या पाण्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून रोगराईचा संभाव्य धोका निर्माण झाला आहे. स्थानिक रहिवाशांनी या समस्येची तक्रार वारंवार ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडे केली आहे.मात्र ग्रामपंचायतीने त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

तालुक्यातील पुसनद हे सुमारे ३००० पेक्षा अधिक लोकवस्तीचे गाव असून गावात प्रवेश द्वारा जवळच पानवठा आहे. या पाणवठ्याशेजारी साचलेल्या पाण्यामुळे सर्वत्र दलदल निर्माण झाली आहे. परिणामी आरोग्याची समस्या पसरली असून स्थानिक रहिवाशांनी याबाबत वेळोवेळी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व सरपंच यांना प्रत्यक्ष भेटून परिसर स्वच्छतेची मागणी केली आहे.मात्र ग्रामपंचायतीकडून या समस्येकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप रहिवाशांकडून करण्यात येत आहे. याबाबत एका स्थानिक रहिवाश्याने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतांना सांगितले की, गावाच्या आरोग्यासाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे. लहान मुले, वृद्ध, तसेच सर्वसामान्य नागरिक यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. मात्र सरपंच व ग्रामसेवक वेळ काढू धोरण अवलंबत असल्याने आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला आहे. साठलेल्या पाण्यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता असून याबाबत त्वरित निर्णय घेऊन या परिसरातील अस्वच्छता दूर करणे करण्यास प्राधान्य द्यावे.दरम्यान, ग्रामपंचायतीने यासंदर्भात त्वरित उपाययोजना कराव्यात. परिसर स्वच्छ करून निर्जंतुकीकरण करावे, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली असून या परिसरातील साफसफाई त्वरित न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही रहिवाशांनी दिला आहे.

# साक्री शहरात जिजाऊ रथ यात्रेच्या भव्य स्वागताची जय्यत तयारी; पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत नियोजन



**साक्री, दि.१९ (प्रतिनिधी)- मराठा सेवा संघ संचलित, मराठा जोडो अभियानांतर्गत, आयोजित जिजाऊ रथ यात्रेचे साक्री तालुक्यात दि.२२ एप्रिल रोजी सायंकाळी आगमन होत असून या रथयात्रेचे साक्री तालुक्यात भव्य स्वागत करण्याचा संकल्प करण्यात आला.**

छ.शिवाजी महाराजांना अपेक्षित असलेला अठरा पगड जातीतील संपुर्ण महाराष्ट्रातील बहुजन समाज एकोप्याने राहून त्याने आपली सर्वांगीण प्रगती साधावी आदि विचारांच्या प्रबोधनार्थ गेल्या १८ मे रोजी वेरुळ येथुन निघालेली मराठा सेवा संघ संचलित, मराठा जोडो अभियानाच्या जिजाऊ रथ यात्रेचे साक्री तालुक्यात २२ एप्रील रोजी सायंकाळी शेवाळी व नंतर साक्री शहरात आगमन होत आहे.या साठी यात्रेचे शहरातील राजे लॉन्स पासुन स्वागत करुन जिजाऊ रथाचे गोल्डी चौक,बस स्थानकरोड, लक्ष्मी रोड,आकाश कलेक्शन, तहसील कार्यालय रोड अशा मार्गाने रथ व रॅलीचा समारोप छ.शिवाजी वाचनालयाच्या प्रांगणात होवुन जिजाऊंच्या रथारुढ पुतळ्याचे व छ.शिवरायांच्या पुतळ्याचे पुजन आमदार मंजुळाताई गावीत तसेच सर्व समाजाच्या २१ जोडप्यांच्या शुभ हस्ते जिजाऊ रथाचे पुजन केले जाईल व तेथेच सभेचे आयोजन करण्यात आले आहे .सदर जिजाऊ रथ यात्रेत,शहर व तालुक्यातील सर्व बहुजन समाजातील बंधु भगिनींनी मोठ्या संख्येत उपस्थितीत राहण्याचे आवाहन काल संपन्न झालेल्या बैठकीत करण्यात आले.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष संदिप पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्य सहसचिव चंद्रशेखर भदाणे, जिल्हा कोषाध्यक्ष सुनील पवार, साक्री तालुका अध्यक्ष प्राचार्य बी.एम. भामरे, शिंदे गटाचे तालुका शिवसेना प्रमुख पंकज मराठे, साक्री तालुका मराठी पत्रकार संघाध्यक्ष विजय भोसले, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष, दिपक नांद्रे व संजय पाटील, श्यामकांत साळुंखे, प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे, नगरसेवक बाळा शिंदे, डी. एल.साळुंखे, अनील अहिरे, माधवराव पाटील, सतिश पेंढारकर, भ्रष्टाचार निर्मुलन समीतीचे राज्य पदाधिकारी अनील देसले, पी.झेड.कुवर, भाडण्याचे लोकनियुक्त सरपंच अजय सोनवणे, गिरीश नेरकर, विजय काकुळते आदि उपस्थित होते. यात्प्रसंगी जिल्हाध्यक्ष संदीप पाटील व चंद्रशेखर भदाने यांनी मार्गदर्शन केले, तर प्रास्ताविक व आभारप्रदर्शन प्राचार्य बी.एम भामरे यांनी केले.

# कर्नाटक ते दिल्ली पायी निघालेल्या मंजुलाचे सोनगीरमध्ये स्वागत!



**सोनगीरदि.१९ (प्रतिनिधी) - रायचूर (कर्नाटक) जिल्ह्यातील बेंडोंनी गावची तीस वर्षीय मंजुषा मेगीमुखा ही तरुणी महिलांवरील अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार आणि वाढत्या असुरक्षिततेविरोधात आवाज उठवण्यासाठी चक्क दोन हजार किलोमीटरचा पायी प्रवास करत आहे. तिचा निर्धार आहे की दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घ्यायची आणि देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न त्यांच्यासमोर मांडायचा.**

पंचवीस मार्चपासून मंजुलाने आपल्या या प्रदीर्घ प्रवासाला सुरुवात केली आहे. आतापर्यंत तिने ८०० ते ९०० किलोमीटरचा टप्पा पार करत धुळे जिल्ह्यातील सोनगीर गावात प्रवेश केला, जिथे तिचे भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आर.के. माळी, पि.के. शिरसाट, किरण रमेश खैरनार, रवी बडगुजर, शिवा भिल, अंकित वर्मा, छोटू महाजन आणि गावकऱ्यांनी स्वागत केले.सोनगीरमध्ये बोलताना मंजुलाने आपल्या निर्धाराचा पुनरुच्चार केला. ती म्हणाली, माझं उद्दिष्ट स्पष्ट आहे दिल्ली गाठून पंतप्रधानांना भेटायचं आणि देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न थेट मांडायचा. मंजुला दररोज सरासरी ५० किलोमीटरचा प्रवास करत एक प्रकारे देशातील व्यवस्थेला जागे करण्याचा प्रयत्न करत आहे. तिचा हा लढा केवळ एका महिलेसाठी नसून प्रत्येक अन्यायग्रस्त महिलेसाठी आहे, ज्यामुळे तिला समाजाच्या विविध स्तरांतून मोठा पाठिंबा मिळत आहे. देशात महिलांवरील अत्याचार, बलात्कार, शोषण आणि भ्रष्टाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मंजुलाचा हा निर्धार अधिक महत्त्वाचा ठरतो. तिला वाटते की कायद्याचा धाक कमी झाला आहे आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी कठोर पाऊले उचलणे गरजेचे आहे. म्हणूनच ती थेट पंतप्रधानांना भेटून आपले म्हणणे मांडणार आहे आणि कठोर कायद्यांची मागणी करणार आहे.एकटीने एवढा मोठा प्रवास करत असताना मंजुलाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे तिच्या सुरक्षेसाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. सोनगीरनंतर मंजुलाचा पुढील प्रवास शिरपूरमार्गे दिल्लीच्या दिशेने सुरू झाला आहे. दिल्ली गाठण्यासाठी तिला अजून सुमारे १००० किलोमीटरचा प्रवास करायचा आहे. मात्र, तिच्या चेहऱ्यावर थकवा नसून केवळ 'महिलांना न्याय मिळालाच पाहिजे' आणि भ्रष्टाचाराला आळा बसला पाहिजे, असा दृढ निर्धार दिसून येतो. भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष माळी यांनी मंजुलाच्या या प्रयत्नांचे कौतुक केले.

# देवरे अभियांत्रिकीत आयईटीई स्टुडंट्स फोरमचा शुभारंभ



**धुळे दि.१९- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे ईलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांसाठी इन्स्टिट्यूशन्स ऑफ ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन्स इंजिनिअर्स (आयईटीई) या राष्ट्रीय स्तरावरील असोसिएशनच्या महाविद्यालयातील फोरमचे औपचारिक उद्घाटन नुकतेच आयईटीईच्या आजिव सदस्या, माजी सचिव व नासिक येथील अवकाश विज्ञान प्रशिक्षक, अभियंता मा अपूर्वा जाखडी यांच्या हस्ते संपन्न झाले.**

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.हितेंद्र पाटील, ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा.डॉ.विनोद शिंदे, प्रा.डॉ. सौ संगीता राजपूत, ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी प्रा.डॉ.सागर मोरे, अॅप्लाईड सायन्स विभाग प्रमुख प्रा.डॉ.अभिजीत मोरे या प्रसंगी उपस्थित होते. प्रा.डॉ.संगीता राजपूत यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची संकल्पना मांडली. प्रमुख अतिथींचा परिचय समन्वयक प्रा.सौ.दिपमाला पाटील यांनी करून दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. पाटील यांनी आय ई टी ई स्टुडंट्स फोरम च्या शुभारंभास निमित्ताने सदस्य झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व अपूर्वा जाखडी यांचा महाविद्यालयाच्या वतीने औपचारिक सन्मान केला. अपूर्वा जाखडी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ईलेक्ट्रॉनिक्स अभियंत्यांना भविष्यातील अवकाश संशोधन क्षेत्रातील करिअरच्या संधीबाबत सखोल मार्गदर्शन केले व जास्तीत जास्त संख्येने अभियंत्यांनी स्पेस सायन्स विभागात करिअर करण्यासाठी आग्रही असावे असे प्रतिपादन केले तसेच आय ई टी ई स्टुडंट्स फोरमच्या सदस्यतेमुळे होणारे शैक्षणिक फायदे रिसर्च पेपर्स, ऑनलाईन जर्नल्स इ बाबतीत महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

याप्रसंगी ईलेक्ट्रॉनिक्स विभागात प्रकल्प सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यात तृतिय वर्षातील हर्षल चौधरी याने प्रथम पारितोषिक मिळवले त्यास जाखडी यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. विद्यार्थी प्रतिनिधी यज्ञेश वाडेकर, वेदांत दलाल, गौरी सोनार, परिणीता गुळवे यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ईलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन ने या कार्यक्रमाचे संयोजन केले. या प्रसंगी प्रथम द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एनएलसी इंडियाचे संचालक डॉ.वसंत पाटलांचा आ.पाडवींकडून सत्कार



**शहादा, दि.१९ (प्रतिनिधी)- शहरातील सुदर्शन नेत्रालयाचे नेत्ररोगतज्ञ डॉ.वसंत अशोक पाटील यांची केंद्रीय कोळसा व खाण मंत्रालय अंतर्गत एनएलसी इंडिया लिमिटेडच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल शहादा-तळोदा मतदारसंघांचे आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

शहादा शहरातील धन्वंतरी डॉ.वसंत पाटील याची राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांच्या आदेशान्वये केंद्रीय कोळसा व खाण मंत्रालय अंतर्गत एनएलसी इंडिया लिमिटेडच्या संचालकपदी निवड करण्यात आली असून या निवडीबद्दल शहादा - तळोदा मतदार संघाचे आमदार राजेश पाडवी यांनी सत्कार केला. यावेळी आ.राजेश पाडवी म्हणाले की, केंद्र शासनाच्या कोळसा व खाण मंत्रालय अंतर्गत असलेल्या एनएलसी इंडिया लिमिटेड या शासनाच्या उपक्रमावर संचालकपदी नेत्रतज्ज्ञ डॉ.वसंत पाटील यांची निवड होणे ही आपल्या नंदुरबार जिल्ह्यासाठी कौस्तुकास्पद व अभिमानाची बाब असल्याचे सांगत शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजपचे नंदुरबार जिल्हा उपाध्यक्ष प्रा.मकरंद पाटील, उपाध्यक्ष विनोद जैन, संजयभाऊ कासोदेकर, जयदेव पाटील, तिरूपती पाटील, स्वियं सहायक हेमराज पवार, प्रशांत कुलकर्णी, पंकज सोनार, हेमंत चौधरी, विशाल पाटील, प्रशांत पाटील, पत्रकार राधेश्याम कुलथे आदी उपस्थित होते.


**आपला महाराष्ट्र**
**वाचकांना विनम्र सुचना**

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी याची नोंद घ्यावी.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिंपरी ता. जि. धुळे येथील .

**७/१२ उताराप्रमाणे** - १) ग.नं.८१/२ एकूण क्षेत्र ला. ला. ०,२०.०० आर. आकार रु. १.०६ पैसे, २) ग. नं. ८१/३ एकूण क्षेत्र ला. ला. ०.२०.०० आर. आकार रु. १.०८ पैसे पैकी रेल्वे संपादीत क्षेत्र सोडून ०.२६.०० आर चा सौदा केलेला आाहे. ही शेतजमीन/मिळकत रियाजुद्दीन मजहरुद्दीन जिलानी रा. समर्थ कॉलनी, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून त्याची चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

**मिळकतीचे मालक :** यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिल यांचे सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, मुखत्यारपत्र, हस्तांरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे. सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १९/०४/२०२५

**अॅड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**

पहिला मजला,अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे

मो. ९८८१९२९४२४ (नोटीस देणारतर्फे अॅडव्होकेट)



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँक, पतसंस्था, सावकार व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन–** तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे, मौजे धुळे येथील स.नं.३९९/१+२+३ पैकी प्लॉट नं.२९ चे क्षेत्र २८८ चौ.मी. व सदर प्लॉट यास विस्तारीत सि.स.नं.१०८२४ क्षेत्र ३७७.२५ चौ.मी. यात बांधलेल्या पद्मश्री रेसिडेन्सी–VIII यातील ग्राउंड फ्लोर वरील गाळा नं.१ चे क्षेत्र ८.२८ चौ.मी. व ग्राउंड फ्लोर वरील गाळा नं.२ चे क्षेत्र ८.२८ चौ.मी., यासी चतु:सिमा मंजूर प्लान प्रमाणे.

वरीलप्रमाणे वर्णन असलेली मिळकत ही श्री.संदीप शिवदास चौधरी रा.गल्ली नं.६, नव भारत चौक, व श्री.पराग सुभाष अहिरे रा.१०३, नेताजी कॉलनी, देवपूर, धुळे यांनी एकमेकांसोबत सदर मिळकतीचा विकसन करारनामा केले असून वरीलप्रमाणे वर्णन असलेली मिळकत श्री.संदीप शिवदास चौधरी यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीचा खरेदीचा करण्याचा सौदा आमचे अशिल यांनी श्री.संदीप शिवदास चौधरी रा.गल्ली नं.६, नव भारत चौक, धुळे, यांचे सोबत केला आहे.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे सौदा, करार, बक्षीस, अदला–बदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, कुळ, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तसेच न्यायिक व इतर प्रकरणे असल्यास पुराव्यानिशी लेखी हरकती वरील पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत नोंदवाव्यात. ७ व्या दिवसांनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलावर व वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत व सदर मिळकत निर्बोज व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याचीही नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. **धुळे, दि.१९/०४/२०२५.**

**अॅड.श्रेष्ठ शंकरलाल अग्रवाल**

शॉप नं.५, डीवाईन हॉटेल च्या खाली, पांडव प्लाझा, रेल्वे स्टेशन रोड, धुळे.

मो.नं.९५६१८४५२०७, ९३५९९७६४४७



## टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व हितसंबंधी व वित्तीय संस्था, यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचे तर्फे अॅड.बाळासाहेब अ.पवार रा.धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी भटाबाई भिमराव पाटील रा.विश्वनाथ ता.धुळे, (विक्री करणार) यांचे मालकीची मिळकत मौजे विश्वनाथ ता.धुळे येथील ग/स.नं.२/१ यास ला.ला. क्षेत्र १ हे २१ आर, आकार ५ रू.२५ पैसे सदर व्यवहार करतांना ठरल्याप्रमाणे शेतात येणे जाणेसाठी ग.नं.१/१ चे क्षेत्रातून वापर व रस्ता आहे. यास चतु:सिमस मंजूर नकाशाप्रमाणे, ही मिळकत खरेदीचा सौदा मिळकत (विक्री करणार) व आमचे पक्षकार (विकत घेणार) यांचेत झालेला असून मिळकत मालक यांना आमचे पक्षकार यांनी बयाणा रक्कम देखील अदा केली आहे.

सदर कोणताही बोजा नाही व मिळकतीचे टायटल क्लीयर आहे असे विक्री करणार यांचे म्हणणे आहे.

सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, बोजा, गहाण, भाडेपट्टा, टाच, जप्ती, खरेदी–विक्रीकरार, सौदा पावती, हस्तांतरण, हिस्सा, अधिकार, बक्षिस, वारस हक्क, कोर्ट केसेस, हितसंबंध असल्यास व नियोजीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत आमचेकडे भेटून लेखी मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे वर बंधनकारक राहणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणचाही हितसंबंध नाही असे असे गृहीत धरून खरेदी करतील. परस्पर वर्तमान पत्राद्वारे घेतलेली हरकत ग्राहय धरली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकारने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दि.१९/०४/२०२५.

**अॅड.बाळासाहेब अ.पवार**

ऑफिस– अप्पर ग्राऊंड फ्लोअर गाळा नंबर ५, फॉरच्युन प्लाझा, गणपती रोड, जैन मंदिराच्या शेजारी, शिवतिर्थ व संतोषीमाता चौक जवळ, धुळे.

मो.नं.९४२३२३२९०४



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महिंदळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८०/२ पैकी प्लॉट नं. ३९ चे क्षेत्र १७८.२ चौ. मी. यास वि. सि. स. नं. ३०६५ चे क्षेत्र २०५ चौ. मी. यांसी चतु:सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ४०, दक्षिणेस : सर्व्हे नं. ८०/२, उत्तरेस : प्लॉट नं. ३८, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **श्री. पंढरीनाथ कृष्णा चौधरी** रा. मनमाड जीन, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **१) सौ. शारदा धनराज दाभाडे, २) श्री. धनराज आत्माराम दाभाडे** दोघे रा. ९, सुरभी कॉलनी, साक्री रोड, धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे आशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्व्न्सी, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: १९/०४/२०२५

**अॅड.विजय म.मोरे**

नोटरी –भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे फागणे ता. जि. धुळे येथील गट नं. ५४८/१/ब पैकी प्लॉट नं. १९ चे क्षेत्र १५० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं. २६, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. १८, उत्तरेस : प्लॉट नं. २०, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **१) श्रीमती रेणुका विलास बडगुजर, २) सौ. कांचन सुनिल बडगुजर** दोघे रा.कोपर खैराणे नवी मुंबई जि. रायगड यांचे मालकीची असून त्यांनी नमूद कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **श्री. महेश प्रकाश कोतवाल** रा. जुने धुळे, धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे आशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्व्न्सी, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: १९/०४/२०२५

**अॅड.विजय म.मोरे**

नोटरी –भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नकाणे ता. जि. धुळे येथील गट नं. १६०/१ पैकी प्लॉट नं. २३ ब चे क्षेत्र १२० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : गट नं. १५९, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. २३ अ, येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **श्री. राजाराम गोविंदा गुरव** रा. सुभाष नगर, जुने धुळे, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे आशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्टजप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्व्न्सी, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे. दिनांक: १९/०४/२०२५

**अॅड.विजय म.मोरे**

नोटरी –भारत सरकार

रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे मो. नं. ९८२२८५२६५०.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन – मौजे दळवेल ता. पारोळा जि. जळगांव येथील ग्रामपंचायत घर नं. ४० चे एकूण क्षेत्र २७.८८ चौ. मी. (३०० चौ. फुट) अशी मिळकत ही **श्री. वसंत शामराव पाटील** रा. दळवेल ता. पारोळा जि. जळगांव यांनी **श्री. भागवत शामराव पाटील** रा. दळवेल ता. पारोळा जि. जळगांव यांना दि. ३०/०१/२०१२ रोजी दुय्यम निबंधक सो. पारोळा जि. जळगांव येथील कार्यालयात, खरेदीखत दस्त क्र. ३३२/२०१२ अन्वये नोंदणीकृत पद्धतीने विक्री केलेली आहे.

यासी चतु:सिमा –

पुर्वेस : शिवाजी गुणू गवळी यांचे घर

पश्चिमेस : भगवान नामदेव पाटील यांचे घर

दक्षिणेस : भगवान नामदेव पाटील यांचे घर

उत्तरेस : रस्ता.

**उपरोक्त वर्णनाचे नमुद खरेदीखत दस्त क्र. ३३२/२०१२ हे हरविले आहे.**

तरी संपूर्ण जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद खरेदीखत दस्त क्र. ३३२/२०१२ च्या आधारे कोणताही व्यवहार करु नये. अथवा तसे करण्याचा प्रयत्न करु नये. आणि जर कोणी तशा प्रकारचा व्यवहार केला असेल किंवा कोणाकडे सदरील जाहीर नोटीस प्रदर्शित झाल्याच्या ७ दिवसांच्या आत खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे. आपण ७ दिवसांच्या आत न कळविल्यास तद्नंतर सदर खरेदीखत दस्त क्र. ३३२/२०१२ बाबत कोणाचीही कोणत्याही व कसल्याही प्रकारची तक्रार बंधनकारक राहणार नाही. ही जाहीर नोटीस दिली असे.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि. १९/०४/२०२५

**अॅड.ललित पांडुरंग देठे**

चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरिसर, धुळे

मो. नं. ९४०९८१६४४९



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे महिंदळे ता. जि. धुळे येथील स. नं. ७३/३ पैकी प्लॉट नं. ७ चे क्षेत्र १५० चौ. मी. यापैकी उत्तरेकडील क्षेत्र ७५ चौ. मी. यास विस्तारीत सि. स. नं. १५३४ सत्ता प्रकार क चे क्षेत्र १४८ चौ. मी. यापैकी उत्तरेकडील क्षेत्र ७४.०० चौ. मी. यात सुमारे २०– २५ वर्षापूर्वीचे आर. सी.सी. दुमजली बांधीव मिळकत यासी चतु:सिमा मंजूर ले–आऊट प्रमाणे.

येणे प्रमाणे मी मिळकतीचे मालक आम्ही **१) छायाबाई अशोक पारधी, २) सचिन अशोक पारधी, ३) अमृत अशोक पारधी, ४) कृष्णा अशोक पारधी,** सगळे रा. मिनाई कॉलनी महिंदळे ता.जि. धुळे यांनी आमच्या अशिले यांच्यसोबत सौदा केला आहे. सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचाही कोणतेही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरीत आहे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १९/०४/२०२५

**अॅड.उमेश व्ही.मुसळे**

प्लॉट नं. ३१, कृष्णा सोसायटी, एकता नगर, नकाणे रोड, देवपूर धुळे ४२४००२

मो. ८४८३८७०६२८/८४८५८११६२८३



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे** - स. नं. ३९३/२ पैकी प्लॉट नं. १८ चे एकूण क्षेत्र १६५.०० चौ. मी. हे शेख ईस्माईल शे. जालम पिंजारी रा. कबीर गंज, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकशाप्रमाणे.

**मिळकतीचे मालक :** यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रिचा आमचे अशिलांन सोबत सौदे करार केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. १९/०४/२०२५

**अॅड.दानिश अहमद अ.रऊफ (शेख)**

पहिला मजला,अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे

मो. ९८८१९२९४२४ (नोटीस देणारतर्फे अॅडव्होकेट)



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन–** मौजे धुळे म.न.पा. हद्दीतील स.नं.४१३/२+३ पैकी प्लॉट नं.३९ चे क्षेत्र ५०.६ चौ.मी. यास सि.स.नं.१३७८१ चे एकूण क्षेत्र ४९.५० चौ.मी. असा बखळ प्लॉट तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझे मालकीचा प्लॉटची चतुसिमा मंजूर नकाशा प्रमाणे

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट मिळकत ही अब्दुल मतीन मोहम्मद साबीर रा.देवपूर, धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कब्जे ताबे उपभोगातील आहे. सदरचे बखळ प्लॉट/मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३ दिवसांचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकारांने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे.

धुळे, दि.१९/०४/२०२५.

**अॅड.लखमीचंद अ.गुजर**

अॅडव्होकेट व नोटरी

ग.नं.२, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे.

मो.नं.९४२३४९३०८९



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, तसेच सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन– मौजे मोहाडी प्र.ल. ता.जि.धुळे हद्दीतील गट क्रं. व उपविभाग १७०/१/१/१९, त्यांसी क्षेत्र ३०.००.०० चौ.मी. आकार ३००.०० या वर्णनाची मिळकत त्यांसी चतु:सिमा मंजूर गाव नकाशा तसेच मंजूर ले आऊट प्रमाणे.

प्रस्तुत मिळकत ही आमचे पक्षकार प्रकल्प हिरामण राजपूत रा.प्लॉट नं.१९, शिवशक्ती धाम, बी.एस.एन.एल. ऑफिस शेजारी, मोहाडी, ता.जि.धुळे याची स्वकष्टार्जित मिळकत असून सदर मिळकतीवर आमचे पक्षकार स्व खर्चाने महादेव मंदिर व कालिका देवी मंदिर असे दोन मंदिर बांधणार आहेत.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा टाच, बोझा, वहीवाट हक्क, करार, मदार, खावटी हक्क, हस्तांतरण, कब्जा, व कोणत्याही प्रकाराचा असल्यास त्यांनी नियोजित मंदिराबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकाराची हरकत असल्यास त्यांनी लेखी पत्रासह खालील पत्त्यावर ७ दिवसांच्या आत कळवावे व तशा लेखी हरकती खालील नमूद पत्त्यावर पाठव्यात परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती चा विचार करता येणार नाही. लेखी हरकत तत्सम दस्तऐवजांसोबत प्रत्यक्ष नोंदवाव्यात.

प्रस्तुतची जाहीर नोटीस ही आमचे पक्षकारांनी दिलेल्या माहिती व अधिकारांवरून तसेच दाखविलेल्या दस्तऐवजांआधारे त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिध्दीस देण्यात आली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे, दि.१९/०४/२०२५.

**अॅड.राकेश डी.पाटील**

ऑफिस– बी–४, श्रीतेज बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स, साईबाबा मंगल कार्यालया जवळ, नकाणे रोड, देवपूर, धुळे.

मो.नं.९९७००८०४७७

पान १ वरुन

## मंदिर पाडल्याने जैन समाजाचे आंदोलन

त्यानंतर आंदोलनास सुरुवात झाली. मंदिर टूटा, हौसला नही, असे फलक घेऊन जैन समाजबांधव रस्त्यावर उतरले. मंदिर त्याच ठिकाणी हवे, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली. आंदोलनात भाजप नेते आणि मंत्री मंगलप्रभात लोढा, काँग्रेस नेत्या आणि खासदार वर्षा गायकवाड, आमदार पराग अलवाणी यांच्यासह इतर स्थानिक नेते सहभागी झाले होते.

## सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा

करण्यात येत आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष त्याचबरोबर ए.बी. फाउंडेशन व प्रतीक फाउंडेशन यांनी भरविलेले आरोग्य शिबिर उपक्रम सुत्य आहे. या शिबिराचा सर्वसामान्य नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. या शिबिरात जे आरोग्य पिडीत रुग्ण असतील त्यांचेवर पुढील उपचार सिव्हील हॉस्पिटल त्याचबरोबर हिरे वैद्यकीय मेडिकल महाविद्यालयात करण्यात येणार आहे. तसेच या ठिकाणी जे उपचार उपलब्ध होत नसतील अशा रुग्णांना पुढील उपचारासाठी नाशिक अथवा मुंबई येथे संदर्भीत करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री बोलताना पुढे म्हणाले की, धुळे जिल्ह्याला आरोग्य विषयक सर्व सोईसुविधांनी परिपूर्ण करण्याचं आम्ही ठरवलं आ-हेत. याकरीता सिटीस्कॅन सोबतच अजून काही मशिन लवकरच हिरे महाविद्यालयाला उपलब्ध होणार आहे. महिलांसाठी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी रुग्णालय, तालुक्याच्या ठिकाणी सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्यासाठी प्रयतक करणार आहे. धुळे जिल्ह्यात सर्वांना सोबत घेऊन आरोग्य, सिंचन, उद्योग, औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात काम करणार आहे. यावेळी त्यांनी ए. बी. फाउंडेशन आणि प्रतिक फाऊंडेशनच्या कामाचेही कौतुक केले.

यावेळी आमदार अनुप अग्रवाल आरोग्य शिबीर आयोजनामागील भूमिका विषद केली. माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.सुभाष भामरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आरोग्य शिबीरात रक्तदान शिबीर तसेच लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात आले या शिबिरास २ हजारापेक्षा अधिक नागरिक उपस्थित होते.

## अठ्ठावीस एप्रिलला गुंतवणूक परिषद

प्रकल्प उभे राहिले आहे. तसेच धुळे जिल्हा मध्यप्रदेश, गुजरात राज्याला लागून आहे. जिल्ह्यातून वाढवण, जेएनपीटी बंदरास जोडणारे रस्त्यांचे जाळे आहे. त्याचप्रमाणे रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, सिंचनाची व्यवस्था जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. येत्या काळात उड्डाण योजनेत धुळ्यातील एअरपोर्ट विकसित करणार आहे.

धुळे जिल्ह्यात येत्या काळात जागतिकस्तराचे अँकर इंडस्ट्री उद्योग आणण्यासाठी प्रयतक्शील असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे जिल्ह्यातील युवकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. धुळे जिल्ह्याचे अनेक उद्योगपती हे वेगवेगळ्या ठिकाणी स्वतःचे उद्योग निर्माण करतात. आता महाराष्ट्रभर, देशभरामध्ये आणि जगभरातील उद्योग हे पुढच्या काळामध्ये धुळे जिल्ह्यात उभे राहतील आणि धुळे जिल्हा मॅन्युफॅक्चरिंग आणि सर्व्हिसचं एक मोठं केंद्र म्हणून पुढच्या काळात भारतामध्ये उभा राहणार आहे. यासाठी २८ एप्रिल रोजी गुंतवणूकदारांच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या गुंतवणूक परिषदेस राज्यातील अधिकाधिक उद्योजकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

पालकमंत्री रावल यांनी बैठकीत गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी गुंतवणूक परिषदेचे ब्रँडींग करावे. मोठ्या उद्योजकांना गुंतवणूक परिषदेत आमंत्रित करण्यात यावेत. जिल्हा , तालुकास्तरावरील उद्योजकांना आंमत्रित करण्यात यावेत. त्याचप्रमाणे परिषदेत उत्कृष्ठ सादरीकरण करुन एक सकारात्मक वातावरण तयार करावे. एक खिडकी योजनेतून तसेच जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून उद्योजकांना सहकार्य करण्यात येईल. उद्योजकांना जागा, वीज, पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. एमआयडीसीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. अशा सूचना दिल्यात. यावेळी पालकमंत्री श्री.रावल यांनी काही उद्योजकांशी दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधून गुंतवणूक परिषदेस येण्याचे आमंत्रित केले.

यावेळी दूरदृष्यप्रणालीद्वारे आमदार अमरीशभाई पटेल, आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी गुंतवणूक परिषद यशस्वी करण्याच्या सूचना दिल्यात.

## इतरत्र वळवलेला निधी परत करा

अन्यथा आदिवासी समाज याविरोधात राज्यभर आंदोलन करून सरकारला त्यांनी केलेल्या चुकीच्या निर्णया बाबत माफी मागायला लावेल,यांची नोंद घ्यावी.

निवेदनावर जितेंद्र बागुल केंद्रीय संस्थापक तथा अध्यक्ष, संभाजी आर जगताप केंद्रीय संस्थापक सचिव, विनायक के.गावीत केंद्रीय संस्थापक सहसचिव, अँड कोमल जे. पावरा केंद्रीय संस्थापक सल्लागार, गुलाब एस. गावीत केंद्रीय संस्थापक कोषाध्यक्ष, सुभाष कोकणी केंद्रीय संस्थापक सदस्य, अँड.गीतांजली वाय पाडवी धडगांव तालुका सल्लागार जितेंद्र जी तडवी अक्कलकुवा तालुका अध्यक्ष दिनेश जी सोनवणे नंदुरबार तालुका अध्यक्ष सतिष पी भुसावरे नंदुरबार तालुका सचिव कालूसिंग डी वळवी धडगांव तालुका अध्यक्ष कुणाल एस गावीत धुळे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दाम दुप्पट करून देण्याचे अमिष

मोबाईलही हिसकावून फोन पे वरून बँक अकाऊंटमधील पैसे क्युआर कोडच्या माध्यमातून ट्रान्सफर करून घेत चाकुचा धाक दाखवून करंसी बाबतचे बनवलेले व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धुळे कृउबात भुईमुग आवक सुरु

जलस्तर पाहता. उन्हाळी भुईमुगाची लागवड केली होती. आता उन्हाळी भुईमुग काढणीला आला आहे. अशा परिस्थितीत अनेक शेतकऱ्यांनी भुईमुगाची काढणी करून तो बाजार समितीत विक्रीस आणला. अनेक शेतकऱ्यांनी भुईमुग विक्रीस आणल्यामुळे दर घसरले आहेत. दाखल झालेल्या भुईमुगाची पाहणी करतांनाच खरेदीदार व्यापारी तुलनात्मक फरक लक्षात घेत आहेत. त्यामुळे जास्तीस्त जास्त साडेसहा हजार प्रतिक्विंटल दर देण्याचे धाडस व्यापारी करीत आहेत. पण त्याचवेळी शेतकऱ्यांनी मात्र प्रतिक्विंटल ८ हजार रूपये मिळावे, अशी मागणी केली आहे. सरकारने शेतकऱ्यांना अपेक्षित योग्य दर शेतीमालाला द्यावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## सीए शाखेत एक दिवसीय कार्यशाळा

प्रस्तावित बदल या विषयावर मार्गदर्शन केले. सीए पीयूष बाफना यांनी फॉर्म सीए व सीबीचे अनुपालन व व्यावहारिक पैलू याबाबत बद्दल चर्चा केली. सीए संजीव मुथा यांनी कलम १४८ अंतर्गत पुनर्मूल्यांकन व उपाययोजना यावर आपले विचार मांडले.

कार्यक्रमास इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे सदस्या समवेत डामा, व्यापारी महासंघ व लघुउद्योग भारतीचे सदस्य मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यशाळेचे संयोजन सीए यश आंचलिया (अध्यक्ष), सीए प्रितेश चिंचोले (सचिव), सीए अयुष अग्रवाल (कोषाध्यक्ष) व सीए सोनी सोनार (विद्यार्थी परिषद अध्यक्षा), यांनी उत्कृष्ट पद्धतीने केले.

## तापमानामुळे पपईला कापडी अच्छादन

कडाक्याचे उन जाणवु लागले. गेल्या आठ दिवसापासुन तापमान सातत्याने ४३ अंश सेल्सिअसची पातळी गाठत आहे. तीव्र उन्हाचे सातत्य कायम राहिल्याने फळबागांवर विपरीत परिणाम होत आहे. फळबागेतील पपईची बाग सध्या अडचणीत आली आहे. तापमानामुळे पाने पिवळी पडू लागली आहेत. तर फळे डागाळत आहेत. अशा फळाला अपेक्षित किंमत मिळणार नाही. म्हणुन शेतकरी चिंताग्रस्त आहेत. उन्हापासुन पपईच्या फळांना वाचविण्यासाठी शेतकरी कापडी उच्छादनाचा वापर करीत आहेत. नवे आणि जुने कापड घेवुन फळे लगडलेल्या भागाला हे कापड बांधले जात आहे. उन्हाची तीव्रता कमी व्हावी, म्हणजे परिश्रम फलद्रुप होतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.

पान १ वरुन

## राजकारणात पुन्हा हेलकावे सुरु

त्यामुळे त्यांनी आपआपल्या पक्षाच्या भवितव्याचा विचार करून काय भूमिका घ्यावी, हा प्रश्न त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. या दोन्ही नेत्यांनी एकत्र यावे की नाही, याबाबत दुसऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाने भाकीत करण्याची गरज नाही. प्रत्येकाने आपल्या सद्विवेक बुद्धीला स्मरून योग्य वाटेल, तो निर्णय त्यांनी घ्यावा.

असे असताना उध्दव ठाकरे यांनी त्यांच्या मनातील खदखद देखील व्यक्त केली आहे, या गोष्टीची दखल एकत्रीकरणाचे संकेत देणाऱ्या राज ठाकरे यांना घ्यावी लागणार, असेही आता चर्चिले जात आहे. कारण, किरकोळ भांडण बाजूला ठेवायला मी तयार आहे. मराठी माणसाच्या आणि महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन मी पण करतोय. मात्र, माझी एक अट आहे. जेव्हा आम्ही लोकसभेच्या वेळेला सांगत होतो, महाराष्ट्रातून प्रमुख उद्योग व्यवसाय गुजरातमध्ये नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचवेळी विरोध केला असता केंद्रात आता दिसत असलेले सरकार दिसले नसते. महाराष्ट्राच्या हिताचा विचार करणारे सरकार केंद्रात आले असते. पण, तेव्हा पाठिंबा द्यायचा. आता विरोध करायचा आणि मग तडजोड करायची, हे असे चालणार नाही. महाराष्ट्राच्या हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचे मी स्वागत करणार नाही. ठोस निर्णय घ्यावा आणि मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी कराव्यात, असे उद्धव ठाकरे यांचे म्हणणे आहे. याचाच अर्थ लोकसभा निवडणूकीत मिळालेले यश केंद्रात सत्तास्थापर्यंत घेऊन जाणार होते. पण, तसे झाले नसल्याची खदखद उध्दव ठाकरे व्यक्त करीत आहेत. कदाचित, उध्दव ठाकरे यांच्या म्हणण्यानुसार केंद्रात भाजप प्रणित सरकार राहिले नसते तर नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या निकालाचे चित्र देखील वेगळे राहिले असते, असेही उध्दव ठाकरे सुचकपणे सांगू पहात आहेत.

या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शिवसेना पक्षाचा त्याग का केला, हे देखील वेगळ्या पध्दतीने सांगितले आहे. माझे शिवसेनेतून बाहेर पडणे आणि एकनाथ शिंदे यांचे शिवसेनेतून बाहेर पडणे यात मोठा फरक असल्याचा दावा राज ठाकरे करतात. त्यासाठी राज ठाकरे म्हणतात, मी शिवसेना सोडली त्यावेळी काही आमदार माझे कडे आले होते. पण, काही आमदारांना सोबत घेऊन बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवाय अन्य कुणाच्या हाताखाली काम करणार नाही, हे मी ठरविले होते. मात्र, शिवसेनेत होतो तेव्हा उध्दव ठाकरे यांच्यासोबत काम करण्यास माझी तयारी होती. पण, मी त्यांच्यासोबत काम करावे, असे उध्दव ठाकरे यांना वाटते का. तसे त्यांनी महाराष्ट्राला सांगावे. लहान-मोठ्या बाबीत मी माझा अभिनिवेश आणत नाही, असे स्पष्टीकरणही राज ठाकरे यांनी दिले आहे.

थोडक्यात, हो-नाही म्हणत एकत्र येण्याबाबत राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे अनुकुल असल्याचे त्यांच्या जाहीर होत असलेल्या प्रतिक्रियांवरून दिसते. खरे तर ही चर्चा राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेष म्हणजे मुंबई महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर होत आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. कारण, श्री. राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे यांच्या आजवरच्या राजकीय वाटचालीची आणि कार्यशैलीचा विचार केला तर त्यांना राज्याची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई, नाशिक सारख्या महापालिकांची सत्ता महत्वाची वाटते, हे लपून राहिलेले नाही. त्यामुळे मुंबई महापालिकेसह राज्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी होत नाही तो पर्यंत अशा स्वरूपाच्या चर्चा होणारच आहे. कदाचित अशीच चर्चा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार सांभाळत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस बद्दल झाल्यास नवल वाटायला नको. कारण, राजकारणात काहीही शक्य असते, असे याच नेत्यांनी या पुर्वी त्यांच्या कृतीतून सांगितले आहे.

**आम्ही शिंदेंशीच बांधील : उदय सामंत**

मनसे हा राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली चालणारा पक्ष आहे. कोणाबरोबर युती करावी आणि कोणाबरोबर पुढे जावं हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. त्याच्यावर मी बोलणं योग्य नाही असे शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे. आम्ही शिवसैनिक म्हणून काम करतो. आम्ही एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयाला बांधील आहोत. राज ठाकरे यांनी काय करावे हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. त्यांचा आणि त्यांच्या पक्षाचा अंतर्गत हा विषय आहे असेही सामंत यांनी म्हटले आहे.

**ठाकरे बंधूंच्या युतीत भाजपला रस नाही : बावनकुळे**

भाजपा नेते आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावर प्रतिक्रीया देताना राज ठाकरे यांना त्यांच्या पक्षाची भूमिका मांडण्याचा अधिकार आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे युती होत असल्यास भाजपला मध्ये येण्याचं काही कारण नाही. लोकसभेत राज ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना साथ दिली होती. तो अत्यंत चांगला निर्णय राज ठाकरेंनी घेतला होता. आता राज ठाकरेंना काय करायचं शेवटी त्यांचा पक्ष आहे. त्यांनी भूमिका घ्यायची आहे असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## गुड फ्रायडे, इस्टर सण सेंट ॲन्स चर्च येथे साजरा



**धुळे, दि.१९- शहरातील मुख्य पोस्ट ऑफिस जवळील सेंट ॲन्स चर्च येथे गुड फ्रायडे व इस्टर सण बिशप लुर्डस डॅनिअल, पॅरीश प्रिस्ट रेव्ह. फादर विल्सन, फादर डॉमिनिक यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला.**

इस्टरपूर्वी होली विक दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात आले. पाम संडे पासून प्रारंभ होवून होली थर्स्टे, गुड फ्रायडे व त्यानंतर इस्टर विगीलचा कार्यक्रम अतिशय श्रध्देने पार पडला. बिशप लुर्डस डॅनिअल यांनी आपल्या प्रवचनातून प्रभु येशुच्या बलिदानाचे महत्व विशद केले आणि ख्रिस्ती जीवनातील पुनरूत्थानाची आशा प्रत्येक हृदयात जागवली. फादर विल्सन व फादर डॉमिनिक यांनीही मार्गदर्शन केले. यावर्षी द वे ऑफ द क्रॉस हे मरीया मातेच्या सात दु:खाची सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. या सजीव देखाव्यातून प्रेक्षकांना प्रभु येशूच्या क्रुसमार्गाच्या वेदनादायी प्रवासाची, माता मरियाच्या हृदयद्रावक सात दु:खांची अनुभूती मिळाली.

## घरफोडी चोवीस तासांत उघडकीस आणण्यात एलसीबीला यश

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- शहादा येथे दाखल गुन्हयातील आरोपींकडून एक लाख ५१ हजार ५०० रुपये रोख व सोन्या-चांदीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे.**

शहादा पोलीस ठाणे हद्दितील फिर्यादी नजमा अब्दुल रहमान खाटीक, रा.कुंभार टेक मच्छी बाजार, शहादा जि.नंदुरबार यांचे त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडुन कोणीतरी अज्ञात इसमांनी प्रवेश करुन एकुण १ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरुन नेला म्हणुन शहादा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत समांतर तपास सुरु असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा शहादा शहरातील मीरानगर भागात राहणाऱ्या मोनू ऊर्फ समीर शहा याने त्याचे साथीदारांसह केला आहे, बाबत खात्रीशीर बातमी मिळालेवरुन पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी स्था.गुन्हे शाखेचे पथकाला कारवाई करणेकामी सुचना केल्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाकडून मोनु ऊर्फ समीर शहा याचा शहादा शहरातील मीरानगर परिसरात शोध सुरु असतांनाच तो मिळून आला. त्यास विश्वासात घेऊन नमुद गुन्हयाबाबत विचारपूस करता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार शोएबखान शेरुखान पठाण, वय ३०, रा.शहीद अब्दुल हमीद चौक, शहादा, जि.नंदुरबार २. जुबेर ऊर्फ पप्पू हुसेन बेग, वय २१ रा.शहीद अब्दुल हमीद चौक, शहादा, जि. नंदुरबार अशांनी मिळून केला असल्याची कबुली दिली. संशयितांकडून एक लाख ५१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल तसेच सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले. सदर गुन्हा २४ तासांचे आत उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले आहे. तिघांनाही शहादा पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे. पोलीस उपनिरीक्षक मुकेश पवार, तसेच पोना.पुरुषोत्तम सोनार, विकास कापूरे, मोहन ढमढेरे यांचे सहकार्य लाभले.

### निधन वार्ता

**कृष्णा पोतदार**



सोनगीर दि.१९- येथील एन.जी. बागुल हायस्कूलचे क्रीडा शिक्षक कृष्णा वसंत पोतदार (वय ५४) यांचे धुळे येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते आनंद नगर, देवपूर येथे वास्तव्यास होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने क्रीडा क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

**भाऊराव माळी**



धुळे, दि.१९- इ.वि.का. राजवाडेसंशोधन मंडळातील ज्येष्ठ कर्मचारी भाऊराव पुंडलीक माळी (वय ६५) यांचे दि.१८ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. भाऊराव माळी गेल्या ३५ वर्षापासून मंडळात तळमळीने व प्रामाणिकपणे काम करीत होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. राजवाडे संशोधन मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रकाश पाठक, कार्याध्यक्ष संजय मुंदडा, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंदातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली आहे.

## भूमीअभिलेख विभागात भ्रष्टाचार उघड पुण्यात दोन अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा

**मुंबई, दि.१९- पुणे जिल्ह्यातील भूमीअभिलेख विभागातील भ्रष्टाचाराच्या एका गंभीर प्रकरणाने खळबळ उडाली आहे. जमिनीच्या मोजणी आणि हद्द निश्चितीच्या कामासाठी पन्नास लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपांनंतर भूमी अभिलेख विभागाचे उप अधीक्षक अमरसिंह पाटील आणि भूकरमापक किरण येटोळे यांच्या विरोधात पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी तक्रारदाराने थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे प्रकरणाची तक्रार केल्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कारवाई केली.**

तक्रारदाराने पुणे ग्रामीण भागातील एका शेतजमिनीच्या मोजणी आणि हद्द निश्चितीच्या प्रक्रियेसाठी २०२३ पासून भूअभिलेख विभागाकडे सातत्याने अर्ज केले होते. मात्र, उप अधीक्षक अमरसिंह पाटील आणि भूकरमापक किरण येटोळे यांनी वारंवार टाळाटाळ केली. याच दरम्यान, या दोन्ही अधिकाऱ्यांनी तक्रारदाराकडे जमिनीच्या कामासाठी लाख रुपयांची लाच मागितल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. एवढेच नव्हे, तर हेलिकॉप्टर शॉट लावतो अशी धमकी देऊन तक्रारदारावर दबाव टाकण्याचा प्रयत्नही केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

**महसूलमंत्र्यांकडे तक्रार, तातडीने कारवाई**

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन तक्रारदाराने थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी तक्रार केली. बावनकुळे यांनी तक्रारीची तात्काळ दखल घेत पुणे जिल्हा प्रशासनाला चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार, पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेने प्राथमिक चौकशी केली. चौकशीत तक्रारदाराच्या आरोपांना पुष्टी मिळाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

पाहिजेत
ताडपत्री मॅन्युफॅक्चरिंग कंपनीसाठी कारागिर पाहिजे.
-: संपर्क :-
अवधान एमआयडीसी
9130397130

पाहिजे
वेटर पाहिजे
-: संपर्क :-
हॉटेल प्रिया
नवग्रही, ग.नं.२, धुळे
8087564754

मेस साठी कॉन्ट्रॅक्टर पाहिजे
धुळे शहरात असलेल्या महाविद्यालयाच्या मुला / मुलींच्या वस्तीगृहासाठी कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने मेस देणे आहे तरी इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
Mo. 9421570327 / 7666479285

पाहिजेत
होलसेल औषधी दुकानात
१) लोकल मेडीकल स्टोअर्सवर माल पोहोचवण्यासाठी डिलीवरी बॉय, दुकानात माल काढण्यासाठी लेडीज किंवा जेन्टस्- ३
२) कॉम्प्युटर ऑपरेटर लेडीज-३
समक्ष भेटा!
युनिक कॉर्पोरेशन
बँक स्ट्रीट, सिटी युनियन बँकेच्यावरती, पहिला मजला, गल्ली नं.६, धुळे
9422296256

पाहिजेत
हेल्पर / सॉर्टर / डिलेव्हरी बॉय पाहिजे पगार १०,०००/-
-: संपर्क :-
एमआयडीसी, धुळे
8879442989

पाहिजेत
अग्रवाल नगर भागात घर कामासाठी बाई पाहिजे.
दिवसपाळीसाठी वॉचमन पाहिजे.
जोडपे असल्यास प्राधान्य. राहण्याची सोय उपलब्ध
-: संपर्क :-
9209201411

शेती विकणे आहे
गाव- विटाई ता.शिंदखेडा जि.धुळे येथील गट नं.८/१
क्षेत्रफळ : दिड बिघा
सामायिक विहीर
संपर्क : दिलीप पाटील
9529553175

प्लॉट विकणे आहे
सर्व्हे नं.९१, प्लॉट नं.२४, माहेश्वरी सोसायटी, ८५० स्क्वे.फूट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालयाजवळ, धुळे
रमेश गंगाराम साळवे
7066559455
9422288948

कामगार पाहिजेत
अवधान एमआयडीसी मध्ये फेब्रिकेशन कारखान्यात कामगार पाहिजेत.
-: संपर्क :-
9921053999

गोडाऊन भाड्याने देणे
MIDC मध्ये 600 sq.ft. चे गोडाऊन भाड्याने देणे
-: संपर्क :-
9822390888
9822388653

पाहिजेत
रेडिओलॉजी डायग्नोस्टीक सेंटरसाठी फिमेल टाईपिस्ट/ कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. समक्ष भेटा!
विमला डायग्नोस्टिक्स
जुगल वस्त्रालयासमोर, गल्ली नं.४, धुळे

पाहिजेत
ऑफिस करिता अनुभवी अकौन्टंट व टॅलीचे ज्ञान आवश्यक. समक्ष भेटा!
-: संपर्क :-
9823178279

पाहिजेत
१) सेल्समन- १
२) कॉम्प्युटर ऑपरेटर-१
३) टॅली ऑपरेटर- १
प्राधान्य MBA
कॉटन मार्केट जवळ, धुळे
-: संपर्क :-
9923532231

दुकान भाड्याने देणे
ग.नं.४, रथगल्ली, गजानन टी समोरील दुकान भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9420439886
8329799386

पाहिजेत
हॉस्पीटलसाठी असिस्टंट-५, सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.
-: संपर्क :-
8329467904
9890992100

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०